बुलढाणा | शुक्रवार । १५ ऑगस्ट २०२५ । वर्ष-३ । अंक-७ । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. | RNI : MAHMAR/2023/89148 | DAINIK MAHABHOOMI | बुलढाणा । छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम

स्वातंत्र्यदिन चिरायू होवो

# दैनिक महाभूमि

निर्मळ, निकोप, नि:पक्ष

श्री कृष्ण जन्माष्टमी


अभिष्ठचिंतन सोहळा



मानणीय आमदार
## श्री. सिध्दार्थजी खरात साहेबांना
वाढदिवसाच्या..... हार्दिक शुभेच्छा..!

15th August Independence Day

सर्व नागरीकांना... स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

विनीत : महाविकास आघाडी मेहकर विधानसभा मतदार संघ


मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार माननीय श्री सिद्धार्थ जी खरात साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

### मा. आमदार सिध्दार्थ खरात साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

**दिनांक 15/08/2025 वार-शुक्रवार (स्वातंत्र्यदिन व वाढदिवस विशेष)**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| सकाळी 6:30 वा. | श्री शारंगधर बालाजी मंदिर दर्शन व पूजा | श्री शारंगधर बालाजी मंदिर, मेहकर |
| सकाळी 7:00 वा | डॉ. बाचासाहेब आंबेडकर यांना अभिवादन | डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाटिका, मेहकर |
| सकाळी 7:30 वा. | छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन | छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, मेहकर |
| सकाळी 8:00 वा. | पाचपीर दर्गा येथे चादर चढविणे | पाचपीर दर्गा, मेहकर |
| सकाळी 8:30 वा. | स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहन कार्यक्रमास उपस्थिती | मुख्याधिकारी कार्यालय, मेहकर |
| सकाळी 9 : 35 वा. | स्वातंत्र्यदिनानिमित्त मा. आमदार साहेबांच्या हस्ते ध्वजारोहन | उत्कर्ष महाविद्यालय, सिंदखेड राजा |
| सकाळी 11: 30 वा. | मोफत महाआरोग्य शिबीर व रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा | श्री संत गजानन महाराज मंदिर डोणगाव रोड, मेहकर |
| दुपारी 4:00 वा. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा जिणोध्दावर व सौंदर्यीकरण लोकार्पण सोहळा | देऊळगाव माळी, ता. मेहकर |
| सायंकाळी 7:00 वा. | महाविकास आघाडी पदाधिकारी यांच्या वतीने सत्कार समारंभ | श्री संत गजानन महाराज मंदिर, मेहकर |

**दिनांक 16/08/2025 वार-शनिवार**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| दुपारी 2:00 वा. | आरोग्य शिबीर | शिवाजी हायस्कूल, सुलतानपूर ता. लोणार |
| दुपारी 3:00 वा. | युवा संवाद | ग्रैंड विश्वनाथ मंगल कार्यालय, लोणार |
| सायंकाळी 6: 30 वा. | मोटारसायकल रॅली | लोणार |
| सायंकाळी 7:30 वा. | ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज यांचे सुश्राव्य किर्तन | ग्रैंड विश्वनाथ मंगल कार्यालय, लोणार |

**दिनांक 17/08/2025 वार-रविवार**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| सकाळी 6:00 ते 8:00 वा | आमदार मेहकर मॅरेथॉन 2025 | जानेफळ चौक, मेहकर |
| सकाळी 9 : 30 वा. | वृक्षारोपन कार्यक्रम | क्रीडा संकुल, मेहकर |

**दिनांक 18/08/2025 वार-सोमवार**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| सायंकाळी 6:00 वा | प्रा. विठ्ठल कांगणे सर यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व युवा संवाद कार्यक्रम | के. व्ही. प्राईड हॉल, मेहकर |

**दिनांक 19/08/2025 वार-मंगळवार**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| सकाळी 11:00 वा | पत्रकार, प्रगतशील व नवोन्मुख उद्यमशील व्यवसायिक/उद्योजक गौरव समारंभ | कृषी वैभव लॉन, मेहकर |

**दिनांक 20/08/2025 वार-बुधवार**

| वेळ | कार्यक्रम | स्थळ |
|---|---|---|
| सकाळी 10:00 वा | भव्य रोजगार मेळावा व पात्र बेरोजगार युवकांना नियुक्ती कार्यक्रम | कृषी वैभव लॉन, मेहकर |





दैनिक महाभूमि द्वितीय वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...

शुभेच्छुक : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), युवा सेना मेहकर-लोणार मतदार संघ

# उत्कंठावर्धक थरारांच्या थरांनी थरकाप उडवणारी संघर्षयात्रा : आमदार सिद्धार्थ खरात

काही कर्तृत्ववान माणसांची संघर्षशील आयुष्ययात्रा उत्कंठावर्धक थरारांच्या थरांनी गच्च भरलेली असते. या यात्रेतील एका ध्येयवेडया मुसाफिराची ही कथा आहे. सर्वसामान्यांची प्रश्ने सोडवतांना अधिकारी म्हणून मर्यादा येत असल्याने मंत्रालयातल्या 'त्या' अधिकाऱ्यामधील अस्वस्थता शिगेला पोहोचते. नंतर, ती बेचैनी निर्णयाकतेचा कळस गाठते आणि ऐच्छिक सेवानिवृत्तीचा निर्णय पक्का होता. मग समाजसेवेच्या यज्ञकुंडात स्वतःला झोकून देण्याची तयारी होते आणि न घडतो भूतो न भविष्यती असा एक इतिहास. १० महिन्याच्या ऐच्छिक सेवानिवृत्तीच्या जेमतेम कालावधीनंतर मंत्रालयातला तो अधिकारी मंत्रालयात जाऊन थडकतो आमदार होऊन.. निश्चयाचा कठीण महामेरू सर करणाऱ्या त्या अधिकाऱ्यांचं नाव सिद्धार्थ रामभाऊ खरात

मेहकर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात यांचं अख्खं जगणं उत्कंठावर्धक वळणांनी गच्च भरलेलं आहे. मनात कुठेतरी शिक्षणाविषयीची ओढ होती, आई निंदणखुरपण करतांना भारतरत्न डॉ बाबासाहेबांवरची स्वरचित गाणी गोड गळ्याने आळवायची. तेव्हा लहानग्या सिद्धार्थच्या मनात बाबासाहेबांचं तत्वज्ञानाची पेरणी झाली. ताडशिवणी ते किनगावराजा गावापर्यंत शिक्षणासाठी पायपीट. शैक्षणिक परिश्रमाच्या झाडाला स्वप्नपूर्तीचा फुलोरा येऊ लागला. स्पर्धापरिक्षेच्या माधामातून खरात साहेब पी एस आय ची परीक्षा उत्तीर्ण झाले होते. नाशिक पोलिस प्रशिक्षण केंद्रात पीएसआय चे प्रशिक्षण जवळजवळ पूर्ण केले.खरात यांच्या अंगी वटवृक्षाचा विनय, वटवृक्ष आसमंताच्या रोखाने झपावतो, आसमंत कवेत घेतो पण त्याच्या पारंब्या उगवणीच्या ठिकाणाला, जमिनीला विसरत नाहीत, आसमंत कवेत घेण्याची जिवतोड मेहनत संपली की पारंब्या विनम्रपणे जमिनीकडे झुकतात, खोडाला बळ देण्याची महत्तम कामगिरी गाजावाजा न करता बजावतात. ताडशिवणी ते किनगावराजा ही शैक्षणिक पायपीट करतांना खरात साहेबांच्या अंतःकरणात झिरपलेला कष्टी, दुःखी भोवताल ताजातवाना राहिला. काळ्या मातीत राबराब राबणाऱ्या बळीराजाची दैना त्याच्या दैनंदिन हालअपेष्टा घट्ट स्मरणात राहिल्या. मंत्रालयातल्या वातानुकूलित कक्षात प्रगल्भ सामाजिक जाणिवेची पाळेमुळे खोलवर रुजवलेलं त्यांचं मन अस्वस्थ व्हायला लागलं. आपल्या मातीसाठी, मातीतल्या माणसांसाठी, गावासाठी, भोवतालाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी काहीतरी करण्याची उर्मी चाकरमानी चाकोरीबद्ध जगणे नाकारायला लागली, व्यक्तिमत्वाला असलेले सहस्त्र कल्पक पंख फडफडायला लागले,अनेक आकाशे खुणवायला लागली. याच सलग अस्वस्थतेतून मग रोवली गेली दिनदुखितांच्या, वंचितांच्या, कलावंतांच्या, परिघावरच्या माणसाच्या कृषी, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विधायक ध्येयपूर्तीसाठी उत्कर्ष फाउंडेशनची महूर्तमेढ. खरात साहेब आणि त्यांच्या सहचारिणी सुवर्णाताई मंत्रालयात कक्ष अधिकारी म्हणून एकाचदिवशी रुजू झाले. दोघांची परिवर्तनवादी वैचारिक बैठक समान. धर्माची, जातीची तटबंदी ओलांडून विचार करण्याची शैली एकाच वैचारिक जातकुळीतली हृदयाच्या तारा जुळल्या.

दोघांनी आजतागायत समता, एकात्मता आणि धर्मविरहीत मानवसंकल्पनेला प्राणपणाने जपलेलं, समविचारी दोन जीव एकत्र आले. आणि दाम्पत्यजीवनाच्या वाटेवर एकत्र चालण्याचा निर्णय पक्का झाला. सगळ्या सोपस्कारांना, रूढी परंपरांना फाटा देत विवाहसोहळा साध्या, सोप्या पद्धतीने पार पडला. खरात साहेबांच्या गाठीशी मंत्रालयीन कामकाजाच्या अनुभवाची शिदोरी भक्कम, मंत्रालयातील कोपरानकोपराची खडानखडा माहिती,तत्कालीन मंत्री मा नितीन राऊत यांचे खाजगी सचिव,माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांचे ओएसडी, केंद्रात ना रामदास आठवले यांचे खाजगी सचिव, दिल्ली दरबारात खरात साहेबांचे मन मात्र रमले नाही. राज्याची ओढ त्यांना पुन्हा मुंबईला घेऊन आली, खाजगी सचिव आणि कक्षअधिकारी म्हणून खरात साहेब



यांनी मंत्रालयीन पटलावर बजावलेली कामगिरी निसंदिग्ध स्तुत्य आहे. राज्याच्या उच्चशिक्षण खात्यात कार्यरत असतांना विद्यापीठ सुधारणा अधिनियम आणि अभिमत विद्यापीठ संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात महत्वाची भूमिका बजावली, मंत्रालयीन व्यस्तता सांभाळून बुलढाणा जिल्ह्यात कार्यरत उत्कर्ष फाऊंडेशनची उपक्रमशीलता यांची पद्धतशीरपणे सांगड घातली. शेतीव्यवसाय म्हणजे तोट्याचा व्यवसाय, सगळा निसर्गाच्या लहरीपणावर विसंबून, शेतकऱ्यांनी फक्त शेतीव्यवसायावर अवलंबून न राहता जोडधंद्याची कास धरावी म्हणून खरात साहेबांनी उत्कर्ष फाउंडेशनच्या बावट्याखाली जिल्ह्यात दुग्धव्यवसायाची चळवळ सक्रीय केली.

लोककवी वामनदादा कर्डक यांच्या परिवर्तनवादी उत्तुंग कामगिरीला अभिवादन म्हणून उत्कर्षच्या फाउंडेशनच्या माध्यामातून दरसाल पुरस्कार वितरण सोहळा आकारला. वर्तमानाचा वतनदार लोकवाड्मय गृहाने प्रकाशित केलेल्या माझ्या तिसऱ्या कवितासंग्रहाला खरात साहेबांच्या अधिपत्याखालील उत्कर्ष फाउंडेशनने लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार देऊन सन्मानित केले हे मी इथे सविनय नमूद करतो. शिवाय ज्या गाण्यांमुळे खरात साहेबांच्या मनात शिक्षणाच्या उर्मीची बीजे खोलवर रुजली. शाहू, फुले, आंबेडकरी विचारांची रेशीमविण चित्तवृत्तीत विणली गेली ती खरात साहेबांची मायाळू आई रेश्माई, बालपणी ऐकलेल्या रेश्माईच्या मौखिक कवितांचे संकलन आणि संपादन करून एक सुबक ,वाचनीय कवितासंग्रह खरात साहेबांनी प्रसिद्ध केला. आईच्या तोंडातून स्वयंस्फूर्तपणे प्रसवलेल्या गाण्यांना अक्षरवाड्मयाचा दर्जा रसिक लेकरानं मिळवून दिला. एक कवी म्हणून मला खरात साहेबांची ही कामगिरी मनापासून भावली. संतनगरी शेगाव येथे संत साहित्य संमेलनाच्या आयोजनात खरात साहेबांनी महत्वाची भूमिका वठवली. उत्कर्षाच्या माध्यामातून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या,समर्पित भाववृत्ती जपणाऱ्या कुशल कार्यकर्त्यांची रचनात्मक मोट बांधून प्रबोधनात्मक, साहित्यविषयक उपक्रमशीलता खरात साहेबांनी जिल्ह्यात वेगवान केली.

कक्षअधिकारी या नात्याने कैक मर्यादा आडव्या येतात. आपण जनसमान्यांच्या प्रश्नांना,समस्यांना इमानेइतबारे न्याय देऊ शकत नाही. जवळ घटनात्मकदृष्ट्या एखादे संवैधानिक पद असणे गरजेचे आहे ही तगमग मुंबई मुक्कामी वृद्धिंगत होत गेली,त्या अव्याहत सामाजिक तगमगीचे,बेचैनीचे पर्यवसान ऐच्छिक सेवानिवृत्तीत झाले.

ऐच्छिक सेवानिवृत्तीनंतरचा १० महिन्याचा तोकडा काळ, मेहकर विधानसभा मतदारसंघातील मतदारांच्या मनांचा कानोसा घेणे सोपे नव्हते. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि मित्रपक्षाचे उमेदवार म्हणून सिद्धार्थ रामभाऊ खरात यांचा झालेला विजय राजकीय जाणकारांच्या भुवया उंचावणारा होता. तरुणाईला आकर्षित करण्यात खरात साहेबांची उमेदवारी यशस्वी झाली. तरुणाईला त्यांचा कक्षअधिकारी म्हणून मंत्रालयातला वावर, ग्रामीण प्रश्नांची सखोल जाण, विकासात्मक दूरदृष्टी भावली. आमदार झाल्यानंतर मेहकर विधानसभा मतदारसंघातल्या समस्यांना धसास लावण्याचा खरात साहेबांनी चंग बांधला. अधिवेशनादरम्यान सांसदीय आयुधांचा मंत्रालयातल्या पूर्वानुभवाच्या पार्श्वभूमीवर कुशलतेने वापर करायला सुरुवात केली. एक अभ्यासू आमदार म्हणून खरात साहेबांची प्रतिमा जनमानसात उजळून निघाली.

–अजीम नवाज राही

---

बॅनरद्वारे चौकाचौकात जनजागृती; वाहतूक नियमपालन करण्याचे आवाहन

# बुलढाण्यातील वाहतूक नियंत्रणासाठी अदिती अर्बन सरसावली!

**बुलढाणा :** दिवसेंदिवस शहरात वाहतूक वाढत चालली आहे. यामुळे वाहतूक कोंडीची गंभीर समस्या उद्भवत असल्याने नगर विकास विभागातर्फे 'सिग्नल प्रणाली' बसविण्यात आली आहे. सिग्नल प्रणालीचे पालन करण्यासाठी तसेच बुलढाणेकरांना वाहतूक शिस्त लावण्यासाठी 'अदिती अर्बन' ने आता पुढाकार घेतला आहे. वाहनधारकांना वाहतूक नियमांची माहिती व्हावी, या उद्देशाने शहरातील चौकाचौकात जनजागृतीपर फलक लावून शहरवासियांनी वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहन अदिती अर्बन को- ऑप क्रेडिट सोयायटी बुलढाणा यांच्या वतीने करण्यात आले आहे. सहकार क्षेत्रातून समाजकार्याची भावना जपत अदिती अर्बन वाहतूक विभागाच्या साथीने राबवत असलेल्या या उपक्रमाचे शहरात कौतुक होत आहे.

गत काही महिन्यात बुलढाणा शहरात अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले होते. वाहनांची संख्या वाढत चालल्याने







शहरातील चौका- चौकात वाहतूक कोंडी होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावर मार्ग काढण्यासाठी बुलढाणा शहरात सिग्नल यंत्रणा बसविण्यात आली आहे. या यंत्रणेची माहिती वाहनधारकांपर्यंत पोहचविण्यासाठी जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

> *वाहन चालविताना फोनवर बोलू नये, मर्यादित क्षमतेपेक्षा प्रवासी वाहनांमध्ये नको, सोबत लायसन्स बाळगणे, दुचाकीवर असल्यास हेल्मेटचा वापर आवश्यक करणे एकूणच वाहतूक व्यवस्था नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमांचे पालन करण्याचे आवाहन 'अदिती अर्बन' च्या माध्यमातून केले जात आहे.*
>
> **- हेमंत ठाकरे**
> *पोलीस निरीक्षक वाहतूक शाखा*

### वाहतूक नियमांच्या पालनासाठी जनजागृती महत्वाची

■ अदिती अर्बन नेहमीच सामाजिक हिताच्या उपक्रमामध्ये हिरहिरीने भाग घेते. जिल्हा वाहतूक नियंत्रण शाखेने शहरात ट्राफिक सिग्नल प्रणाली सुरु केली आहे. या प्रणालीचे पालन करण्यासाठी जनजागृती करणे महत्वाचे होते. या अनुषंगाने वाहनधारकांना विविध नियमांची माहिती व्हावी, यासाठी बुलढाणा जिल्हा पोलिस दलाच्या सहकार्याने बॅनरच्या माध्यमातून प्रबोधन करत आहोत. यापुढेही जिल्हा पोलीस दलाला नाविण्यपूर्ण उपक्रमांसाठी अदिती अर्बनचे सहकार्य असणार आहे.

**– सुरेश देवकर**
संस्थापक अध्यक्ष अदिती अर्बन

यासाठी बुलढाण्याच्या सामाजिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या अदिती अर्बनने वाहनधारकांच्या जनजागृतीसाठी पुढाकार घेतला असून वाहतूक नियमांची व सिग्नल यंत्रणा संदर्भातील माहिती देण्यासाठी शहरातील चौका चौकात माहिती फलक लावले आहे, हे विशेष..!

---

## अखेर वरखेड येथील रस्त्याच्या कामाला सुरुवात

**शेगाव / प्रतिनिधी**

तालुक्यातील वरखेड येथे मुरलीधर हिंगणे यांच्या घरासमोरील रस्त्याची दूरवस्था झाल्याचे वृत्त 'दैनिक महाभूमि' ने प्रकाशित केले होते. यानंतर, आता उपरोक्त रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे.

घरासमोरील सार्वजनिक रस्ता व गटार दुरुस्तीची मागणी मुरलीधर हिंगणे यांनी एका निवेदनाद्वारे पंचायत समिती कार्यालयात केली होती. यासंदर्भातील वृत्त प्रकाशित झाल्यानंतर गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत सरपंच व ग्रामसेवक यांना कामाचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. त्यानंतर ग्रामपंचायतीने नियमानुसार कार्यवाही सुरू केली असून, संबंधित ठिकाणी रस्त्याचे काम व गटार


दैनिक महाभूमि
वरखेड बु. येथील रस्त्यांची दूरवस्था
शेगाव / प्रतिनिधी
तालुक्यातील वरखेड बु. येथील ग्रामस्थांनी सार्वजनिक रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा, यासाठी पंचायत समितीकडे पुन्हा एकदा निवेदन दिले आहे. वर्षभर तक्रारी करूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांची निराशा [illegible] ...माण वाढण्याची भीती व्यक्त ...ली आहे. प्रशासनाने वेळेवर ...क्ष न दिल्यास गंभीर परिणाम ...ऊ शकतात, असे निवेदनात


दुरुस्तीच्या कामाला सुरूवात झाली आहे. याशिवाय, पूर्ण कार्यवाही न केल्यास ग्रामपंचायत जबाबदार धरली जाईल, असेही अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे.

---

## मतदान चोरीच्या निषेधार्थ हजारो नागरिकांनी पेटविली मशाल!

**चिखली :** लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते खा.राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात झालेले घोटाळे उजेडात आणले आहेत. भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगावर दबाव टाकून, निवडणूक आयोगाच्या मदतीने, मतदार यादीमध्ये घोटाळे करून तसेच मतचोरीच्या गैरमार्गाने सता मिळवलेली आहे. काँग्रेस पक्ष या विरोधात सातत्याने लढा देत आहे. भाजप सरकारच्या या मतदान चोरीच्या निषेधार्थ गुरुवारी स्वतंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला चिखली शहरात चिखली तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने भव्य मशाल मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चात हजारो नागिरकांनी मशाल पेटवून 'मतदान चोर खुर्ची सोड' या घोषणेने चिखली शहर दणाणून सोडले होते.

मोर्चाची सुरुवात जयस्तंभ चौक येथून झाली. त्यांनतर शहरातील प्रमुख मार्गावरून मोर्चाचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी हाती मेणबत्त्या व निषेधाच्या फलकांसह चिखली शहर दणाणून सोडले होते. ''मतदान चोर, खुर्ची सोड'' या प्रभावी घोषणेने भाजप सरकारचा निषेध करण्यात आला.

---




### राशीभविष्य

- **मेष :** अचानक खर्चाचा ताण वाढेल. महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. कौटुंबिक प्रश्न सोडवता येतील.
- **वृषभ :** व्यवसायात उत्साह राहील. नव्या ओळखी लाभदायक ठरतील. अचानक धनलाभाचे योग आहेत.
- **मिथुन :** ग्रहमानाची अनुकूलता राहील. महत्त्वाचे निर्णय तातडीने घ्यावेत. धार्मिक कार्याचा आनंद घ्याल.
- **कर्क :** अपेक्षित घटना घडतील. नव्या योजना मार्गी लागतील. घरगुती व्यावसायिकांना दिलासा मिळेल.
- **सिंह :** आर्थिक बाबतीत फसवणूक संभवते. व्यवसायात उलाढाला साधारण राहील. जुनी येणी रखडतील.
- **कन्या :** अपेक्षित ध्येय गाठू शकाल. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्यावं. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **तूळ :** थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. कौटुंबिक समारंभासाठी अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **वृश्चिक :** अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. महत्त्वाची कामं रखडतील. दुसऱ्यांवर विसंबून राहणं टाळावं.
- **धनु :** महत्त्वाच्या योजनांना गती मिळेल. जवळच्या नातलगांच्या भेटी होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **मकर :** खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. महत्त्वाच्या घटना दिलासा देतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ :** महत्त्वाचे निर्णय दूरदृष्टीनं घ्यावेत. मानसन्मानाचे योग आहेत. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मीन :** कामासाठी धावपळ, दगदग होईल. सांधेदुखीचा त्रास संभवतो. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल.

### दिनविशेष

**१५ ऑगस्ट**

**स्वातंत्र्य दिन: भारत, काँगो, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया**

**२०१४ :** बंगालमधील शारदा चिटफंड गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाचे ५६ ठिकाणी छापे.

**२०१५ :** सीमेवर तणावाची स्थिती. पाकिस्तानच्या कुरापती सुरू. सहा नागरिक ठार.

**२०१६ :** भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार अजित वाडेकर यांचे निधन.

### आरोग्यमंत्र — खिचडी खा, स्वस्थ रहा

आहारातला महत्त्वाचा आणि बहुतेक सगळ्यांच्या आवडीचा प्रकार म्हणजे खिचडी. वेगवेगळ्या खाद्यघटकांचा वापर करुन खिचडी रांधता येते. याविषयी...

✻ हिरव्या मूगडाळीचा वापर करून सिंधी खिचडी तयार केली जाते. यात हळद, हिंग आणि इतर मसाले घातले जातात. त्यामुळे हा परिपूर्ण आहार मानला जातो.



✻ मूगडाळ, तांदूळ आणि विविध भाज्यांचा वापर करून आरोग्यदायी खिचडी तयार करता येईल. यात रंगीबेरंगी भाज्या वापरा. फायबर, खनिजं, कर्बोदकं आणि विविध प्रकारची जीवनसत्त्व या खिचडीतून मिळतील.

✻ ओट्सचा वापर करून खिचडी बनवता येते. ओट्समध्ये फायबर, कर्बोदकं आणि प्रथिनं मुबलक प्रमाणात असतात.

✻ हातसडीच्या तांदळाची खिचडी हा सुद्धा चांगला पर्याय आहे. यात मॅग्नेशियम, सेलेनियम, फॉस्फरस आणि कॉपर असे घटक असतात तसंच बी ३ हे जीवनसत्त्व असतं.

✻ मक्याच्या खिचडीत फायबर आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. यामुळे डोळ्यांचं आरोग्य चांगलं राहतं त्याचबरोबर रक्तदाब नियंत्रणात राहतो. मसाले आणि हिरव्या मिरच्या घातल्या तर हा पदार्थ चविष्ट लागतो. विशेषत: रुग्णासाठी ही खिचडी गुणकारी सिद्ध होते.

### कोण होणार? — करियर हवाई क्षेत्रातलं

विमान वाहतूक क्षेत्रात आज तरूणांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विमान वाहतूक क्षेत्राशी संबंधित विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. या क्षेत्रात सुविधा आणि वेतनही चांगलं मिळतं. या क्षेत्रात खालील पदांचा विचार तुम्ही करू शकता.

✻ कमर्शियल पायलटचा अभ्यासक्रम पूर्ण करून विमान वाहतूक कंपनीमध्ये रूजू होऊशकता. ✻ हवाईसुंदरी किंवा फ्लाईट स्टुअर्ड म्हणून काम करण्यासाठी १२ वी किंवा पदवीनंतर अर्ज करता येतो. डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट, टूरिझम मॅनेजमेंट, परदेशी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास निवडीची शक्यता जास्त असते. ✻ एअर ट्रॅफिक कंट्रोलर म्हणून काम करण्यासाठी तुमच्याकडे इलेक्ट्रॉनिक्स, टेली कम्युनिकेशन किंवा रेडिओ इंजिनिअरींगची पदवी असायला हवी. वायरलेस कम्युनिकेशन किंवा रेडिओ फिजिक्सची पदवी असेल तरी तुम्ही या पदासाठी अर्ज करू शकता. ✻ एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअरचं काम विमानाची चाचणी आणि निरिक्षण हे असतं. उड्डाण घेण्याआधी विमान सुस्थितीत आहे किंवा नाही याच्या तपासणीची जबाबदारी असते.

### पॅरेंटिंग — वर्किंग मॉम आहात?

बाळंतपणानंतर पुन्हा ऑफिस किंवा करीअर जॉईन करत असाल तर सगळ्यात महत्त्वाची समस्या राहते ती ब्रेस्ट फिडींगची. कामाच्या वेळी बाळाला दूध कसं पाजाल याविषयी...

✻ ब्रेस्ट पंपची मदत घ्या– ब्रेस्टपंपद्वारे दूध काढून फ्रीजमध्ये साठवणं शक्य आहे. अनेकदा हातांनी दूध काढलं जातं. पण यामुळे जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. पण एका ब्रेस्टपंपचा वापर विशिष्ट मर्यादेपलीकडे करू नये. काही काळानंतर नवीन ब्रेस्ट पंप वापरावा. ✻ ब्रेस्ट पंपने दूध काढणं शक्य नसेल तर हातानेही काढता येईल. ब्रेस्टच्या आसपास असलेल्या पुरळांवर दाब दिल्यास दूध काढणं सुलभ होऊन जातं. हे दूध स्टील किंवा काचेच्या बाटलीमध्ये साठवता येईल. प्लॅस्टीकच्या बाटलीमध्ये ते साठवू नये. ✻ दूध फ्रीजमध्ये ठेवताना २५ डिग्री तापमान असेल याची काळजी घ्यावी. या दुधात पाणी मिसळणार नाही याची काळजी घ्या. साठवलेलं ब्रेस्ट मिल्क बाळाला देण्याआधी थेट गरम करू नका. त्याऐवजी गरम पाण्यात दूधाचं भांडं काही काळ ठेवावं. थोडसं कोमट झालं की मग बाळाला द्यावं.

### पंचांग

**शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
श्रावण कृ. ७, नक्षत्र : अश्विनी/भरणी
चंद्रराशी : मेष, योग : गंड
सूर्योदय : ६.२२, सूर्यास्त : ७.०४

### फॉरवर्डस

**अक़सर वहीं लोग़ उठातें हैं**
**क़िरदार पे उंगलियाँ हमारें...**

**जिन्होंने ख़ुद के ज़मीर कहीं**
**गिरवीं रखें हों...!**

### ग्रुमिंग

सध्या अनेक तरूण दाढी–मिशा वाढवतात. पण या दाढी–मिश्यांची काळजी घेण्याचं, वेळोवेळी ट्रिम करण्याचं प्रमाण जरा कमीच आहे. दाढी–मिश्या वाढवल्या असतील तर त्यांच्या ग्रुमिंगसाठी काय करायला हवं याविषयी...

✻ चांगला ट्रिमर विकत घ्या. योग्य ट्रिमर निवडताना चार गोष्टींचा विचार करायला हवा. पहिलं म्हणजे ब्रँड. वायरवाला ट्रिमर हवा का वायरलेस? तुमच्या दाढीचा प्रकार कोणता आणि तुमचं बजेट काय? या गोष्टी लक्षात घेतल्या तर ट्रिमरची निवड करणं सोपं जाईल आणि ग्रुमिंग करणं फारसं अवघड जाणार नाही. **(क्रमश:)**

### करिअरवाटा — उपयुक्त अभ्यासक्रम

सरकार नानाविध कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदवत असतं. कलागुणांच्या विकासाकडे सरकारचं जाणीवपूर्वक लक्ष असतं आणि या क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी वेगवेगळे उपक्रमही राबवले जात असतात. याचाच भाग म्हणून सरकारकडून काही अभ्यासक्रम राबवले जातात. उज्ज्वल कारकिर्द घडवण्यास साह्यभूत ठरणाऱ्या या कोर्सेसविषयी जाणून घ्यायला हवं.



✻ सर्टिफिकेट कोर्स इन ऑटोमोटिव्ह जर्नालिझम : या अभ्यासक्रमातंर्गत उच्चार, प्रसार तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक मीडिया, टीव्ही पत्रकारिता, निवेदन, लेखन, अंतर्गत आणि बाह्यसजावटीचे ज्ञान, स्टुडिओमध्ये प्रशिक्षण, भेट आदींचं ज्ञान मिळेल. ✻ सर्टिफिकेट कोर्स इन टीव्ही जर्नालिझम : यात इलेक्ट्रॉनिक मीडिया, टीव्ही पत्रकारिता, टीव्हीवरील बातम्यांचं वाचन, बातम्यांचं संकलन, हवामानाच्या अंदाजाचं वाचन, ऑन कॅमेरा शिक्षण, मुलाखतींचं तंत्र, स्टुडिओला भेट यांचा समावेश असतो. ✻ सर्टिफिकेट कोर्स इन रेडिओ जॉकी अँड स्क्रिप्ट रायटिंग : यात रेडिओसंबंधीचं समग्र ज्ञान, कार्यक्रमातील वैविध्य, बातम्यांचं वाचन, रेडिओ स्पॉट्स आदींबाबत माहिती दिली जाते.

### खेचाखेची — दोन पोरं पास झाली असती...

मुलगी रडत असते
**मुलगा :** काय झालं? का रडतेस?
**मुलगी :** मला परीक्षेत कमी मार्क्स मिळाले.
**मुलगा :** हात्तीच्या, एवढंच ना! होत असं कधी कधी. किती मार्क्स मिळाले तुला?
**मुलगी :** ८८%
**मुलगा :** आयला... एवढ्या मार्कात दोन पोरं पास झाली असती.

### वेगळं काही

इंग्लंडमधील जोनाथन ब्रायनची आई सात महिन्यांची गर्भवती असताना तिचा अपघात झाला होता. यामुळे त्यावेळी आईच्या पोटात असलेल्या जोनाथनवर याचा विपरित परिणाम झाला. जन्मापासूनच तो अंग हलवू शकत नव्हता. तसंच तो बोलूही शकणार नव्हता. कारण त्याला सेरेबल पाल्सी हा विकार झाला होता. जोनाथन पूर्णवेळ व्हिल चेअरवरच असतो. तो आपलं अंग हलवू शकत नाही. जन्मापासून त्याला श्वसनाचाही त्रास होता. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत त्याला बोलताही येत नव्हतं. पण त्याच्या आईने हार मानली नाही. तिने त्याला डोळ्यांनी बोलायला शिकवलं. जोनाथनचं शिक्षण कठीण असल्याचं शिक्षकांनी त्याच्या आईला सांगितलं होतं. **(क्रमश:)**

### स्टाईल युवर हेअर — वेणीचा हटके अंदाज

केस मोठे असतील तर तिपेडी अथवा पाचपेडी वेणी घालणं ही खूप जुनी स्टाईल आहे. पण आता ती नव्या स्टाईलनिशी कॅरी केली जात आहे. पाहू या याविषयीचे नवे ट्रेंड्स...

✻ बॉक्सर ब्रेड– हा प्रकार पंजाबी सलवार सूटवर खास दिसतोच याशिवाय वेस्टर्नवेअरवर देखील चांगला दिसतो. ✻ प्रिन्सेस ब्रेड– दाट केस असणाऱ्या युवतींसाठी ही स्टाईल परफेक्ट आहे. पार्टीसाठी ही स्टाईल करू शकता. ✻ मर्मेड ब्रेड– शेंड्याकडे निमुळत्या होत जाणाऱ्या वेणीला वरच्या बाजूने फुलवावं. छान लूक मिळून जातो. मध्यम लांबीच्या केसांसाठीही काही विशेष हेअरस्टाईल आहेत. ✻ वॉटरफॉल स्टाईल– सेलिब्रिटींमध्ये लोकप्रिय असलेली स्टाईल म्हणजे वॉटरफॉल स्टाईल. पातळ आणि जाड अशा दोन्ही केसांसाठी ही स्टाईल उपयुक्त आहे. ✻ हेडबँड स्टाईल– केसांची एक बट घेऊन त्याची वेणी घालून हेअरबेल्टसारखी दुसऱ्या बाजूला फिक्स करावी. ही हेअरस्टाईल आकर्षक दिसतेच शिवाय यंग लूक मिळवून देण्यासही मदत करते. ✻ शॉर्ट बॉक्स ब्रेड हेअरस्टाईल– आउटिंगला जाणार असाल तर पाश्चात्य धाटणीची ही हेअरस्टाईल जरूर कॅरी करा. कूल लूक मिळेल.



PRAGYAN CIVIL SERVICES ACADEMY, BULDHANA
● MPSC / Integrated Batch
● सरळसेवा भरती TCS / IBPS पॅटर्न नुसार — आम्ही देतो तुमच्या स्वप्नांना आकार...!
● स्पेशल पोलीस व वनविभाग भरती ग्राऊंडसह शिकवणी
● ELIMINATION METHOD तसेच SHORT TRICKS सह...संपूर्ण बॅच...
वेळ - स.8.00 ते 12.00 सायं.-5.00 ते 8.00
संपर्क :- प्रा. ज्ञानेश्वर बावणे 9890759270/8788719604
पत्ता - दिव्य विवेकानंद बिल्डिंग,भारत शाळेजवळ, बुलढाणा

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, निपक्ष
https://dainikmahabhoomi.com  https://epaper.dainikmahabhoomi.com

Late Sushilabai Jaiswal Women's College, Ramgaon
Affiliated to SNDT Women's University, Mumbai
Recognized by Government of Maharashtra
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
Courses Offered:
✓ B.A. (Bachelor of Arts)
✓ B.Com. (Bachelor of Commerce)
✓ B.Sc. (Bachelor of Science)
For Admission Contact:
9022327715
Gut No. 27, Ramgaon, Tal. Motala, Dist. Buldhana
Empowering Rural Women Through Higher Education
"शिक्षण हेच खरे सामर्थ्य!"




दैनिक महाभूमि
## उद्या अंक नाही
■ १५ ऑगस्टनिमित्त शुक्रवारी दैनिक महाभूमि कार्यालयास सुटी असल्याने शनिवारचा अंक प्रसिद्ध होणार नाही.
–कार्यकारी संपादक

## जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी; ३३ जणांचा मृत्यू

**किश्तवाड, वृत्तसंस्था :** जम्मू आणि काश्मीरमधील किश्तवाड जिल्ह्यातील चशोटी गावात १४ ऑगस्ट रोजी दुपारी ढगफुटी झाली. डोंगरावरून येणाऱ्या पाण्याचा आणि ढिगाऱ्याचा अनेक लोकांवर परिणाम झाला. या अपघातात ३३ जणांचा मृत्यू झाला आहे. २८ जणांचे मृतदेहही सापडले आहेत. आतापर्यंत ६५ जणांना वाचवण्यात आले आहे. सुमारे २०० लोक बेपत्ता आहेत.

हजारो भाविक मचैल मातेच्या यात्रेसाठी चशोटी गावात पोहोचले होते, तेव्हा हा अपघात झाला. यात्रेचा हा पहिला थांबा आहे. यात्रा जिथून सुरू होणार होती तिथेच ढगफुटी झाली. येथे बसेस, तंबू, लंगर आणि भाविकांची अनेक दुकाने होती. सर्व पुराच्या पाण्यात वाहून गेले. मचैल मातेची यात्रा दरवर्षी ऑगस्टमध्ये होते. घटनेबद्दल प्राथमिक माहिती देताना केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी सांगितले की, चशोती भागात ढगफुटी झाली, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असण्याची शक्यता आहे.

## शौर्याचा 'वीर चक्र'ने गौरव!

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरवेळी आपल्या शौर्याचा परिचय देणाऱ्या हवाई दलाच्या यौद्ध्यांना लष्करी पदक देऊन सलाम करण्यात आला आहे. हवाई दलाच्या नऊ लढाऊ वैमानिकांना लष्करातील प्रतिष्ठेचे वीर चक्र पदक जाहीर झाले आहे. कॅप्टन रणजित सिंग सिधू, कॅप्टन मनीष अरोरा, कॅप्टन अनिमेश पाटणी, कॅप्टन कुणाल कालरा, विंग कमांडर जॉय चंद्रा, स्क्काड्रन लीडर सार्थक कुमार, स्क्काड्रन लीडर सिद्धांत सिंग, स्क्काड्रन लीडर रिझवान मलिक, फ्लाईट लेफ्टनंट आर्शवीर सिंह ठाकूर यांचा गौरव होत आहे.

### सुप्रीम कोर्टाचे निवडणूक आयोगाला आदेश

# मतदार यादीतून वगळलेल्या ६५ लाख मतदारांची यादी जाहीर करा

**नवी दिल्ली :** 'व्होट चोरी'च्या आरोपांमुळे राजकीय वातावरण तापले असताना, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला कडक शब्दांत फटकारले आहे. बिहारमधील विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या दरम्यान ६५ लाख मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. ही नावे कोणती आहेत, आणि त्यामागचे कारण काय आहे, याची माहिती सर्वसामान्य जनतेसमोर यावी, असा आदेशच सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ''ही नावे वेबसाईटवर किंवा सार्वजनिक फलकावर का टाकू नये? ज्या नागरिकांना त्रास झाला असेल, त्यांनी ३० दिवसांत दुरुस्ती करू शकते, असे स्पष्ट शब्दांत न्यायमूर्तींनी निवडणूक आयोगाला सुनावले.

न्यायालयाने असेही म्हटले की, नागरिकांच्या मतदानाच्या अधिकारावर राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहता कामा नये.

### 'सार्वजनिक सूचना द्या'

■ सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला सुचवले की, ज्या वेबसाइटवर किंवा कार्यालयात ही माहिती उपलब्ध असेल, त्याबाबत सार्वजनिक सूचना द्याव्यात. त्यामुळे नागरिकांना वेळेत आपली नावे तपासता आणि तक्रार करता येईल.

### एसआयआर प्रक्रियेला स्थगिती देण्यास नकार

■ सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील एसआयआर प्रक्रियेला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. तसेच मतदार यादीत वगळण्यात आलेल्यांची नावे संकेतस्थळावर शेअर करा, असा आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिला. बिहार एसआयआर प्रक्रियेवरील आक्षेपांची पुढील सुनावणी २२ ऑगस्टला होणार आहे.

## अमेरिकेचा पुन्हा भारताला इशारा

**वॉशिंग्टन :** अमेरिकेने भारतीय मालावर ५० टक्के निर्यातशुल्क लादले आहे. यानंतर आता अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी पुन्हा एकदा भारताला इशारा दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यातील अलास्का येथे होणाऱ्या बैठकीत गोष्टी व्यवस्थित झाल्या नाहीत तर अमेरिका भारतावरील दुय्यम शुल्क वाढवू शकते असे बेसेंट म्हणाले आहेत. ट्रम्प आणि पुतिन हे दोन नेते १५ ऑगस्ट रोजी अलास्का येथे बैठक घेणार आहेत. या बैठकीत युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध संपवले जाण्याची शक्यता आहे.















# क्रीडा विश्वातील 'कांस्य' गमावले!

१९७२ च्या म्युनिक ऑलिंपिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचे सदस्य आणि दिग्गज टेनिसपटू लिएंडर पेसचे वडील वेस पेस यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. वेस पेस पार्किन्सन आजाराने ग्रस्त होते. वेस पेस यांचे क्रीड विश्वात मोठे नावं होते. वेस पेसचे लग्न जेनिफरशी झाले होते. ती एक भारतीय बास्केटबॉल खेळाडू होती आणि राष्ट्रीय संघाची कर्णधार देखील होती. बहुमुखी प्रतिभा असलेले वेसे पेस हे भारतीय खेळांशी दीर्घकाळ विविध भूमिकांमध्ये जोडले गेले. ते भारतीय हॉकी संघात मिडफिल्डर होते. त्यांनी फुटबॉल, क्रिकेट आणि रग्बी सारखे अनेक खेळ देखील खेळले आणि १९९६ ते २००२ पर्यंत भारतीय रग्बी फुटबॉल युनियनचे अध्यक्ष देखील होते. एप्रिल १९४५ मध्ये गोव्यात जन्मलेले पेस क्रीडा आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात अपवादात्मक होते आणि हॉकीमध्ये यश मिळवल्यानंतर ते क्रीडा वैद्यकशास्त्राचे डॉक्टर बनले. त्यांनी आशियाई क्रिकेट परिषद, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ आणि भारतीय डेव्हिस कप संघासह अनेक क्रीडा संस्थांमध्ये सल्लागार म्हणून काम केले. वेस पेस हे १९७१ च्या बार्सिलोना येथे झालेल्या विश्वचषकात कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचे सदस्य देखील होते, परंतु एका वर्षानंतर मिळालेले ऑलिंपिक पदक त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचे क्षण होते. १९७२ च्या ऑलिंपिक खेळांना एका पॅलेस्टिनी अतिरेकी गटाने ११ इस्रायली खेळाडूंच्या हत्येसाठी देखील दुःखाने आठवले जाते, ज्यामुळे खेळ चार दिवसांसाठी थांबवावा लागला होता. हॉकी कारकिर्दीला निरोप दिल्यानंतर, भारतीय डेव्हिस कप संघाचे टीम डॉक्टर आणि एक दशकासाठी लिएंडर पेसचे व्यवस्थापक होते. वडिलांच्या सांगण्यावरून लिएंडर पेसने टेनिसला नवीन उंचीवर नेले आणि १८ ग्रँड स्लॅम जेतेपदे जिंकून देशाच्या इतिहासातील सर्वात यशस्वी टेनिसपटू बनला. लिएंडरच्या १८ ग्रँड स्लॅम जेतेपदांमध्ये आठ पुरुष दुहेरी आणि १० मिश्र दुहेरी जेतेपदे समाविष्ट आहेत. लिएंडरने १९९६ च्या अटलांटा ऑलिंपिकमध्ये पुरुष एकेरीचे कांस्यपदकही जिंकले. अशा प्रकारे त्यांनी दर चार वर्षांनी होणाऱ्या या खेळांमध्ये पदके जिंकण्याची कौटुंबिक परंपरा जिवंत ठेवली. लिएंडर आंतरराष्ट्रीय टेनिस हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट होणारा पहिला आशियाई पुरुष टेनिसपटू देखील आहे. वेस पेस ७० आणि ८० च्या दशकात कोलकाता फुटबॉल दिग्गज मोहन बागान आणि मोहम्मद स्पोर्टिंग हॉकी संघांसाठी देखील खेळले. त्यांनी तत्कालीन पूर्व बंगाल प्रशिक्षक सुभाष भौमिक यांच्या आग्रहावरून पूर्व बंगाल फुटबॉल संघ आणि बायचुंग भुतियासारख्या खेळाडूंसोबत देखील काम केले. हॉकी इंडियाचे अध्यक्ष आणि माजी बचावपटू दिलीप तिर्की म्हणाले की, पेस सिनियरच्या निधनाने देशातील खेळाचे एक युग संपले आहे. हा हॉकी इंडियासाठी दुःखद दिवस आहे. डॉ. पेस यांच्या निधनाने हॉकीच्या एका युगाचा अंत झाला आहे. म्युनिकमध्ये जिंकलेले ऑलिंपिक पदक त्यांच्या धैर्याचे आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. ते देशात क्रीडा संस्कृतीला चालना देण्याचे कट्टर समर्थक होते. वेस पेस यांच्या निधनाने आपण क्रीडा विश्वातील 'कांस्य' गमावले..!

# मागोवा स्वतंत्र वाटचालीचा

**दखल**

**प्रा. मुक्ता पुरंदरे**
**(स्वातंत्र्यदिन विशेष)**

स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्याची प्रतीक्षा एका हक्काच्या सुट्टीच्या विचारापेक्षा पुढे जाईल तेव्हा हा दिवस साजरा करण्याचे खरे कारण सापडेल, असे वाटते. आज आपण या दिवसाची तयारी करत आहोत. पण थोडे थांबून अवलोकन केले असता बराच मोठा पट नजरेसमोर येईल आणि निसटून गेलेली अनेक वळणे दिसतील. अशा रिक्त जागांवर नव्याने काम करण्याचा संकल्पच यंदाच्या स्वातंत्र्यदिनाला वेगळे परिमाण देईल.

स्वातंत्र्यदिनाच्या तयारीत मग्न असताना इतक्या वर्षांचा प्रवास आठवणे, कोठे होतो आणि कोठे पोहोचलो हे बघणे, अवलोकन करणे ओघानेच आले. 'साप-गारुड्यांचा देश' म्हणून चिडवले जाण्यापासून आज जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणारा देश हे बिरुद मिळवेपर्यंतचा आपला प्रवास सोपा अजिबातच नव्हता. अनेक सामाजिक, आर्थिक, वैचारिक स्थित्यंतरांमधून वाटचाल करत आपण अवकाशापासून सागरापर्यंत प्रत्येक क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय अंतराळस्थानकात एका भारतीयाचे पाऊल पडल्यानंतर आता स्वतःचे असे स्थानक उभारण्यास आपण सज्ज होत आहोत. सैन्यक्षमता, आत्मनिर्भरता, अमेरिकेच्या दंडेलशाहीपुढे न झुकता विकास साधण्याचे धोरण, जगभर युद्धजन्य तणावस्थिती असताना सांगितलेली आणि प्रत्यक्षात राबवलेली शांतीपूर्ण स्थिती, जगभरातील अनेक देशांशी निर्माण झालेले स्नेह तसेच मैत्रीयुक्त संबंध यामुळे भारताच्या नावाभोवतीची प्रभावळ लखलखीत होत असून ती जपण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाच्या शिरावर आहे. म्हणूनच भारताच्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर गतकाळाचा मागोवा घेत भविष्याला सामोरे जाण्याची सज्जता करायला हवी.

आपण स्वतंत्रपणे प्रवासाला सुरूवात केली तेव्हा फाळणीच्या भळभळत्या जखमा बरोबर होत्या. पाकिस्तानला बरेच सैन्य, पैसे द्यावे लागले. भारताला स्वतःची राज्यघटनाही नव्हती. देश संस्थानिकांचा होता. त्यात एक कायदा नव्हता. सामाजिकदृष्ट्या आपण फार मागे होता. त्यामुळे पहिली अडीच वर्षं तर देश ब्रिटिशांनी घालून दिलेल्या कायद्यानुसार चालत होता. दोन वर्षांहून अधिक काळ राज्यघटनेची कलमे, मसुदा ठरवण्यात गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगात आदर्श ठरावी अशी राज्यघटना तयार केली. देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात महत्त्वाची भूमिका बजावणारी काँग्रेस सत्तेत येणे स्वाभावीक होते. पंडित नेहरू यांच्या नेतृत्वाखाली देशात काँग्रेसचे सरकार आले. अर्थातच सरकारसमोर अनेक आव्हाने होती. लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात नेहरूंनी त्याचा उल्लेख केला होता. अमेरिका आणि रशियाधार्जिणी राष्ट्रे अशी जगाची विभागणी झाली होती. नेहरुंनी मात्र दोन्ही सत्तांपासून सारख्या अंतरावर म्हणजे तटस्थ राहण्याचे धोरण स्वीकारले. अलिप्त राष्ट्रांचा एक गट तयार झाला. देशाने भांडवलशाही आणि साम्यवादी अशा दोन्ही अर्थव्यवस्थांना दूर ठेवले. संमिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली.

त्यानंतर पंचवार्षिक नियोजन सुरू झाले. नेहरूंचा त्यात मोठा वाटा होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीवर भर देण्यात आला. मोठमोठी धरणे बांधली गेली. शेतीच्या सचनावर भर देण्यात आला, तरीही देशातल्या लोकसंख्येला पुरेल इतके धान्य उत्पादन होत नव्हते. लालबहादूर शास्त्रींनी नेहरूंचे धोरण सुरू ठेवले आणि आजही त्यांच्याच मार्गदर्शनानुसार अंगिकारलेले परराष्ट्र धोरण सुरू आहे. त्यात फक्त थोडा बदल झाला आहे. रशियाशी मैत्री असली, तरी आपण अमेरिकेच्याही जवळ गेलो आहोत. पंडित नेहरू विज्ञानवादी होते. त्यांनी अणुभट्ट्यांपासून उपग्रहनिर्मितीची सारी प्रक्रिया सुरू केली. इंदिरा गांधी यांच्या काळात भारताने बांगलादेशची निर्मिती करून जगाच्या नकाशावर एक राष्ट्र तयार केले. भारताने जगाला कळू न देता अणुस्फोट केला. देशाला खलिस्तानवादी चळवळीशी सामना करावा लागला. अमृतसरच्या सुवर्णमंदिरात लष्कर घुसवल्याची कमत देशाला इंदिराजींच्या बलिदानाने मोजावी लागली. त्याअगोदर एक महत्त्वाची क्रांती देशात झाली. डॉ. एम. एस. स्वामिनाथन आणि डॉ. अण्णासाहेब शदे यांच्या कल्पनेतून देशात हरित क्रांती आकाराला आली. अन्नधान्याची आयात करणारा देश अन्नधान्याची निर्यात करणारा बनला. देशात ब्रिटिशांनी दिलेले प्रशासन होते. त्यात बदल होत गेले. परमीट राजपासून आता खुल्या व्यवस्थेचा आणि पारदर्शी व्यवस्थेचा पुरस्कार केला जात आहे. स्वतंत्र भारताच्या वाटचालीचा निष्पक्षपाती मागोवा घेतला तर आपल्याला स्वच्छ आणि सुंदर प्रशासन दृढ होताना दिसते. गूड गव्हर्नन्स आणि कमीत कमी हस्तक्षेपापर्यंतचा प्रवास सहजसाध्य नव्हता. राजीव गांधी यांनी भारताला आधुनिकतेची आणि तंत्रज्ञानाची दिशा दिली. अमेरिकेने संगणक द्यायला नकार दिला तर तो भारतातच तयार झाला. क्षेपणास्त्र प्रक्षेपणात तर भारताने जगात अनेक विक्रम केले. एकाच वेळी शंभरपेक्षा अधिक उपग्रह अवकाशात पाठवले. सुरुवातीला इतर देशांच्या क्षेपणास्त्र केंद्रातून आपण उपग्रह पाठवत होतो. आता आपण प्रगत देशांचे उपग्रह अंतराळात पाठवतो. चंद्रावर स्वारी करण्याची आपली तयारी सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाभिमानाला महत्त्वाकांक्षेची जोड दिली. देशाच्या लष्कराला शत्रूराष्ट्रे कवा अतिरेक्यांवर कारवाईचा मुक्तहस्त दिला. त्याअगोदर अटलबिहारी वाजपेयी यांच्यासारख्या कवीमनाच्या पंतप्रधानाने अणुस्फोट घडवले, कारगिलमध्ये पाकिस्तानचा पराभव केला. देशाने त्याअगोदरही दोन वेळा पाकिस्तानचा पराभव केलेला पाहिला. अलिकडेच त्यांना पुन्हा एकवार धडा शिकवून भारताने खंबीर भूमिका समोर मांडली आहेच. जगानेही ही ताकद पाहिली. स्वातंत्र्यानंतरचा भारत हा संपूर्ण शोषित असा देश होता. देशापुढे त्या वेळचे प्रश्न होते ते गरिबी, उपासमारी, साक्षरता आणि रोजगार. साक्षरतेमध्ये झालेली वाढ वगळता अन्य प्रश्न तसेच आहेत. इंदिरा गांधी यांचा 'गरिबी हटाव'चा नारा गाजला; परंतु अजूनही गरिबी दूर झालेली नाही. ठरावीक लोकांचे उत्पन्न वाढले. दरडोई उत्पन्नही वाढले; परंतु महागाई आणि उत्पन्नवाढीचा मेळ काही बसला नाही. मागील दशकांमध्ये देशात मध्यमवर्गीयांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. हाच वर्ग सत्तांतरात महत्त्वाची भूमिका बजावत असतो. अवकाशक्षेत्रातील डॉ. साराभाईंची कामगिरी, आण्विक विज्ञानातली डॉ. होमी भाभांची कामगिरी, डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे योगदान प्रकाशझोत टाकणारे ठरले. सरकारने व्यापार, उद्योगात पडावे की नाही, हा वादाचा मुद्दा आहे; परंतु स्वातंत्र्य मिळाले तेव्हाची परिस्थिती वेगळी होती. देशात उद्योजक कमी होते. सरकारला रोजगारनिर्मिती करणे आवश्यक होते. त्यामुळे पहिल्या तीन पंचवार्षिक योजनांमध्ये देशाने उद्योगधंदे उभारले. सरकारने त्यात मोठी गुंतवणूक केली; परंतु गेल्या दोन दशकांमध्ये निर्गुंतवणुकीच्या नावाखाली सरकार उद्योगातला हिस्सा विकून तोच पैसा विकासकामांसाठी कवा तिजोरी भरण्यासाठी वापरत आहे. त्याला गेल्या दोन दशकांमधले कोणतेही सरकार अपवाद नाही. देशाच्या अर्थकारणाला महत्त्वपूर्ण दिशा देण्याबाबत दोनजणांची नावे प्राधान्याने घ्यावी लागतील. १९९१ मध्ये देशाची आर्थिक स्थिती अतिशय वाईट झाली होती. इंधन खरेदीसाठीही पैसे नव्हते. त्यावेळी पी. व्ही. नरसह राव यांचे सरकार होते. त्यांनी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सग यांना पूर्ण अधिकार दिले. काँग्रेसच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांचा विरोध असताना खुले आर्थिक धोरण अवलंबण्यात आले. त्याचीच मधुर फळे नंतर चाखायला मिळत आहेत. एका आठवड्याचे इंधन खरेदी करण्यासाठीही हाती परकीय चलन नसणाऱ्या देशाकडे सध्या सहाशे अब्ज डॉलरचा परकीय चलनाचा साठा आहे. भारताची लोकसंख्या ही सध्या देशाची जमेची बाजू झाली आहे. जगात सर्वाधिक तरुण भारतात आहेत. आज भारताला एक जागतिक बाजारपेठ म्हणून ओळखले जाते. म्हणूनच एकविसावे शतक भारताचे आहे. भारतात कमावणारे हात वाढत आहेत, ही चांगली बाब आहे. अमेरिका, ब्रिटनच्या लोकशाही व्यवस्था फार जुन्या आहेत. आपल्या शेजारी पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, म्यानमार आदी देशांमध्ये लोकशाहीला वारंवार नख लागले आहे. तिथे काही प्रसंगी लष्कराने सत्ता ताब्यात घेतली आहे. भारतात मूलभूत हक्कांचा वारंवार संकोच झाला असला तरी इथल्या लोकशाहीला धक्का लागलेला नाही. अर्थात गेल्या काही वर्षांमध्ये भारताने लष्कराचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला असला तरी एकूणच गेल्या काही वर्षांमधल्या अर्थसंकल्पीय तरतुदी पाहता आपला प्राधान्यक्रम चुकतो आहे, असे मानायला जागा आहे. शिक्षण, आरोग्य, संरक्षण, महिला आणि बालविकास, शेतीतल्या पायाभूत सुविधांसाठी पुरेशी तरतूद होत नाही. एकीकडे युवक ही देशाची संपत्ती आहे, असे सांगितले जात असताना बेरोजगारी वाढत आहे.

दर वर्षी कोट्यवधी युवकांना रोजगार देण्याची आश्वासने दिली गेली; परंतु ती हवेतच विरली. हे चित्र बदलायला हवे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला, तेव्हा 'इंडियाज ट्रायस्ट विथ डेस्टिनी' या शीर्षकाचे भाषण नेहरूंनी केले होते.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहे.)**

## आपला देश महान

माणुसकीची ठेवू जाण
सोन्या-मोत्याची खाण
विविधेतून एकता आपली शान
करू आपला देश महान ।।१।।

शुरांचा आम्हा अभिमान
कष्टकऱ्यांची ठेवू जाण
देशासाठी करू बलिदान
करू आपला देश महान ।।२।।

महापुरुषांचा ठेवू मान
गाऊ त्यांचे गुण गान
माय - माऊलीचा करू सन्मान
करू आपला देश महान ।।३।।

केसरी, पांढरा, निळा,
हिरवा आमचा प्राण
घ्या ऐक्याची आन
करू आपला देश महान ।।४।।

गाऊ मायभुमीचे गाण
देशासाठी करू जीवाचे रान
ऐक्याचे सदैव ठेऊ भान
करू आपला देश महान ।।५।।

**- प्रा.प्रकाश वाकळे**
(परभणी) मराठवाडा विभागीय
अध्यक्ष एकता फाउंडेशन महाराष्ट्र.

## तिरंग्यास द्या सन्मान!

या स्वातंत्र्य दिनास
वाटे आम्हा अभिमान!
तिरंग्यास द्या सन्मान
देश माझा हा महान ..१

कसे ते वीर पुरुष
न लागे भूक - तहान
मिळो स्वातंत्र्य आम्हास
बस एकच हो ध्यान..२

माजलेले उपटी तण
शिवारी हे डोले धान
रक्षण करण्या दिले प्राण
स्वतंत्र केले हे रान..३

लढले होते जवान
लढले सारेच जन
छातीत गोळ्या झेलून
करी ध्वजास प्रणाम ..४

नाही वाकले मोडले
शत्रू संगे ते लढले
त्यांनी केले प्राणार्पण
नाही केले समर्पण..५

नको आम्हास रे धन
नको दौलतीची शान
स्तब्ध उभे व्हावे जन
कानी येता राष्ट्रगान!..६

**- प्रा.शोभाताई घुंगरे (गवळे)**
महानगरीय अध्यक्षा एकता
फाउंडेशन परभणी

# रादे ऊर्फ ॲड.भोंडे सरकार : एक सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व



**प्रकाशझोत**

**• प्रा.डि.एम.कानडजे**
मधुकोष निवास सागवन-बुलढाणा.

विदर्भ आणि मराठवाडा यांना जोडणाऱ्या म्हसला बुद्रुक या गावी रामसिंग देवसिंग भोंडे यांचा जन्म २३ फेब्रुवारी १९१८ रोजी झाला. रामसिंग देवसिंग भोंडे हे त्या गावी, पंचक्रोशीत, नव्हे एकूणच बुलडाणा जिल्ह्यात '' भोंडे सरकार '' म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली.भोंडे सरकार या पंचक्रोशीतील एक फार मोठी आसामी होती. तो स्वातंत्र्यपूर्व काळ होता. मोगलाईचे साम्राज्य होते. त्याची झळ मराठवाड्याला लागून असलेल्या जवळपास सर्वच गावांना पोहचत होती. त्या काळी शिक्षण घेण्याची सोय नव्हती. गरीबांना शिक्षण घेणे तर फार कठीण होते.

रझाकारांचा फार मोठा प्रभाव या भागात होता. तेथे मोगलाईचे साम्राज्य होते. भोंडे सरकारांची शिकण्याची जिद्द, हुशारी, चिकाटी आणि बाहेर गावी जाऊन शिक्षण घेण्याची मानसिकता लक्षात घेता त्यांच्या वडिलांनी त्यांचे प्राथमिक शिक्षण साखळी बुद्रुक आणि शिरपूर येथे तर माध्यमिक शिक्षण बुलडाणा येथे पूर्ण केले. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ पंजाबराव देशमुख या महान समाजसुधारकांनी जनतेला शिक्षण घेण्याचे महत्त्व पटवून दिले होते. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही याची जाणीव या महामानवांनी त्या काळी जनतेला करून दिली होती. त्यांच्या विचारांनी भोंडे सरकार फार प्रभावित झाले आणि उच्च शिक्षण घेण्यासाठी ते तयार झाले. त्यांच्या वडिलांनी भोंडे सरकारांना नागपूर येथील हिस्लॉप कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून दिला. तेथे त्यांनी खूप अभ्यास करून बीए ची पदवी मिळविली.. यावरच ते थांबले नाही तर त्यांनी कायद्याची एलएलबी परीक्षा देखील प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण केली. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना राजकारणाची आवड निर्माण झाली. ते विद्यार्थी छात्रसंघाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. ही त्यांच्या नेतृत्व आणि संघटन कौशल्याची एक चुणूक होती.

शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी यांचे विषयी यांच्या मनात जिव्हाळा होता. ते वकील असल्याने अत्यंत कमी खर्चात कष्टकरी, कामगार ,शेतकरी, शेतमजूर आणि अल्पभूधारक शेतकरी यांचे न्यायनिवाडे जिल्ह्याच्या कोर्टात करून देत होते. खऱ्या अर्थाने त्यांनी गोरगरीबांसाठी वकिली व्यवसाय सुरू केला होता. त्यांचे एक बंधू विठ्ठलराव आदर्श शेतकरी होते तर दुसरे बंधू श्रीराम भोंडे हे पंचायत समितीचे सभापती होते. एकंदरीत तिन्ही भावांचे शैक्षणिक,सामाजिक,सांस्कृतिक ,आर्थिक आणि कृषी क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण होते. बुलडाणा येथे वकिली व्यवसाय करत असताना भोंडे सरकारांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि सहकार या क्षेत्रांत काम करण्याची आवड निर्माण झाली. राजकारणात पडल्याशिवाय जनतेच्या मूलभूत गरजा सोडविता येत नाही याची जाणीव त्यांना झाली होती.म्हणून ते बुलडाणा नगर परिषदेची पहिली निवडणूक लढले आणि त्यांच्या कार्यकर्तृत्वावर १९६२ मध्ये नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. यातून त्यांना समाजाभिमुख काम करण्याची संधी मिळाली. त्याकाळी बुलढाण्यात आणि संपूर्ण जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई होती. बुलडाणा शहर आणि लगतच्या ग्रामीण भागात पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी कसे उपलब्ध करून देता येईल, याचा भोंडे सरकार रात्रंदिवस विचार करीत असत. पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असल्याने सरकारी नोकर देखील बुलढाण्यात नोकरी करण्यासाठी तयार होत नव्हते.अशा कठीण परिस्थितीत भोंडे सरकार यांनी मोठा संघर्ष करून येळगाव धरणाची कल्पना मांडली. एवढ्यावरच ते थांबले नाही तर येळगाव धरण पूर्णत्वास नेऊन बुलडाणा शहर आणि लगतच्या ग्रामीण भागातील लोकांची तहान भागविली. आजही भोंडे सरकार यांना बुलडाणा नगरी आणि लगतचा परिसर कदापिही विसरणे शक्य नाही.



**पुण्यतिथी विशेष**

आज हे धरण '' भोंडे सरकार येळगाव जलाशय '' या नावाने ओळखले जाते. येळगाव धरणाचे प्रणेते म्हणून आज बुलडाणा शहरात त्यांची ख्याती आहे.

पुढे नगराध्यक्ष पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर भोंडे सरकार थांबले नाहीत. उलट ते अधिक जोमाने कामाला लागले. सन १९७२ मध्ये ते आमदार म्हणून निवडून आले. ही त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची फार मोठी उपलब्धी होती.जनतेच्या अडीअडचणी आणि भौतिक सुविधा सोडविण्यासाठी त्यांना चांगली संधी चालून आली होती. बुलडाणा मतदारसंघाचे आमदार असताना घाटाखाली गावात आणि शेतात विजेची व्यवस्था नव्हती. त्यांनी अधिकारी वर्ग हाताशी धरून वीज जोडणी अभियान राबविले. शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण केला. गावात आणि शेतात विजेची सोय करून दिल्याबद्दल शेतकरी शेतमजूर सुखावला होता. भोंडे सरकारचा स्वभाव तसा फणसासारखा. ' फणसा अंगी काटे,आत गरांचे साठे ' या उक्तीप्रमाणे ते माणूस चुकल्यावर त्याला कडक शब्दांत समज देत असे. पुन्हा त्यांना त्याची दया यायची. अशा अनेक व्यक्तींना त्यांनी नोकरी लावून दिली आहे. आमदार असताना ग्रामीण भागात सर्वसामान्याला शिक्षण मिळाले पाहिजे म्हणून त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना प्राधान्य दिले. गाव तेथे प्राथमिक शाळा हा उपक्रम राबविला. गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अमरावती श्री शिवाजी शिक्षण संस्था सन १९३२ मध्ये स्थापन केली. रादे ऊर्फ भोंडे सरकार, दलितमित्र पंढरीनाथ पाटील आणि कै. ज्योतीराव राऊत यांनी बुलडाणा येथे जिजामाता महाविद्यालय स्थापन केले. शिवाय बुलडाणा, चांडोळ, हतेडी, मासरूळ, मेरा, देऊळगाव मही, आंचरवाडी, चिखली, ईसोली, किन्होळा, शिरपूर, नांदुरा, येथे सुध्दा दहावी-बारावी पर्यंतचे शिक्षण श्री शिवाजी हायस्कूल स्थापन करून गोरगरिबांच्या मुलांसाठी उपलब्ध करून दिले. गरीब विद्यार्थ्यांना जेवणाची व राहण्याची सोय व्हावी म्हणून काही ठिकाणी वसतिगृहाची देखील स्थापना केली. यातून अनेक उत्तोत्तम डॉक्टर, इंजिनियर, वकील, शिक्षक, कलेक्टर असे अनेक अधिकारी कर्मचारी या शिक्षण संस्थेतून निर्माण झाले.

सन १९६८ मध्ये चिखली येथे पार पडलेल्या दलितमित्र पंढरीनाथ पाटील यांच्या हिरकमहोत्सव आयोजनात भोंडे सरकारचा सिंहाचा वाटा होता. भोंडे सरकारांनी जनतेच्या सहभागातून जवळपास एक लाख रुपये निधी जमा करून पंढरीनाथ पाटीलांना यशवंतराव चव्हाणांच्या शुभहस्ते अर्पण केला. मिळालेला निधी पुढे पंढरीनाथ पाटलांनी श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या उभारणीसाठी लगेच देऊन टाकला. शेतकऱ्यांच्या जलसिंचनासाठी धरणे,तलाव छोटेमोठे कट्टे कसे बांधता करता येईल, यावर ते माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे सोबत नेहमी चर्चा करीत असत. पद्मावती धरणाचे भूमीपूजन त्यांनी भारतभाऊ बोंद्रे यांचेकडून करून घेतले.

१५ ऑगष्ट १९८८ हा दिवस त्यांचे साठी काळरात्र ठरला. ते मृत्यू शय्येवर असताना देखील त्यांनी पद्मावती धरणाकडे लक्ष द्या अशी आठवण माजी मंत्री भारतभाऊ बोंद्रे यांना करून दिली होती. यावरून भोंडे सरकार यांना शेतकऱ्यांविषयी किती कळवळा होता हे लक्षात येते.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहे.)**

# कष्टकरी शेतकऱ्यांच्या अंधाऱ्या जीवनात स्वातंत्र्याची पहाट कधी उजाडेल..?

**• किसन पिसे**
व्यंकटेश नगर,चिखली

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७८वर्षे पूर्ण झालीअसून तीन वर्षापूर्वी आपण सर्वांनी मोठ्या उत्साहात देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव वर्ष साजरे केले. विकासाचा आढावा घेतला तर एकीकडे आपण विकासाचे अनेक टप्पे पार करून तिसऱ्या आर्थिक महाशक्तीकडे वाटचाल करताना दिसत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा देशात साधी टाचणी निर्माण होत नव्हती आज मिसाईल, टेलिव्हिजन , परमाणू,संगणक, मोबाईल, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, सहकार क्रांती, जलक्रांती ,आधुनिक तंत्रज्ञानाची क्रांती, शैक्षणिक क्रांती, अर्थक्रांती,महामार्ग क्रांती (समृद्धी महामार्ग, संभाव्य शक्ती महामार्ग व इतरही अनेक प्रकल्प जसे मेट्रो रेल्वे ),सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून देशाचा विकास घडवून येत आहे.दुर्दैवाने संपूर्ण विकासाचा फोकस कष्टकरी शेतकऱ्यांना बळी देऊन मोठ मोठ्या शहराकडे झुकलेला दिसत नाही हा वरवरचा चमचमीत, झकमीतीत विकास पाहून डोळे दिपून जात आहे. रोजगाराच्या संधी शहरात उपलब्ध होत असल्यामुळे ग्रामीण भागातून फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असल्यामुळे शहरे अजगरासारखे अव्याढव्य फुगत चाललेले आहेत. शहरीकरण झपाट्याने वाढत चाललेले आहे. पण देशातील बहुतांश लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असूनही शासनाच्या उदासीन धोरणामुळे आणि वारंवार कोसळणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे कधी नव्हे एव्हढा शेती व्यवसाय डबघाईस आला आहे. त्यामुळे शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक झालेला आहे की,शेतकऱ्यांच्या शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकरी मुलाला लग्नासाठी कुणी मुली देत नाहीत.शेतीत काम करण्यासाठी कोणी तयार नाही.अनेक फुकटच्या योजनेचा भडिमार सुरू असल्यामुळे लोकांची कष्ट करण्याची मानसिकता राहिलेले नाही.फुकट मिळत असल्यामुळे आळशी विकृती निर्माण झालेली आहे.हि वास्तव वस्तुस्थिती आहे. आपल्याला डोळे दिपून दिसणाऱ्या विकासामध्ये कष्टकरी शेतकऱ्यांनी फार मोठे योगदान दिले आहे. एका वेळेची भाकर मिळण्याची मारामार होत होती उपाशी पोटी दोन्ही पाय जागीच दुमटून झोपावे लागत होते. पोटात अन्नाचा कण नसल्यामुळे डोळ्याला डोळा लागत नव्हता.अमेरिकेसारख्या उर्मट देशाकडून निकृष्ठ अन्न धान्य आयात केल्याशिवाय इलाज नव्हता अशा वेळी तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजीने देशातील जनतेला आवाहन केले की, एक दिवस उपवास धरा तेव्हढाच आपला एक दिवस पुढे ढकलेल तेंव्हा देशातील जनतेनी भरभरून प्रतिसाद देऊन एक दिवस लहान मोठ्यांनी उपवास धरून अन्नाची बचत केली होती.देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीला महत्व देऊन हरितक्रांतीची पाया भरणी पुढे तत्कालीन पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांनी हरितक्रांतीची घोषणा करून शेतकऱ्यांना आवाहन करून ''जय जवान.. जय किसान''नारा दिला अर्थात महामंत्र देऊन कष्टकरी शेतकऱ्यांना प्रेरणा दिली त्यामुळे कष्टकरी शेतकऱ्यांनी दिवसरात्र काबाड कष्ट करून काळया आईच्या कुशीतून अन्नधान्य पिकवून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करून देशाचे अन्नधान्याची कोठारे भरून टाकली आज राज्यकर्ते देशातील ऐंशी कोटी जनतेला फुकट अन्नधान्य वाटप करीत आहेत आणि लाभार्थी बनवून आपली मतपेटी मजबूत करीत आहेत तर दुसरीकडे उपाशी पोटी कष्टकरी शेतकरी नुसता शेतात उन्हातान्हात राबत आहे.

कष्टकरी शेतकऱ्यांच्या काळया कसदार सुपिक जमिनी तुटपुंज्या मोबदल्यात अधिग्रहण करून शहराभोवती मोठ मोठे उद्योग उभे राहिले. आय.टी. क्षेत्रात क्रांती घडवून आली पण त्यात शेतकरी कुठेच दिसत नाही... तसेच चकमकीत महामार्ग होत आहे सुसाट वेगाने वाहने पळत आहेत पण त्यात सर्व सामान्य शेतकऱ्याचे वाहन धावताना दिसत नाही.... देशाचा पोशिंदा व रोजगार निर्माता असलेल्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या काळ्याकुट्ट अंधाऱ्या जीवनात स्वातंत्र्याची पहाट कधी उजाडेल......?

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहे.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. **MAHMAR/**२०२३/८९१४८
ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148

स्वातंत्र्य दिन चिरायु होवो..!

छत्रपती संभाजीनगर भूमि

दैनिक महाभूमि

शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५

mahabhoomimarathwada@gmail.com

७७ वा स्वातंत्र्यदिन

न्यूज ब्रीफ

## पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते आज ध्वजारोहण

**छत्रपती संभाजीनगर :** स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ९ वाजून ५ मिनिटांना ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी आ. प्रदीप जैस्वाल, आ. संजय केणेकर, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, पोलिस आयुक्त प्रवीण पवार आदींसह स्वातंत्र्यसैनिक उपस्थित राहणार आहेत.

## जखमी मुलीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वाळूज महानगर :** आपेगाव-खोजेवाडी रोडवरील आसेगाव काट्याजवळ १० ऑगस्ट रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात जखमी झालेल्या १६ वर्षीय मुलीचा उपचाराच्या दरम्यान मृत्यू झाला. वैशाली संजय त्रिभुवन (१६ वर्ष), रा. राहुलनगर, रेल्वेस्टेशन परिसर ही मुलगी अपघातात गंभीर जखमी झाली होती. तिचे मामा चंद्रकांत सोळस यांनी तिला तातडीने घाटी रुग्णालयात दाखल केले होते. उपचार सुरू असताना बुधवार, १३ ऑगस्ट रोजी मृत्यू झाला. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## तरुणावर चाकूने हल्ला

**छत्रपती संभाजीनगर :** रागाने पाहिले म्हणत महाविद्यालयात जाणाऱ्या यश संजय दिवेकर (१८ वर्ष) याच्यावर टवाळखोराने चाकूने वार करण्याचा प्रयत्न केला व धमकावले. १२ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास मुकुंदवाडीत ही घटना घडली. याप्रकरणी शुभम रेंगे याच्यावर मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### कन्या सन्मान दिवस उत्साहात

# मुला-मुलीत भेद करण्याची मानसिकता बदला : पालकमंत्री

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जन्म देणारी आई, आयुष्यभर साथ देणारी पत्नी, जिव्हाळा लावणारी बहिण हवी असतांना मुलीचा जन्म नको, ही मुला-मुलीत भेद करणारी मानसिकता बदला,असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथे केले.



कन्या जन्माचे स्वागत करुन मुलींचा जन्मदर वृद्धिंगत करण्यास चालना देण्यासाठी आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून 'कन्या सन्मान दिवस' सर्व मंडळ मुख्यालयात साजरा करण्यात आला. पंढरपूर येथे विठ्ठल मंदिराच्या प्रांगणात झालेल्या कार्यक्रमास पालकमंत्री संजय शिरसाट हे उपस्थित होते. यावेळी पंढरपूरच्या सरपंच वैशाली राऊत, वळद गावचे सरपंच अमर राजपूत, वडगावचे सरपंच सुनिल काळे, पाटोदा गावचे सरपंच कपिंद्र पेरे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, तहसिलदार शिवानंद बिडवे, अप्पर तहसिलदार डॉ. परेश चौधरी, गटविकास अधिकारी मीना रावताळे, विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार, ॲड. ललित शिरसाट, डॉ. श्रद्धा स्वामी, विकास जैन आदी उपस्थित होते. पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. वळद गावात मुलीच्या जन्मानंतर २१०० रुपये मातेस देण्याची योजना राबविली जाते. त्याअंतर्गत मातांना २१०० रुपयांचा धनादेश पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. ॲड. शिरसाट यांनी प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याविषयी उपस्थितांना माहिती दिली. तसेच डॉ. स्वामी यांनी महिलांच्या आरोग्याविषयक माहिती दिली. आशासेविका पूजा साळवे यांनी तसेच विद्यार्थिनी पूजा पवार यांनी अपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. व्यंकट राठोड यांनी केले तर शिवानंद बिडवे यांनी आभार मानले. सुत्रसंचालन प्रवीण लोहाडे यांनी केले.

**मुलांपेक्षा मुली सर्वच क्षेत्रात सरस**

■ मुलगा मुलगी समानता ही फक्त बोलण्याची गोष्ट नसून ती कृतीत आणणे आवश्यक आहे. समाजात मुलगा मुलगी भेद करण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. आई, बहिण, पत्नी आवश्यक असते. मग मुलगी का नको ? मुलांपेक्षा मुली सर्वच क्षेत्रात सरस असल्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले. तसेच मुलींनी मिळविलेल्या यशाचे कौतुक करा. तिचे लाड करा. मुलापेक्षा मुलगी हीच म्हातारपणाचा आधार ठरते असे त्यांनी यावेळी सांगितले.

## दर्जेदार कामांसाठी शासन आपल्या सोबत : उपमुख्यमंत्री पवार




**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

शहरात करावयाच्या विकास कामांचे आधी नियोजन करा. हे नियोजन परिपुर्ण झाल्यानंतर निधीची मागणी करा. नंतर दर्जे दार कामे करा व जनतेला उत्तम सुविधा, त्यासाठी शासन आपल्या नेहमी सोबत आहे, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी दिले. येथील श्री गणेश महासंघ उत्सव समिती च्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

छत्रपती शिवाजी हायस्कूलजवळ झालेल्या या कार्यक्रमास पालकमंत्री संजय शिरसाट, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. संजय केणेकर, गणेश महासंघाचे संस्थापक पृथ्विराज पवार, उत्सव समितीचे अध्यक्ष अनिकेत निल्लावार, पोलीस आयुक्त प्रवीण पवार आदींची उपस्थिती होती. उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले की, जनतेची कामे ही दर्जेदार व्हायला हवीत. निधी योग्य पद्धतीने खर्च झाला पाहिजे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात करावयाच्या कामांचे नियोजन आधी सर्व लोकप्रतिनिधी व प्रशासन मिळून करा.

त्यानंतर प्रस्ताव द्या. योग्य कामाला निधीची कमतरता पडू देणार नाही. शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे बाधित झालेल्यांनाही पर्यायी सुविधा उपलब्ध करुन द्या. छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच एक २०० कोटी रुपये खर्चून उद्योगासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ देण्यासाठी इनक्युबेशन सेंटर तयार करण्याची योजना आहे,असेही त्यांनी सांगितले. खुलताबाद येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करा,असे निर्देशही त्यांनी दिले.

## चढ्या दराने मद्यविक्री करणाऱ्या १७ विक्रेत्यांवर कारवाई

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

किरकोळ विक्री दरापेक्षा जादा दराने मद्यविक्री करणाऱ्या १७ मद्य विक्रेत्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली असून साडेआठ लाख रुपये दंड आकारला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत देण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, जून २०२५ मध्ये मद्याची दरवाढ करण्यात आली. त्यानंतर जिल्ह्यातील काही अनुज्ञप्तीधारकांनी कमाल किरकोळ किंमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दराने मद्याची विक्री केल्याची तक्रार राज्य उत्पादन शुल्क विभागास प्राप्त झाली. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाभरात विशेष तपासणी मोहीम राबवली. या मोहिमे दरम्यान, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७ देशी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकांवर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशानुसार मद्य विक्रेत्यांकडून साडेआठ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला. जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशी कारवाई करण्यात आली आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुद्ध परवाना निलंबन आणि कायमस्वरूपी रद्द करण्याची कठोर कारवाई करण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सूत्रांनी स्पष्ट केले.

## रुग्णसेवेत शासनासोबत खाजगी संस्थांचाही सहभाग : उपमुख्यमंत्री पवार

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

रुग्णांना उपचार सुविधा देण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचे शासनाचे धोरण आहे. रुग्णांना उपचार सुविधा देण्यात शासनासोबतच खाजगी संस्थांचाही सहभाग आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी केले.




येथील कर्नावट कर्करोग रुग्णालयाच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. यावेळी आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, आ. अब्दुल सत्तार, डॉ. विनय कर्नावट, डॉ. मधुबाला कर्नावट, डॉ.आनंद, डॉ. सोहम आणि डॉ. खुशबु कर्नावट यावेळी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार पुढे म्हणाले की, कर्करोग या आजाराचे वेळीच निदान आणि लगेच उपचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा कर्करोग रुग्णालयांचा मुंबई पुणे सोडून अन्य शहरात उपयोग होतो. चांगले दर्जेदार उपचार दिले जातात. युवकांनी व्यसनांपासून दुर रहावे. म्हणजे कॅन्सर सारखा आजारही आपल्यापासून दुर राहतो. कॅन्सरवरील उपचारांबाबत संशोधन होत असतांना कॅन्सर होऊ नये यासाठी आपण सगळ्यांची काळजी घेणे आपल्या दैनंदिन जीवनमानात, आहारात बदल करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## सर्व्हिस रोडच्या दुरुस्तीसाठी रास्ता रोको आंदोलन करणार

### भाजपा तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचा इशारा

**लासूर स्टेशन / प्रतिनिधी**

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाचपिरवाडी (कसाबखेडा फाटा) येथील सर्व्हिस रोडची दुरुस्ती करण्यात यावी या मागणीसाठी भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी टोल नाका बंद करुन रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशरा, भारतीय राजमार्ग प्राधिकरणच्या प्रकल्प संचालकांना निवेदनाद्वारे दिला आहे.



सोलापूर- धुळे राष्ट्रीय महामार्गावरील पाचपीरवाडी कसाबखेडा फाटा येथील उड्डाणपुलाच्या खालील दोन्ही सर्व्हिस रोडवर खड्डे पडले असून खड्यांतील खडी रस्त्यावर पसरल्यामुळे दररोज या ठिकाणी अपघात घडत आहेत. यामुळे वाहनाचे आणि वाहनधारकाचे नुकसान होत आहे. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील करोडी व हातनुर येथे टोलनाका उभारुन वसुली सुरु आहे. परंतु रस्त्याची निगा राखणे टोल ठेकेदाराची जबाबदारी असतांना ठेकेदार रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करीत आहे. पाचपिरवाडी येथील सर्व्हिस रोडची भारतीय राजमार्ग प्राधिकरण विभागाने २१ ऑगस्टपर्यंत दुरुस्ती करावी अशी मागणी भाजप तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेतर्फे सवलत योजना जाहीर

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या, बचत गटांच्या तसेच लघु उद्योजकांच्या थकीत कर्जाच्या परतफेडीसाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने विविध सवलत योजना जाहीर करण्यात आल्या असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

अनियमित पीककर्ज नियमित करण्यासाठी शेतकरी आधार योजना, थकीत पीककर्जासाठी शेतकरी नवसंजीवनी योजना, थकीत शेती आधारित मुदत कर्जासाठी शेतकरी समाधान योजना. बचत गटाच्या थकीत कर्जासाठी गटबंधन सहायता योजना तसेच लघु उद्योजक यांच्या थकीत कर्जासाठी उद्योजक दिलासा योजना या योजना बँकेमार्फत पात्र कर्जदारांसाठी जाहीर केल्या आहेत.

या योजनांमध्ये बँकेतील ३ लाख १५ हजार खातेदार पात्र होणार आहेत. योजनांमध्ये पात्र ठरणाऱ्या खातेदारांसाठी कर्ज सवलतीसोबतच नवीन तसेच वाढीव कर्जाची तरतूद केली आहे. पात्र सर्व खातेदारांची यादी ग्रामीण बँकेच्या सर्व शाखांत उपलब्ध आहे. ही योजना ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत सुरू राहणार असल्याचे बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांनी सांगितले.

## विनयभंगाचा प्रयत्न करणाऱ्यास सक्तमजुरी, दंडाची शिक्षा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

कन्नड परिसरात शेतात जाणाऱ्या महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी सुदाम आसाराम हारणे (४५ वर्ष), रा. कन्नड याला एक वर्षे सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा विशेष न्यायाधीश ए. आर. उबाळे यांनी ठोठावली. दंडाची रक्कम नुकसानभरपाई म्हणून पीडित महिलेला देण्याचा आदेश आहे.



फिर्यादीनुसार, २१ जानेवारी २०२० रोजी सकाळी पीडितेच्या पतीने शेतात काम सुरू केले होते. दुपारी त्या पतीसाठी डबा नेत असताना, सुदामने रस्त्यात अडवून पीडित महिलेचा विनयभंग केला. पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विशेष म्हणजे आरोपीने दीड वर्षापूर्वीही हाच प्रकार केला होता. त्यावेळी आरोपी आणि पीडितेचे नातेवाईक हे एकाच गावातील असल्यामुळे समजावून सांगून प्रकरण मिटविण्यात आले होते.

तत्कालीन उपविभागीय पोलिस अधिकारी जगदीश दत्तात्रय सातव यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्याच्या सुनावणीवेळी सहाय्यक लोकाभियोक्ता अजित अंकुश यांनी चार साक्षीदार तपासले. पैरवी अधिकारी म्हणून उपनिरीक्षक संजय धुमाळ, सहाय्यक फौजदार एम.एम. माळी, हवालदार व्ही. व्ही. घादगिने आदींनी काम पाहिले.

## दुधड येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास बुधवार, १३ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. सप्ताहाचे आयोजन सर्व गावकरी व हनुमान मंदिर ट्रस्ट यांच्या वतीने गेल्या ५३ वर्षांपासून करण्यात येत आहे. या सप्ताहात ग्रामस्थांच्या वतीने नामवंत महाराजांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.१३ ऑगस्ट रोजी सुरू झालेल्या सप्ताहाची सांगता बुधवार, २० ऑगस्ट रोजी हभप केशव महाराज उखळीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. या सप्ताहानिमित्त दररोज सकाळी ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा भजन, दुपारी २ ते ५ संगीत भागवत, ५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० या वेळेत हरिकीर्तन होणार आहे.

## जि.प.च्या इमारतीवर लावणार दोन कोटींचे सोलार

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी ३०० कि.वॅट. पॉवरचे सोलार यंत्र बसविण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला असून, त्यास जिल्हा नियोजन समितीकडून १ कोटी ८५ लाख ४३ हजार रुपयांचा निधी मिळवण्यासाठी तो जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.



यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्याशी चर्चा केली असून, याबद्दल त्यांनी सकारत्मकता दर्शविली आहे. जिल्हा परिषदेत मागील तीन वर्षांपासून सुरू असलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. इलेक्ट्रिफिकेशन, लिफ्ट, फर्निचर, रंगरंगोटी, आदी कामांसाठी शासनाकडे १२ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके यांनी सांगितले की, नवीन इमारत झाल्यानंतर जिल्हा परिषदेला दरमहा लाखो रुपयांचे इलेक्ट्रिक बिल येऊ शकते. बिलाची ही मोठी रक्कम वाचविण्यासाठी सोलार यंत्राची संकल्पना समोर आणली आहे.

### लोककवी वामनदादा कर्डक अध्यासन केंद्राच्या वतीने व्याख्यान

# वामनदादांच्या गीत रचनेला वैचारिक अधिष्ठानची जोड : प्रा. उत्तम अंभोरे

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

वामनदादा कर्डक यांच्या गीतलेखनात एक तत्त्वज्ञान आहे. त्याचबरोबर त्यांच्या गीताला बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे अधिष्ठान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखक व समीक्षक प्रा. उत्तम अंभोरे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या लोककवी वामनदादा कर्डक अध्यासन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी बोलत होते.




वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त आंबेडकरी श्वासाचा ध्यास घेतलेला लोककवी : वामनदादा कर्डक या विषयावर मराठी विभागाच्या सभागृहात ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. दासू वैद्य होते. पुढे बोलताना प्रा. उत्तम अंभोरे म्हणाले की, वामनदादा यांनी गीत लिहिण्याचे प्रयोग केले. चित्रपटासाठी गीते लिहिली. त्यांच्या गीतामुळे फ्लॉप चित्रपट सुपरहिट ठरला. दादासाहेब रुपवते यांनी त्यांना चळवळीत आणले. ते आंबेडकरी विचारांशी शेवटपर्यंत एकनिष्ठ राहिले आणि आंबेडकरी विचारधारा घराघरांत पोहोचवली. प्रसंगी दलित नेत्यांना खडे बोल सुनावले. वामनदादा असे एकमेव लोककवी आहेत ज्यांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्म ते मृत्यूपर्यंतचे क्षण आपल्या गीतातून टिपलेले आहेत. यावेळी प्रा. अंभोरे यांनी वामनदादा यांच्या जीवनप्रवासावर प्रकाशझोत टाकून वामनदादा कर्डक यांच्या कवितांचे सादरीकरण केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश घुले यांनी केले. आभार राजश्री काळे हिने मानले. कार्यक्रमास डॉ.मुस्तजीब खान, डॉ. सुनील नरवडे, डॉ. आनंद उबाळे, डॉ. नवनाथ गोरे, किशोर वाघ, डॉ. संजय पाईकराव यांच्यासह संशोधक व विविध विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रा रामेश्वर वाकणकर, डॉ. वाल्मीक वाघमारे, डॉ. विलास गायकवाड, डॉ. अण्णा सोनवणे,डॉ. कोंडबा हटकर, डॉ. आकाश पवार, सखाराम आव्हाड, गणेश रासवे सृष्टी पोफळे यांच्यासह विभागातील कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

**वामनदादांच्या कवितेत विद्रोह**

■ वामनदादा गीतामुळे जेवढे प्रसिद्ध झाले तेवढेच त्यांचे गीत गाणारे प्रसिद्ध झाले. वामनदादा यांच्या कवितेत विद्रोह आहे, प्रबोधन आहे असे प्रा.डॉ. दासू वैद्य यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना सांगितले. तसेच वामनदादा यांची गीते लोकोक्ती झाली आहेत. गीताला उंचीवर नेणारा हा लोककवी असल्याचे त्यांनी सांगितले.

## चार महिन्यांनंतर डीपीडीसीला मिळाला २२० कोटींचा निधी

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर जिल्हा नियोजन समितीला पहिल्या टप्प्यात ३० टक्के म्हणजे २२० कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. निधी प्राप्त झाल्याने अनेक महिन्यांपासून पडून असलेल्या विविध प्रस्तावांना चालना मिळण्याची शक्यता आहे. २२० कोटींचा निधी मिळाला असला तरी दायित्व २१० कोटी आहे.

जिल्हा नियोजन समितीला (डीपीसी) २०२५-२६ या वर्षाकरिता सर्वसाधारण योजनेसाठी ७३५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला. मागील वर्षीच्या तुलनेत ७५ कोटी रुपयांचा वाढीव निधी मंजूर झाला असला तरी चार महिन्यांपासून एक रुपयाही मिळाला नव्हता. त्यामुळे अनेक विकासकामांचे प्रस्ताव येऊनही निधीच नसल्याने या कामांना मंजुरी देण्यात आली नव्हती. यापूर्वी जूनमध्ये डीपीसीची बैठक पार पडली होती.

आता पुढच्या आठवड्यात बैठक होईल. आगामी बैठकीतून काही निधींचे प्रश्न मार्गी लागतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## क्षुल्लक कारणावरुन मारहाण



**छत्रपती संभाजीनगर :** नात्यातील महिलेसोबत बोलत असल्याच्या कारणावरून तौफिक बेग रफिक बेग (३० वर्ष), रा. नंदनवन कॉलनी या तरुणाला मारहाण करून डोक्यात गड्डू घालून जखमी करण्यात आले. ही घटना ५ ऑगस्ट रोजी सेंट्रल नाक्यावर घडली. याप्रकरणी राजू साखरे (रा. एन-६ संभाजी कॉलनी) याच्यावर सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.

डॉ.ए.एच.शेख

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9021111549 / 7020614645

www.drshaikhah.com

## न्यूज ब्रीफ

### प्रहार जनशक्तीचे पूर्णा येथे उपोषण

**परभणी :** पूर्णा तालुक्यातील ग्रामपंचायतींनी दिव्यांगांचा ५ टक्के निधी वितरीत करावा, घरकुल वाटप न केलेल्या ग्रामसेवकांवर गुन्हे दाखल करण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी प्रहार संघटनेतर्फे तहसीलसमोर बुधवार, १३ ऑगस्टपासून उपोषण सुरू केले आहे. ग्रा. पं. सन २०२१-२२, २३, २४ ग्रामपंचायतची कर वसुली किती झाली आहे, याची माहिती लेखी स्वरुपात द्यावी, दिव्यांगाना ५ टक्के निधी वाटप केला असेल, त्या दिव्यांगांची यादी देण्यात यावी. अशा विविध मागण्या करण्यात आल्या. उपोषणात शिवहार सोनटक्के, विष्णू बोकारे, सूर्यभान बुचाले, राम सुके, चंपत कदम, विष्णू चव्हाण आदी सहभागी झाले आहेत.

### दारू विक्री करणाऱ्या दोघांवर कारवाई

**वैजापूर :** बेकायदेशीररीत्या देशी दारूची विक्री करणाऱ्या दोघांविरुद्ध विरगाव ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विरगाव पोलिसांनी दोन गावांत सोमवार,११ ऑगस्ट रोजी ही कारवाई केली. वांजरगाव येथील गोपीनाथ भीमराव त्रिभुवन याच्या ताब्यातून १ हजार ४०० रुपये किमतीच्या १४ देशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या. कापूसवाडगाव येथील जीवन गजानन त्रिभुवन याच्या ताब्यातून ७०० रुपये किमतीच्या ७ देशी दारूच्या बाटल्या जप्त केल्या. पोलिस उपनिरीक्षक अशोक माने यांनी ही कारवाई केली.

### तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेस प्रारंभ

**परभणी :** लोणी बु. येथील जिल्हा परिषद शाळा आणि कै. मारोतराव धर्मे क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेला नुकतीच सुरुवात झाली. यावेळी गटशिक्षणाधिकारी मुकेश राठोड, लोणीच्या सरपंच शकुंतला मायंदळे, पाथरी बाजार समितीचे उपसभापती श्याम धर्मे, रामकिशन धर्मे, पोलिस पाटील रणजित गिराम, गजानन धर्मे, ज्ञानेश्वर धर्मे, तालुका क्रीडा संयोजक तुकाराम शेळके, शाळेचे मुख्याध्यापक चिंचाणे, खो-खो प्रशिक्षक महेंद्र धर्मे आदींची उपस्थिती होती.

रासायनिक खतांचा खर्च वाया जाण्याच्या मार्गावर : शेतकरी चिंताग्रस्त

# सोयगाव तालुक्यात १७ दिवसांपासून पावसाची दांडी, करपताहेत पिके

दत्तात्रय काटोले

**सोयगाव :** तालुक्यात गेल्या १७ दिवसापासून पावसाने दडी दिल्याने खरिपाची पिके करपून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाअभावी सोयगाव तालुक्यातील ४२ हजार ६४५ हेक्टरवरील खरिपाची पिके तहानली आहेत. पावसाचा खंड, उन्हाची वाढती तीव्रता यामुळे पिकांवर ताण पडला आहे मक्याची पिकं तुर्यावर आली असतांना पावसाची गरज आहे. परंतु सोयगाव तालुक्यावर निसर्ग कोपला असून. चारही महसूल मंडळात दुष्काळ सदृश स्थिती निर्माण झाली आहे.

खरिप हंगामाच्या सुरुवातीला थोडाफार पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी वेळेच्या आत पिकाची लागवड केली आहे. परंतु आता मात्र पावसाने अचानक दडी मारल्याने जमीन कोरडी पडली असून जमिनीला भेगा पडल्या आहेत. या कोरडेपणामुळे पिके करपण्याच्या मार्गावर आली आहेत. सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात कपाशीचे उत्पादन घेतले जाते. यंदा तालुक्यात २५ हजार ९४३ हेक्टर वर कपाशीची लागवड करण्यात आली. तर ९ हजार ३७४ हेक्टरवर मक्याची लागवड केली आहे. परंतु सध्या मक्याला मुबलक प्रमाणात पावसाची अत्यंत गरज आहे. पिकाला पाणी मिळाले नाही तर वाढ थांबून पिकावर कीड पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, सोयगाव तालुक्यात २२ जुलैपासून पावसाने दडी मारली आहे. यामुळे कोरडवाहू आणि सिंचनावर अवलंबून असलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. विशेषतः सोयगाव, सावळदबारा आणि जरंडी या परिसरात मागील २० दिवसांपासून पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्याचा फटका या हंगामात बसण्याची शक्यता आहे. पावसाळा सुरु असताना देखील मक्याची शेती अशी भेगाळली आहे. कपाशी तग धरून आहे आगामी तीन ते चार दिवसांत पाऊस न आल्यास कापसाची पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.



#### अत्यल्प पावसामुळे नापिकी होण्याची शक्यता

■ हवामानातील बदल थेट शेतकऱ्यांच्या जीवावर उठत आहे. या घडीला शेतकऱ्यांना पावसाशिवाय पर्याय उरला नाही. पाऊस अल्प असल्याने नापिकी होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे सोयगाव येथील शेतकरी अरुण सोहनी यांनी सांगितले.

#### भर पावसाळ्यात शेतात पडल्या भेगा

■ पाण्याची सोय असणाऱ्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला लागवड केली. पण दिवसेंदिवस वाढत्या उन्हासोबत शेतातील पाणी मोठ्या प्रमाणात जिरत आहे. त्यातच वेळेवर वीजपुरवठा मिळत नसल्याने सिंचनाची सोय असूनही जमिनीला भेगा पडल्या आहेत. बहुतांश शेतकऱ्यांनी आतापर्यंत पीक वाढावे म्हणून भरपूर खर्च करून खत आणि रासायनिक औषधांची फवारणी केली आहे. सिंचनाची सोय असल्याने थोडाफार दिलासा असला तरी बहुतांश शेतकरी पावसावर पूर्णतः अवलंबून आहेत. पाहिजे त्या प्रमाणात शेतात पाणी नसल्याने फवारण्या केलेले औषधे आणि खते बिनकामी झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावण्याची शक्यता आहे.

#### पिके सुकण्याची वेळ आली

■ काही दिवसांपूर्वी पावसाने रिमझिम सुरुवात केली असताना अनेक शेतकऱ्यांनी कपाशी व मका लागवड केली. मात्र आता पाऊस अचानक गायब झाला आहे. त्यामुळे पिके सुकण्याची वेळ आली असल्याचे घोसला येथील शेतकरी ज्ञानेश्वर युवरे यांनी सांगितले. तसेच आकाशाकडे पाहून हात जोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली असल्याचे त्यांनी सांगितले.

## नागरिकांनी जीवन ज्योती विमा योजनेचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

लाभार्थ्यांस आर्थिक मदतीच्या धनादेशाचे वाटप



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

प्रधानमंत्री जीवन ज्योती या योजनेचा उद्देश कुटुंबियांना आर्थिक सुरक्षेची हमी देणे हा आहे. कुटुंबातील सदस्यांच्या आर्थिक सुरक्षिततेकरिता ही विमा योजना आवश्यक आहे, तरी जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी ह्या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत ज्योती अनिल चव्हाण यांना दोन लाख रुपये विमा रकमचे वितरण जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास या कार्यक्रमास बँक ऑफ महाराष्ट्र चे उप-विभागीय व्यवस्थापक मुकुंद कांबळे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे, गारखेडा शाखेचे व्यवस्थापक अभिनव इंगोले आदी मान्यवर उपस्थित होते. या योजनेअंतर्गत गरजू कुटुंबास आर्थिक मदतीचा लाभ मिळाला असून, भविष्यातही गरजू नागरिकांनी या योजनेचा जास्तीत लाभ घ्यावा, असे आवाहन बँक ऑफ महाराष्ट्र चे उप-विभागीय व्यवस्थापक मुकुंद कांबळे यांनी केले.

दरम्यान, १८ ते ५० वर्षे वयोगटातील नागरिकांसाठी ही योजना खुली आहे. वार्षिक फक्त ४३६ रुपयांच्या प्रीमियममध्ये २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते. मृत्यूनंतर कुटुंबियांना थेट आर्थिक मदत दिली जाते. अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या बँकेस, शाखेस भेट द्या, असे आवाहन यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रचे उप-विभागीय व्यवस्थापक मुकुंद कांबळे यांनी केले.

## लिहाखेडीच्या सरपंचपदी अनिता साखळे कायम

विभागीय आयुक्तांच्या आदेशाला ग्रामविकास मंत्र्यांची स्थगिती

सिल्लोड / प्रतिनिधी

तालुक्यातील लिहाखेडी येथील सरपंच अनिता नामदेवराव साखळे यांना विभागीय आयुक्तांनी अपात्र ठरविल्याच्या आदेशाला ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी स्थगिती दिली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या आदेशामुळे अनिता साखळे यांचे सरपंचपद कायम राहीले आहे.

सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथील सरपंच अनिता नामदेवराव साखळे यांनी गावातील मयत व्यक्तीच्या कुटुंबांना वारसा प्रमाणपत्र दिले होते. या प्रकरणी गावातील प्रकाश कौतिक साखळे यांनी विभागीय आयुक्तांकडे अपील केले होते.या प्रकरणी सुनावणी होऊन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी अनिता साखळे यांना सरपंच पदावरून अपात्र ठरविले होते. या आदेशा विरूद्ध अनिता साखळे यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या यांच्या न्यायालयात २४ जुलै रोजी अपील केले होते. या अपिलावर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी ३१ जुलै रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी घेतली. सुनावणी दरम्यान अपिलार्थी व प्रतिवादी यांचे वकील व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांनी युक्तिवाद केला. सर्वांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यावर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचया आदेशास स्थगिती देत अनिता साखळे यांचे सरपंचपद कायम ठेवले.



#### राजकीय वैमनस्यातून तक्रार

■ २७ फेब्रुवारी २०२१ रोजी विषय क्रमांक ९ नुसार तक्रारदार प्रकाश कौतिक साखळे यांनी सूचविले होते की, लाभार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र घेऊन सरपंच सहीनिशी वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे. तसेच २० फेब्रवारी २०२१ रोजीच्या मासिक बैठकीत सुध्दा सदस्यांनी वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत सुचविले होते. त्यानुसार मी वारसा प्रमाणपत्र दिले होते, परंतु ज्यांनी ग्रामसभेत वारसा प्रमाणपत्र देण्याचे सुचवले त्यांनीच पुन्हा राजकीय वैमनस्यातून तक्रार केल्याचे लिहाखेडीच्या सरपंच अनिता साखळे यांनी सांगितले. तसेच ग्रामविकास मंत्र्यांनी सरपंचपदी कायम ठेवले असतांना देखील १३ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या ध्वजारोहणापासून गटविकास अधिकाऱ्यांनी रोखले असल्याचे त्यांनी सांगितले.

## लोकसहभागातून बदलले जि. प. शाळेचे रुपडे

पिंपळगाव रेणुकाई / प्रतिनिधी

लोकसहभागातून भोकरदन तालुक्यातील जळगांव-सपकाळ येथील जिल्हा परिशद केंद्रीय प्राथमिक शाळेचे रुप बदलले आहे. शाळेचे संरक्षक भिंत (कंपाऊंड वॉल), ध्वजस्तंभ आणि झाडांना असलेल्या ओट्यावर आकर्षक चित्रे काढून शाळेचे सुशोभीकरण करण्यात आले.

भोकरदन तालुक्यातील जळगाव-सपकाळ येथील जिल्हा परिषदेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेची दूरवस्था झाली होती. त्यामुळे शाळेला बकाल स्वरुप आले होते. शाळेचे मुख्याध्यापक नासेर शेख, शालेय समितीचे अध्यक्ष गोकुळ सपकाळ, शिक्षक अशोक आराक, स्काऊट मास्टर सुभाष साबळे, नितीन बाहेकर, विजय पंडित, अनिल सपकाळ, रुपेश टाकळकर, सुरेखा मिसाळ, मानसी देशमुख, भेंडाळे, अनिता लोखंडे, अश्विनी वाघ, भिकनराव लोखंडे, संगणक प्रशिक्षक देवेंद्र बकाल आदींसह गावातील शिक्षणप्रेमी नागरिकांच्या मदतीने आडगावचे पेंटर पंकज घोरपडे यांनी शाळेच्या आवारातील भिंत, ध्वजस्तंभ आदीवर आकर्षक चित्र रेखाटून शाळेचे रुप बदलून टाकले.



#### गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम

■ जळगांव-सपकाळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड पथक, ढोलपथक, लेझीम पथक स्थापन करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी नवोदय परीक्षा, स्कॉलरशिप परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा आदी घेवून विद्यार्थ्यामधील गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक नासेर शेख यांनी सांगितले.

## 'हर घर तिरंगा, घर घर तिरंगा' अभियानांतर्गत रॅली उत्साहात



अजिंठा / प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील धावडा येथील श्री. रावसाहेब दानवे पाटील प्राथमिक आणि माध्यमिक आश्रमशाळा तसेच श्री. शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय धावडा यांच्या संयुक्त विद्यमाने धावडा येथे शाळेतील मुलांनी हातात तिरंगा झेंडा घेऊन गावातून तिरंगा रॅली गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी काढली होती.

धावडा येथे काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्यविर, सैनिक, पोलिस, शेतकरी, वारकरी यांची वेशभूषा केली होती. यावेळी ढोल पथक, लेझीम पथकाच्या गजरात विद्यार्थ्यांनी वंदे मातरम, भारत माता की जय, जय जवान, जय किसान अशा उत्स्फूर्त घोषणा दिल्या. रॅलीचा समारोप सामूहिक पसायदानाने करण्यात आला. आजादी का अमृत महोत्सव'' अंतर्गत हर घर तिरंगा अभियानात आश्रमशाळेचे मुख्याध्यापक कौतिक खडके, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रामेश्वर सुरडकर, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील डोंगरे, प्राचार्य किरण सपकाळ, दत्ता ढाकणे, मधुकर निकाळजे, देविदास काकडे, गजानन कड, बाळकृष्ण तबडे, नवनाथ इंगळे, राहुल पवार, महादेव तरमुडे, इम्रान पठाण, भानुदास खडके, मनीष बोडखे, गजानन तबडे, प्रदीप सीरसाट, सुरज पटेल, चेतन चव्हाण, हादी पठाण, विशाल खोडे, विशाल पवार, संतोष गाडेकर, गजानन तबडे, विशाल भागवत, मंगला पालकर, कुशिवर्ता काकडे, संगीता लांडगे, पूजा तबडे, अश्विनी बोराडे, रुखमन बोराडे, रतन बोरसे, वैभव काळे, मंगेश आल्हाट, पवन लेनेकर यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.

## आठ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित; सुनावणीनंतर कृषी अधिकाऱ्यांची कारवाई

परभणी / प्रतिनिधी

खतसाठा नोंदीतील तफावत, ई-पॉस मशीनवरील स्टॉक न उडविणे, दर्शनी भागात भावफलक न लावणे आदी त्रुटींमुळे जिल्ह्यातील आठ कृषी दुकानांचे परवाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण यांच्या आदेशाने निलंबित करण्यात आले आहेत.

हंगामाच्या खरीप सुरुवातीला डीएपी खताचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर युरियाच्या पुरवठ्यावरही मर्यादा आल्या. शेतकऱ्यांच्या तक्रारींनंतर जिल्हा कृषी कार्यालयाने गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक आणि भरारी पथकांमार्फत तपासणी मोहीम राबविली.

तपासणीत सहा रासायनिक खत विक्री केंद्रे आणि दोन बी-बियाणे दुकाने यांच्याकडून नियमानुसार नोंदी न ठेवणे, साठ्यातील तफावत आणि भावफलकाचा अभाव आढळून आला. ८ ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे मानवत, राणीसावरगाव, दैठणा आणि परभणी शहरातील पाच दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आले. ही कारवाई किमान सात दिवसांपासून ते जास्तीत जास्त ३० दिवसांपर्यंत लागू राहणार आहे. दरम्यान, या कारवाईनंतर कृषी बाजारपेठेत दुकानदारांमध्ये खळबळ उडाली आहे. कृषी विभागाची भरारी पथके यापुढेही कार्यान्वित राहणार असून, दुकानदारांनी निष्काळजीपणा केल्यावर त्यांच्यावर कारवाई होणार असल्याचे सांगितले.

## डोंगरी क्षेत्राच्या विकासासाठी कटिबद्ध : पालकमंत्री बोर्डीकर

परभणी / प्रतिनिधी

गंगाखेड तालुक्यासह अहमदपूर कंधार आदी परिसरातील डोंगरी भागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांतून विकास साधण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील पिंपळदरी येथे सोमवारी ६ वी डोंगरी विकास परिषद पार पडली. अध्यक्षस्थानी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष संतोष मुरकुटे होते. उद्घाटक पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची उपस्थिती होती. संयोजक प्रा. ज्ञानोबा मुंढे, भगवान सानप, सुरेश भुमरे, डॉ. सुभाष कदम, पंडितराव मुंढे आदींची उपस्थिती होती. डोंगरी भागातील गाव रस्ते- नागरी सुविधा देण्यासाठी, पिंपळदरी येथे पालखी मार्गासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणच्या माध्यमातून पिंपळदरी येथे विश्रामगृह उभारण्यासाठी व दलित वस्तीत संरक्षण भिंत उभारण्यास तातडीने उपाययोजना करू, असे आश्वासन पालकमंत्री बोर्डीकर यांनी दिले. एक ते दीड हजार डोंगरी नागरिकांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.



## आडूळ जि.प. शाळेतर्फे वृक्षदिंडी

पैठण / प्रतिनिधी

तालुक्यातील आडूळ येथील पीएमश्री जिल्हा परिषद प्रशाळेच्या विद्यार्थ्यांनी इको क्लब आणि हरित सेनाअंतर्गत रक्षाबंधनाच्या निमित्ताने शनिवार, ९ ऑगस्ट रोजी वृक्षदिंडी काढली होती. यानंतर आडुळ शिवारातील बिरोबा टेकडीवर विद्यार्थ्यांनी २०० रोपांची लागवड केली. यावेळी मुख्याध्यापिका ज्योती मादनकर यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले आणि शिक्षकांसोबत बिरोबा टेकडीवर पायी चालत जाऊन एक मूल एक झाड आणि एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले आहे. आपटा, बदाम, कडुनिंब, अशोक यांसारख्या पर्यावरणपूरक आणि सावली देणाऱ्या वृक्षांच्या रोपांची लागवड केली.

आदिवासी भिल्ल समाज जनजागृती मेळावा उत्साहात

# आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध : ना. डॉ. अशोक उईके

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहास आणण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी बुधवार, १३ ऑगस्ट रोजी केले. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत एकलव्य संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त आदिवासी भिल्ल समाज जनजागृती मेळाव्याचे आयोजन संत एकनाथ रंगमंदिर येथे करण्यात आले होते.

मेळाव्यास इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, आ. संजना जाधव, संघटनेचे संस्थापक तथा प्रदेशाध्यक्ष पवनराजे सोनवणे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब बर्डे, प्रदेश सचिव मधुकर पवार, प्रदेश संघटक सचिन कुमार बर्डे, प्रदेश संपर्क प्रमुख सुनिल गांगुर्डे, मराठवाडा युवा अध्यक्ष सुनिल ठाकरे आदी उपस्थित होते. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ उईके पुढे म्हणाले की, आदिवासी बांधवांच्या गावपाड्यांमध्ये रस्ते, वीज, शाळा, पाणी, गुणवत्तापूर्ण शिक्षण यासह आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभाग तत्पर आहे. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक ती संपूर्ण मदत केली जाणार आहे. महिलांनी स्वयंसहायता बचतगट तयार करावेत. या माध्यमातून रोजगार उपलब्ध होईल.

गावपातळीवरील शेवटचा नागरिक केंद्रस्थानी ठेऊन सरकारचे काम सुरु आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून गावपाड्यावरील समाजबांधवांचा सर्वांगिण विकास साधला जाणार आहे. घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन एकही कुटुंब या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. समाजाच्या सर्वांगिण विकासासोबतच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन बर्डे यांनी केले. तर आभार भरत बर्डे यांनी मानले.




#### आदिवासी समाजाच्या मागण्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार

■ यावेळी मार्गदर्शन करतांना इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी समाजाच्या मागण्या सोडविण्यासाठी आपण सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी आ. संजना जाधव यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. संघटनेचे संस्थापक तथा प्रदेशाध्यक्ष पवनराजे सोनवणे यांनी आदिवासी समाजाच्या अडचणी मंत्रिमहोदयासमोर मांडल्या.

## उपविभागीय जलसंधारण अधिकाऱ्याविरोधात उपोषण




वैजापूर / प्रतिनिधी

विविध प्रलंबित मागण्यांसाठी वैजापूर येथील उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्या विरोधात मुंबईतील आझाद मैदानावर संवदगाव येथील शेतकऱ्याने गुरुवार, १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरु केले आहे.

सवंदगाव येथील पाझर तलाव क्रमांक दोन साठी संपादीत क्षेत्रावर झालेले अतीक्रमण काढण्यासाठी उपविभागीय जलसंधारण अधिकारी एस.एम. राठोड हे टाळाटाळ करीत आहेत. राठोड हे कार्यालयात हजर राहत नाही. राठोड हे कार्यालयीन कामे करण्यात दप्तर दिरंगाई करतात असा आरोप करीत निवृत्ती रंगनाथ सोनवणे, रियाज खान, मोजम शेख हे मुंबई येथे आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत.

## कॅरम स्पर्धेत व्हिजन स्कूलचे वर्चस्व



**परभणी :** सोनपेठ येथे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पंचायत समिती सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेत व्हिजन पब्लिक स्कूलच्या १३ खेळाडूंनी यश मिळविले आहे. तारेख शेख, शंकर सोलंकर, अमन चव्हाण, अंजली ऊबाळे, पल्लवी चामणार, पायल पवार, आर्यन राठोड, प्रवीण राठोड, महेश भंडारे, आराध्या राठोड, समीक्षा कराड, श्रावणी कोकाटे आणि रिद्धी राठोड यांचा समावेश आहे. यशाबद्दल विठ्ठल राठोड, केतन चौधरी, प्रथमेश वाघे, सारिका पवार, शिवाजी तळेकर यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

स्वातंत्र्य दिन चिरायु होवो..!

# जालना भूमि

दैनिक महाभूमि

शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५

mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### परतूर तालुक्यातील ४० शेतरस्ते केले मोकळे

**जालना :** शासनाच्या नियमानुसार परतूर तालुक्यातील एकूण ४० शेतरस्ते खुले करण्यात आले. शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा पूर्ण लाभ मिळवून देण्यासाठी म्हणजेचे मोठे कृषी अवजारे ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर आणि शेतमालाच्या जलद व सुरळीत वाहनासाठी शेत रस्त्याची गरज आहे. शेतरस्ते उपलब्ध करुन द्यावेत, असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील परतूर तालुक्यात मागील दोन वर्षात एकूण ७६ निर्णय पारित करण्यात आले होते. यापैकी ४० रस्ते खुले करण्यात आले. तडजोडीआधारे १७ प्रकरणे निकाली काढली तर १९ प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. यात नवीन रस्ते व रस्ता मोकळा केलेली संख्या समाविष्ट आहे. सातबारा व इतर अधिकारात नोंद घेण्यासाठी मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांना आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना :** येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीमध्ये महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे दाखल करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे. महिला व बाल विकास विभागाने, पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो.

### विवेकानंद पतसंस्थेचा वर्धापन दिन उत्साहात

**जालना :** येथील स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचा २१ वा वर्धापनदिन मंगळवार, १२ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण देशपांडे, सुभाष भाले, रमेश देहेडकर, कैलास खंडेलवाल यांची तर व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, उपाध्यक्ष कैलास पवार, सचिव प्रसन्ना जाफ्राबादकर, संचालक गणपत जोशी यांची उपस्थिती होती.

## भर पावसात शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, नागरिकांची उपस्थिती

# अंबड येथे तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद





**अंबड / प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर आमदार नारायण कुचे यांचे हस्ते तिरंगा सन्मान रॅलीस हिरवा झेंडा दाखवून अंबड भाजपाच्या वतीने शहरात भव्य तिरंगा रॅलीला प्रारंभ झाला. भर पावसात २२ शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक तसेच नागरिकांच्या उपस्थितीत ५० बाय ३ मीटर लांबीचा तिरंगा झेंड्यासह प्रमुख मार्गावरून रॅली काढली. बुधवारपासून ३ दिवस विविध कार्यालयांमध्ये ध्वजारोहण करण्यात येत आहे.

अंबड शहरात आज सकाळ पासूनच रिमझिम पाऊस सुरु होता. मात्र तिरंगा रॅली निघणार असल्याने सर्व २२ शाळेतील विद्यार्थ्यांनी शहर भारत माता की जय च्या घोषनेने दनाणून गेलें होते. तिरंग्याचे तेज संपूर्ण शहरभर पसरले होते. तिरंगा फडकवून, आपल्या राष्ट्रशक्तीचे प्रतीक असलेल्या या पवित्र ध्वजाला वंदन करण्यात आले, तसेच स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांसह शुरवीर भारतीय जवानांना अभिवादन करण्यात आले. ही तिरंगा यात्रा केवळ मिरवणूक नव्हती, तर आपल्या एकतेचा, अभिमानाचा आणि अमर देशप्रेमाचा संदेश आहे. असे यावेळी आमदार कुचे म्हणाले, तसेच तिरंगा ध्वजाचे महत्त्व उपस्थितांना सांगून तिरंगा खांद्यावर घेऊन रॅलीत सहभागी झाले.

यावेळी दिपक ठाकूर, तारेख चाऊस, सौरभ कुलकर्णी, काकासाहेब कटारे, विठ्ठलसिह राणा, प्रदिप पवार, नसिर बागवान फेरोज शेख, बाळासाहेब तायडे, रमेश बुदेलखडे, बापूरात खरात, अंबादास जाधव, बाळू खरात, गंगाधर वराडे,सचिन खरात,सचिन राठोड, प्रकाश शेळके नरेश बुंदेलखंडे दत्ता जाधव भागवत गाडगे सुनील बीडे, जितू परदेशी लक्ष्मण राक्षे, प्रमोद राऊत, गजानन उबाळे व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांच्यासह शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक वृंद व देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वातावरण झाले देशभक्तीमय

■ अंबड येथे काढण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान, जय किसान, वीर जवान अमर रहे अशा गगणभेदी घोषणा दिल्या. तसेच यावेळी डीजेवर विविध देशभक्तीपर गाणी वाजविण्यात येत असल्यामुळे वातावरण देशभक्तीमय झाले होते

## सीईओ मिन्नू यांच्या आवाहनास प्रतिसाद; जिल्हाभरात श्रमदान



**जालना / प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांनी केलेल्या परिसर स्वच्छता व प्लास्टिक बंदी अंतर्गत श्रमदानास जिल्हाभरातून उत्तम प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांतर्गत ठीक ठिकाणी श्रमदानातून परिसर स्वच्छता करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांनी जिल्हा परिषदेच्या सीइओ पदाचा पदभार घेतल्यानंतर कार्यालयीन स्वच्छता, परिसर स्वच्छता या बाबीवर विशेष लक्ष दिले आहे. राज्य शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लीगसी प्लास्टिक वेस्ट कार्यक्रम अंतर्गत बुधवार, १३ ऑगस्ट रोजी श्रमदान उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार आज जिल्हा परिषद परिसरात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या उपस्थितीत श्रमदान घेण्यात आले. तसेच तालुकास्तरीय गटविकास अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व पंचायत समिती व गाव पातळीवर सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, महिला बचत गट, युवक, विद्यार्थी यांच्या सहकार्याने गावागावात प्लास्टिक संकलन, ओला कचरा व सुका कचरा संकलन करण्यात आले. शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सर्व ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात स्वच्छता विषयक शपथ घेतली जाणार आहे. या दिवसापासून तालुकास्तरावर प्लास्टिक बंदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यास दहा हजार रुपये पर्यंत दंड आकारण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू आदेशीत केले आहे.

## तिरंगा सायकल रॅलीत स्वच्छता, आरोग्याचा संदेश



**जालना / प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला जालना सायकलिस्ट ग्रूप आणि फॅब रनर्स ग्रूप, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, १४ ऑगस्ट रोजी भव्य तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली.

सकाळी ७:३० वाजता मोतीबागेजवळील छत्रपती संभाजी महाराज पुतळा येथून रॅलीला सुरुवात झाली. शनिदेव मंदिर, चमन, मस्तगड, सुभाषचंद्र बोस चौक, मामा चौक, सदर बाजार पोलीस स्टेशन, राजेंद्र प्रसाद रोड मार्गे ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे उत्साहात संपन्न झाली.

एकत्र येऊ, स्वच्छता व आरोग्य राखू ! या घोषणेसह रॅलीत स्वच्छ जालना, सुंदर जालना, बेटी पढाओ, सायकल चालवा, आरोग्य बनवा, जल है तो कल है असे प्रभावी संदेश दिले गेले. पर्यावरणपूरक प्रवास व निरोगी भविष्यासाठी नागरिकांना प्रेरणा देणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या रॅलीत प्रशांत भाले, काशिनाथ मोरे, रितेश डागा, अनिल मालपाणी, अर्जून जगताप, कैलास जाधव, भास्कर पवार, डॉ. सतीश शेकडे, दिनेश अण्णा, अजय सिंगला, जवाहर काबरा, कैलास मस्के, प्रमोद पातुरकर, शिवाजी हिवराळे, मिलिंद वासनिक, केशरसिंग राजपूत, संदीप तापडिया, विष्णू पाटेकर, बलराज शिराळे, ईश्वर बिल्लोरे, धनसिंग सूर्यवंशी, गजानन राठोड, मनोज कुमकर, डॉ. दिलीप दिवटे यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. सायकल रॅलीच्या यशस्वीतेसाठी कैलास जाधव, प्रशांत भाले आणि काशिनाथ मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तिरंगा रॅली उत्साहात...



■ **परतूर :** तिरंगा रॅली निमित्त तहसीलदार डॉ. प्रतिभा गोरे यांचा आंबा येथील केंद्रीय प्राथमिक शाळा व एक पेड मां के नाम तालुका समन्वयक यांच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी दिलीप मगर, गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके, कल्याणराव बागल, जावेद पठाण, माऊली लहाने, संजय खरात, शेख सत्तार व इतर

## एकता, बंधुत्व आणि सहिष्णुतेचा संदेश आवश्यक : ॲड. देशमुख

**अंबड / प्रतिनिधी**

देशाची फाळणी ही घटना आपल्याला सांगते की द्वेष, असहिष्णुता आणि धार्मिक कट्टरता यांचे परिणाम किती विनाशकारी असतात. सध्या समाजात अविश्वासाचे सावट पसरले. म्हणूनच एकतेचा, बंधुत्वाचा आणि सहिष्णुतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आपले कर्तव्य आहे. असे प्रतिपादन ॲड. उषा देशमुख यांनी केले.

शहरातील महर्षी कणाद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात गुरूवार, १४ ऑगस्ट रोजी अखंड भारत दिनानिमित्ताने ''विभाजन विभीशीका'' अर्थात फाळणीची शोकांतिका या विषयावरती ॲड. देशमुख यांचे व्याख्यान झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.धानोरकर, गट निदेशक प्रा.आर. जी.डोईजड यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी पुढे देशमुख म्हणाल्या, ''विभाजन विभीषीका'' म्हणजे १९४७ साली भारताच्या फाळणीदरम्यान घडलेली मानवी शोकांतिका. धार्मिक आधारावर भारत आणि पाकिस्तान अशी विभागणी झाली. परंतु त्याचे परिणाम अत्यंत भीषण होते. लाखो लोकांना आपली घरे, जमीन-जुमला, गाव सोडून स्थलांतर करावे लागले. सांप्रदायिक दंगली, हत्या, बलात्कार, लुटमार यामुळे लाखो निरपराधांचे प्राण गेले, आणि कोट्यावधी लोक बेघर झाले. नात्यागोत्यांचे बंध तुटले, समाजात अविश्वासाचे सावट पसरले. ही घटना आपल्याला सांगते की द्वेष, असहिष्णुता आणि धार्मिक कट्टरता यांचे परिणाम किती विनाशकारी असतात. म्हणूनच एकता, बंधुत्व आणि सहिष्णुतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आपले कर्तव्य आहे. आयटीआय मधील प्रशिक्षणार्थ्यांनी फक्त पोटार्थी नोकरी न करता राष्ट्रीय एकात्मता भाव डोक्यामध्ये ठेवून सर्वांसोबत राहिले पाहिजे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमास निदेशक के. के. मगर, एस. ए. भोजने, योगेश आठवले, बाबासाहेब खरात यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन निदेशक दत्ता चौधरी यांनी केले तर आभार संतोष दह्याळकर यांनी मानले.

## स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा द्या : लहुजी शक्ती सेनेची मागणी

**जाफ्राबाद :** मातंग समाजासाठी स्वतंत्र स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी या मागणीचे निवेदन लहुजी शक्ती सेनेच्या वतीने महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना तहसीलदारामार्फत सोमवार, ११ ऑगस्ट रोजी देण्यात आले.जाफ्राबाद शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीत गेल्या अनेक वर्षापासून मातंग समाज मृतांवर अंत्यसंस्कार करीत आहे. परंतु सार्वजनिक स्मशानभूमीत जाण्यासाठी चांगला रस्ता नसल्याने अत्यंविधीसाठी आलेल्या नातेवाईकांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे मातंग समाजाला स्मशानभूमी उभारण्यासाठी गट क्रमांक १६४ मध्ये असलेल्या २ हेक्टर ८६आर जमीनीपैकी ४० आर जागा देण्यात यावी अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. तहसीलदारांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात लहुजी शक्ती सेनेचे तालुकाध्यक्ष अमोल दांडगे, निलेश निकाळजे, पवन गंगावणे, गौतम चव्हाण, विकास गोफने, रोहीत गोफने आदींचा समावेश होता.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा शिवरुद्र योगी महाराजांचा इशारा



**भोकरदन / प्रतिनिधी**

तालुक्यातील खादगाव येथील शासकीय गायरानातील अतिक्रमण निष्कसित करण्याच्या मागणीसाठी शिवरुद्र योगी महाराज यांचा तीन वर्षांपासून पाठपुरावा सुरु आहे. उपविभागीय अधिकाऱ्यासह तहसीलदाराकडून लेखी आश्वासन मिळाले, परंतु काहीच कारवाई होत नसल्याने शुक्रवार १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहणासमोर आत्मदहन करण्याचा इशारा शिवरुद्र योगी महाराज यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

खादगांव येथील शासकीय गायरान गट क्र. ५७ मध्ये ९० एकर जमीन आहे. या जमिनीत काही लोकांनी चार चार, पाच पाच एकरात ताबा करून मंदिर परिसरातील जमिनीवरही अतिक्रमण केले आहे. याठिकाणी शिवशक्ती कैलास आश्रम असून भव्य मंदिर उभारण्याचे काम प्रगती पथावर सुरु आहे. येथील अतिंक्रमण काढण्यात यावे, या मागणीसाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.

याकडे दुर्लक्ष करत असल्याने शिवरुद्र योगी महाराज यांनी ३१ जूलै रोजी खादगांव येथील शिवशक्ती कैलास आश्रम महाकालेश्वर मंदिरासमोर एक खड्डा करून संजिवन समाधीसह अमरण उपोषणा सुरु केले होते. यासंदर्भात तत्कालीन उपविभागीय अधिकारी सारीका भगत यांनी तहसील कार्यालयात बैठक घेतली होती. यावेळी या अतिक्रमणधारकांना नोटीस देवून नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असे प्रशासनाने लेखी आश्वासन दिले होते.

त्यामुळे संजीवन समाधी आंदोलनासह आमरण उपोषण मागे घेतले होते. मात्र अद्यापपर्यंत एकही कारवाई महसूल प्रशासनाने केली नसल्याचा आरोप शिवरुद्र योगी महाराज यांनी केला आहे.

## कै.नानासाहेब पाटील विद्यालयातील शिक्षकांचे उपोषण

**जालना / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पांगरी ता. बदनापूर येथील कै.नानासाहेब पाटील विद्यालयातील अन्यायग्रस्त शिक्षकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. येथील जिल्हा परिषदेसमोर गुरूवार, १४ ऑगस्ट रोजी शिक्षक, कर्मचाऱ्यांनी या आंदोलनाला सुरूवात केली.

शालेय प्रशासनाकडून होणाऱ्या आर्थिक व मानसिक छळ थांबवा, आमच्याकडून जबरदस्तीने घेतलेली पैसे परत द्यावे, मुख्याध्यापकाकडून होणारी दमदाटी व शिवीगाळ बंद करणे, शासन नियमाप्रमाणे शाळेची वेळ करावी, थकीत वेतन देण्यात यावे, शिक्षक हजेरीपटावर नियमित स्वाक्षरी घेण्यात यावी, सेवा पुस्तिकेचे दुय्यम प्रत देण्यात यावी, शालेय पोषण आहाराच्या गैर व्यवहाराची चौकशी करून दोषीवर कार्यवाही करावी, जबरदस्तीने स्वाक्षरी घेऊन घेतलेले कोरे धनादेश परत करण्यात यावे आदी मागण्यांसाठी शिक्षकांनी हे उपोषण सुरू केले आहे.

## आठ दिवसात ३५ दुचाकी जप्त

# मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**परतूर / प्रतिनिधी**



जालना जिल्हयात मागील काही दिवसांपासून धूमाकूळ घालणाऱ्या मोटारसायकल चोरांच्या टोळीचा पोलीसांनी पर्दाफाश केला. परतूर पोलीसांनी आणखी एकाला जेरबंद करीत त्याच्या ताब्यातून ११ दुचाकी जप्त केल्या आहे, आतापर्यंत पाच आरोपींना गजाआड करण्यात आले असून गेल्या आठ दिवसात तब्बल १७ लाख रूपये किंमतीच्या ३५ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे.

जिल्ह्यातील गुन्हेगारी घटना नियंत्रनात आणण्यासाठी, तसेच वाढत्या दुचाकी चोरांच्या टोळीचा बंदोबस्त करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल यांनी सर्व ठाणे प्रमुखांना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिस प्रशासन सतर्क झाले होते. परतूर पोलीसांनी दुचाकी चोरीच्या तपासाठी एक पथक तयार केले होते. सुरूवातीला या पथकाने विष्णू दादाराव माने रा. लिंगसा, वैभव ज्ञानेश्वर धरपडे, रा.सादोळा, सुभाष उर्फ राजेश प्रभाकर जाधव रा.लिंगसा ता. परतूर या तिघांच्या मुसक्या आवळल्या होत्या. या आरोपींनी जालनासह छत्रपती संभाजीनगर, बीड जिल्हयातील वेगवेगळया ठिकाणाहून मोटारसायकली चोरी केल्याची कबूली दिली होती. ४ ऑगस्ट रोजी या आरोपींच्या ताब्यातून एकूण ९ लाख ४० हजार रूपये किमतीच्या १३ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या होत्या. बुधवार, १३ ऑगस्ट रोजी केलेल्या दुसऱ्या कारवाईत सुरेश भगवान आबूज, रा आबुजवाडी, ता. माजलगाव, जि.बीड याला बेडया ठोकल्या. त्याच्या ताब्यातून ७ लाख ७० हजार रूपये किंमतीच्या ११ चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे. जाफ्राबाद पोलीसांनी ७ ऑगस्ट रोजी कडूबा लक्ष्मण बिलगे, रा.मेरखेडा याला अटक केली. त्याच्या ताब्यातून एक चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. यामध्ये आणखी काही चोरटे गळाला लागणार असल्याची शक्यता पोलीसांनी वर्तवली आहे.

### यांनी केली कारवाई...

■ ही कारवाई पोलिस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक एस.बी.भागवत, उपनिरीक्षक अमोल रावते, अंमलदार धर्मा शिंदे, अशोक गाढवे, किरण मोरे, गजानन राठोड, विजय जाधव, भागवत खाडे, अमोल गायकवाड, राम हाडे, नरेंद्र चव्हाण, दशरथ गोपनवाड, सॅम्युअल गायकवाड, पवनकुमार धापसे यांच्या पथकाने केली.

## न्यू हायस्कूल शाळेतर्फे रॅली

**भोकरदन :** येथील न्यू हायस्कूल शाळेच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीला शहरातून मोठा प्रतिसाद मिळाला. मुख्याध्यापक नन्नावरे. उपमुख्याध्यापक माळी यांच्या मार्गदर्शनाखाली व सर्व शिक्षकांच्या पुढाकाराने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेत भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. देशप्रेम जागवणारे फलक, बॅनर्स आणि घोषवाक्यांनी रॅली सजवली होती. या रॅलीला भोकरदन पोलिस प्रशासनाने शिस्तबद्धतेने रॅलीचे मार्गदर्शन केले व सुरक्षिततेची दक्षता घेतली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे बीज रोवण्याचा तसेच राष्ट्रीय झेंड्याबाबत आदरभाव निर्माण करण्याचा प्रयत्न शाळेच्या वतीने करण्यात आला.

## महिलेस धान्य, साहित्याची मदत



**धावडा / प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यतील पोखरी येथील सुलाबाई राजाराम घुले या वयोवृध्द गरीब आजीबाईला मोफत धान्य वाटप करण्यात आले. यामध्ये ४० किलो गहू, १० किलो तांदूळ आणि किराणा साहित्याचा समावेश आहे. अंगारिका संकष्टी चतुर्थीनिमित्त जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा तसेच सामाजिक भावनेतून मराठवाडा ग्रामीण को आपरेटीऊ क्रेडिट सोसायटीचे अध्यक्ष मोहन सुरेश लुटे यांच्यातर्फे सुलाबाईस ही भेट देण्यात आली.

यावेळी प्रभाकर लुटे, अमोल लुटे, दिनु लुटे, गंजीधर घुले, गंगाधर लुटे, प्रमोद घुले, सोमनाथ घुले, दीपक गाडे, योगेश लुटे, अजय लुटे, अरुण घुले, किरण लुटे, रामधन शेळके, राजू वरपे, अभिषेक गाडेकर, मनिषा आल्हाट आदींची उपस्थीती होती.

# सिरसोलीतील शेतकऱ्यांना अनियमित वीजपुरवठ्याचा फटका

**सिरसोली :** महावितरणच्या आकोली रूपराव येथील उपकेंद्रातून सिरसोली गावाला वीजपुरवठा केला जातो; मात्र काळेगाव शिवारातील किरकोळ बिघाड दूर न केल्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून शेतीसाठीचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे.

स्थानिक शेतकऱ्यांच्या मते, संबंधित वायरमन वेळेवर अडचणी दूर करत नसल्याने पिकांना पाणीपुरवठा आणि फवारणी करण्यात अडथळे येत आहेत. परिणामी कीडनाशक फवारणी न झाल्याने पिकांवर अळ्यांचा प्रकोप वाढून उत्पादनाचे नुकसान होत आहे. ''गेल्या अनेक दिवसांपासून लाईन बंद असल्यामुळे फवारणी होऊ शकली नाही, अळ्यांचा प्रादुर्भाव वाढला आणि पीक खराब झाले. यासाठी काळेगाव येथील महावितरण कर्मचाऱ्यांची निष्क्रियता जबाबदार आहे,'' असे वैभव हरणे, शेतकरी, सिरसोली यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना तत्काळ लक्ष घालून वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली आहे.

**जलसाठ्यात वाढ : तापमानात घसरण; हवेतही गारवा**

# शहरात दिवसभर संततधार; पुढील ४८ तासांत सर्वत्र बरसणार



**अकोला / प्रतिनिधी**

दोन आठवड्यांपासून शहरासह ग्रामीण भागातील तापमानात कमालीची वाढ होवून नागरिक उकाड्याने हैराण झाले होते तर शेतकऱ्यांच्या नजरा देखील आकाशाकडे लागल्या होत्या. दरम्यान बुधवारी कमी अधिक प्रमाणात पावसाने दिवसभर हजेरी लावली. तर पुढील दोन दिवस जोरदार पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

जिल्ह्यात यंदा जून महिन्याच्या अखेरीस पावसाने हजेरी लावली. त्यामुळे पेरणीला विलंब झाला. जुलै महिन्यात जोरदार पाऊस झाल्याने पिकांना संजीवनी मिळाली. दरम्यान दोन अडीच आठवड्या पासून जोरदार पावसाची प्रतीक्षा शेतकरी वर्गाला होती. बुधवारी महानगरासह जिल्ह्यात पावसाने लावली. सकाळपासून सुरू झालेल्या पावसाची रात्री उशिरा पर्यंत रिपरीप सुरूच होती. नागरिक रेनकोट व छत्री घेऊनच घराबाहेर पडल्याचे चित्र बुधवारी दिवसभर दिसून आले. आणखी दोन दिवस पावसाचे राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. जुने शहरातील किल्ला चौक ते पोळा चौक दरम्यान रस्ता संपूर्ण तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे पावसामुळे परिसरात पाणी साचले होते. तर डाबकी रोडच्या रुंदीकरणाचे काम देखील अर्धवट असल्याने रस्त्यावर चिखल साचला होता. त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागला.

**६४२ हेक्टरवरील पिकांना फटका**

- आकोट व पातूर तालुक्यात ९ ते १२ ऑगस्टदरम्यान झालेल्या पावसाने ६४२ हेक्टरवरील सोयाबीन, तूर, कापूस या पिकांना फटका बसल्याचा प्राथमिक अहवाल जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला आहे. यामध्ये आकोट तालुक्यातील १२ गावातील ६१५ हेक्टर, पातूर तालुक्यातील तीन गावातील २७ हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. संयुक्त सर्वेक्षणानंतर अंतिम अहवाल मदतीसाठी शासनाला पाठविण्यात येणार आहे.

**रात्रभर पावसाने झोडपले**

- बाळापूर मधील वाडेगाव, बार्शिटाकळ, पिंजर, आकोट, चोहोट्टा बाजार, करोडी, देवरी, दहिहंडा, कुटासा, याशिवाय आकोट व तेल्हारा भागांत सुद्धा काही प्रमाणात पावसाने हजेरी लावली. मूर्तिजापूर तालुक्यातही सर्वदूर पाऊस बरसला. सकाळी वाजता पासून सुरु झालेलेल्या पावसाची संततधार रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

शुभेच्छुक
दैनिक महाभूमि निर्मळ, निकोप, नि:पक्ष
द्वितीय वर्धापन तसेच स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
लेक वाचवा, लेक शिकवा
पाणी वाचवा, जीवन वाचवा
झाडे लावा, झाडे जगवा
सुरेश जाधव
अध्यक्ष, शयशोदीप मजूर कामगार सहकारी संस्था, देवानगर
संकलन - सुधाकर डोंगरदिवे, बिबी पत्रकार - 9309899046

विनम्र अभिवादन..!
येळगाव धरणाचे प्रणेते, कृषीप्रेमी आणि शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे...
माजी आमदार स्व.रा.दे.ऊर्फ भोंडे सरकार यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन !
अभिवादन कर्ते
। डॉ.ए.एम.गारोडे (माजी प्राचार्य) । डॉ.मिना निकम-चिंचोले (माजी प्राचार्य)
। प्रोफेसर डॉ.धनराज बोबडे । प्रोफेसर डॉ.राजू गवई
। प्रोफेसर डॉ.संतोष कुंभारे । प्रा डॉ.जगदेव जाधव । प्रा.ए.के.वाघ
। प्रा डॉ.अविनाश कदम । प्रा डॉ.विजयश्री मिलिंद हेमके-धुंदळे
। श्री.रामदास सखाराम भोंडे । श्री विश्वनाथ दौलत सावळे
। श्री.अनिल चाटे । श्री.आर.आर.करपे । प्रा.डी.एम.कानडजे

दैनिक महाभूमि द्वितीय वर्धापन तसेच स्वातंत्र्य दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
शुभेच्छुक
उध्दवराव किसनराव कुटे
अध्यक्ष, श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशिय संस्था खैरव
उमेश कुटे पाटील
उपाध्यक्ष, श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशिय संस्था खैरव
तथा सर्व संचालक मंडळ
श्री.संत गजानन महाराज बहुउद्देशिय संस्था खैरव
संकलन - सुधाकर डोंगरदिवे, बिबी पत्रकार - 9309899046

समस्त देशवासीयांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !
आमदार डॉ.संजयजी कुटे यांच्या अभिनव कल्पकतेतुन आणि विकासात्मक दृष्टीकोनातुन जळगांव जामोद मतदार संघाच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या
प्राथमिक आरोग्य केंद्र, वैद्यकिय अधिक्षक कार्यालय व प्रसुतीगृह, शवविच्छेदन गृह, तहसिल कर्मचारी निवासस्थान, तहसिल कार्यालय व अंबाबरवा येथे बंजी इजेक्शन,स्कायलाईन,झिपलाईन,टेंट रिसॉर्ट
इत्यादी बांधकामाचा सुमारे 20 कोटी रुपये किमतीच्या विकास कामांचा
लोकार्पण सोहळा
- शुभहस्ते -
श्री.मा.आ.डॉ.संजयजी श्रीराम कुटे
आमदार,जळगांव जामोद विधानसभा
शुक्रवार दि.15 ऑगष्ट 2025

| क्र. | कामाचे नांव | किंमत | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | धानोरा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकाम | 331 लक्ष | सकाळी 11.00 वा. |
| 2 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे शवविच्छेदनगृह इमारत बांधकाम | 85 लक्ष | दुपारी 12.00 वा. |
| 3 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे वैद्यकिय अधिक्षक कार्यालय बांधकाम | 87 लक्ष | दुपारी 12.10 वा. |
| 4 | ग्रा.रु.जळगांव जामोद येथे आयुष्यमान भारत अंतर्गत प्रसुतीगृह नुतणीकरण | 67 लक्ष | दुपारी 12.20 वा. |
| 5 | संग्रामपुर येथे शासकिय सामाईक निवासस्थान बांधकाम | 681 लक्ष | दुपारी 12.30 वा. |
| 6 | संग्रामपुर येथे नविन तहसिल कार्यालय इमारत बांधकाम | 680 लक्ष | दुपारी 01.00 वा. |
| 7 | अंबाबरवा येथे स्कायलाईन,बंजी इजेक्शन, झिपलाईन व टेंट रिसॉर्ट निर्माण करणे. | 100 लक्ष | दुपारी 02.00 वा. |

- प्रमुख उपस्थिती -
मा.डॉ.किरणजी पाटील, जिल्हाधिकारी,बुलडाणा
मा.डॉ.दत्तात्रयजी बिराजदार, जिल्हा शल्यचिकित्सक, बुलडाणा
मा.राहुलजी एस.टोलीया, उपवनसंरक्षक,अकोट वन्यजीव विभाग
मा.डॉ.अमोलजी गिते, जिल्हा आरोग्य अधिकारी,बुलडाणा
मा.शैलेंद्रजी काळे, उपविभागीय अधिकारी,जळगांव जामोद
मा.एकनाथजी तळेले, कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग,खामगांव
मा.श्री.सुशिलजी गुडदे, कार्यकारी अभियंता,जि.प.बा.विभाग,बुलडाणा
- विनित -
प्रशांत पाटील, तहसिलदार, संग्रामपूर
डॉ.उल्हास भराड, वैद्यकिय अधिक्षक,ग्रा.रु.जळगांव जामोद
डॉ.उज्वला पाटील, तालुका आरोग्य अधिकारी,जळगांव जामोद
अजय बावणे, वनपरिक्षेत्र अधिकारी,सोनाळा
प्रविण फुंडकर, स.अ.श्रेणी-1 सा.बा.उपविभाग,जळगांव जा.
संजय गोरे, उपविभागीय अधि.जि.प.बां.विभाग,जळगांव जामोद

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 715



**-: आडवी विधाने :-**

1) दूसरा करतो त्याचप्रमाणे करणे, अनुकरण
4) सबळ स्त्री
6) जानेवारीत सूर्य मकर राशीत जातो त्या दिवशी करण्यात येणारा उत्सव , उत्तरायणाचा आरंभ
9) मौज, गंमत
10) रामायणात सीता हरणात रावणाला विरोध करणारा एक पक्षी
11) फर्निचरसाठी उत्कृष्ट अशी लाकडाची एक जात
12) लहान मुलांना भय दाखविण्यासाठी उभा केलेला पुतळा
14) रूप्ये, चांदी
17) प्रौढ वयाचा
18) प्रबळ, इच्छा
19) श्री काशी क्षेत्राची संरक्षक देवता, शंकराचा एक अवतार
24) बर्फ
25) गरजू लोकांना व्याजाने पैसे कर्जाऊ देणारा
28) आराधना, पूजा
30) डुक्कर
33) कॉलम, स्तंभ
35) भटकणे, प्रवास करणे
38) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा
40) उरलेले, शिल्लक, शेष
41) शक्ती, सामर्थ्य
42) हानिकारक
43) काही एक चिन्ह
45) आपल्या मनास येईल तसेच वागण, स्वच्छंदी
47) प्राणिसंग्रहालय (इं.)
48) गणितात संख्येच्या मांडणीत उजवीकडून डावीकडे दूसरे स्थान
49) चार युगांपैकी पहिले
52) महाभारतात दुर्योधनाचा कपटी मामा
54) तप, तपश्चर्या
55) बलरामाच्या पत्नीचे नाव, सत्ताविसावे नक्षत्र
57) सारख्या अंतरावरच असलेले
60) देण्याची ऐपत
61) अंतरिक्ष, आकाश, अवकाश
62) भित्रा, भेकड, लाक्षणिक अर्थाने भित्रा पुरूष
63) भांडखोर मनुष्य, खलनायक, दुष्ट मनुष्य
66) मदत, एकमेकांचे सहाय्य
67) आजोबांचे वडील
68) जलद पेट घेणारे, लवकर जळण्याला योग्य असलेले
69) पावित्र, साखरेची चाचणी

**-: उभी विधाने :-**

1) जाणीव नसलेला, अज्ञानी, निरागस
2) सारख्या वयाचे
3) सुटी, परवानगी
4) सूट, कसर
5) अतुलनीय, बेजोड, निरूत्तर
6) मोर
7) पाताळ
8) सोबत, सह
13) वाचाळ, बडबडया
15) शहरात येणाऱ्या मालावर जेथे स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारा कर आकारला जातो. ते ठिकाण
16) गायनात उच्च स्वरापासून नीच स्वरापर्यंत स्वरांचे आवर्तन, खाली उतरणे
20) श्रीशंकराचा एक अवतार
21) शोभिवंत आकर्षक कमान
22) तबल्याच्या आवाजातील कालमापन, ठरवून दिलेले काम, मक्ता
23) दया, मेहरबानी
26) समुद्राची अधिष्ठात्री देवता
27) शरीरात रक्ताचा संचार करविणारी शीर
28) उद्धट, फाजील, असभ्य
29) जिंकणे, माळ
31) कधी न चुकणारे, गुणकारी अचूक
32) पारदर्शक व पापुद्रयांनीयुक्त खनिज पदार्थ
34) नावाचा उल्लेख
36) रिकामा, रिक्त
37) भिन्न–भिन्न मते
39) प्रमाणे, सारखे
42) हिंदू पंचागानुसार महिन्याचा शेवटचा दिवस, ज्या रात्री चद्राने आकाशातून रजा घेतली असते ती रात्र
44) अंदाज, कयास
46) विचार, अभिप्राय
49) शेतकी, शेतीविषयक
50) ज्योतिष्य शास्त्रात प्रजापती नावाचा ग्रह
51) तृण, तण
53) ऐपत, शक्ती, सामर्थ्य
56) कुळाचे नाव भूषविणारा, वंशाचा दिवा
58) सार्वभौमत्व स्थापित केलेल्या राजाच्या अधिपत्याखालील लहान लहान राजे
59) हेळसांड
61) अंधार, तम, काळोख
62) व्याख्यान, बोलणे
64) चेहरेपट्टी, सौंदर्य
65) पाणी पिण्याचे पात्र
66) आपले हस्ताक्षर

( उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | तो | त्स | व | | स | मा | न | | अ | नु | क | र | ण | |
| र | ग | ड | | सं | ग | ण | क | | | जा | | प | त | | पा |
| धा | म | | | त | ण | | ड | म | रू | | बो | ट | | जो | र |
| वा | | का | न | | | टी | | ज | प | मा | ळ | | ख | ड्ड | वा |
| | | म | त | भे | द | | का | कु | | ल | व | ण | | क्ष | |
| मे | ष | | म | द | | वा | न | र | कि | व | ण | | न | र | म |
| | | ह | स्त | क | ला | | उ | | | णे | | सु | | | हा |
| ए | क | ट | क | | ज | | घ | न | ता | | स | गा | सो | य | रा |
| क | | वा | | अ | व | घ | ड | | टा | च | | वा | म | | ष्ट्र |
| ल | क्ष | दी | प | | णे | | णी | | खा | | बा | ला | | आ | दि |
| कों | | | द | ही | | म | क | रा | ल | य | | ग | स्त | | न |
| डा | व | खो | रा | | का | त | र | | चे | | उ | णे | | अ | |
| | ज | का | त | ना | का | | णे | | मां | ज | र | | जा | व | क |
| सु | न | | घे | र | | आ | | | ज | म | वि | णे | | रो | म |
| मं | दा | व | णे | | प | रो | प | का | र | | णे | | मो | ह | र |
| त | र | | | बो | ल | प | ट | | | गो | | च | र | ण | |

uday munde - 8446302691

# जाहिर नोटीस

**विद्यमान ४ थे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कोर्ट बुलडाणा**

दि.कि. अर्ज क्र. १५७/२०२५
दा.ता. २८/०७/२०२५
चौ.ता १६/०९/२५

१. सिंधुताई विष्णू इंगळे वय-४३ वर्षे, धंदा- घरकाम
२. देवांग विष्णू इंगळे वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण
३. स्वरा विष्णू इंगळे वय-१४ वर्षे, धंदा-शिक्षण तर्फे अ.पा.क. आई अर्जदार क्र.१ सर्व रा.टिचर कॉलनी जिजामाता नगर बुलडाणा, ता.जि. बुलडाणा मो.नं.

... अर्जदार

विरुध्द : कोणीही नाही

विरुध्द : कोणीही नाही

गैरअर्जदार

या जाहीर नोटीसव्दारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. बुलडाणा यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्ज केला आहे. अर्जदार क्र.१ चे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडिल विष्णू बाजीराव इंगळे यांचे दि.०५/०६/२०२५ रोजी आजाराने निधन झाले असून अर्जदारांना खाजगी व इतर शासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरिता अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८(२) चे तरतूदीनुसार मय्यत विष्णू बाजीराव इंगळे यांचे कायदेशिर वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

त्याअर्थी वरील प्रकरणामध्ये ज्यांना कोणाला सदर अर्जाविरुध्द आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी दि.१६/०९/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी त्यांनी सकाळी ११.०० वाजता वरील नमूद न्यायालयात व्यक्तीगत किंवा निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. तसेच आपला लेखी आक्षेप / हरकत ही जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ते ३० दिवसाचे आत दाखल करावी. तसे न केल्यास सदर अर्जाबाबत कोणालाही आक्षेप / हरकत नाही, असे समजून अर्जाची सुनावणी होवून योग्य तो आदेश पारीत केल्या जाईल, याची नोंद घ्यावी. आज दि. ६/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने प्रसिध्द केले आहे.

आदेशावरून

शिक्का

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधीश व.स्तर
बुलडाणा

## न्यूज ब्रीफ

### चोरीच्या उद्देशाने फिरणारे दोघे पोलिसांच्या जाळ्यात

**वाशिम :** मालेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने मध्यरात्रीच्या गस्तीत लहुजी उस्ताद पुतळ्याजवळ कारवाईत चोरीच्या उद्देशाने फिरणारे दोन तरुण रंगेहात पकडले. १३ ऑगस्ट रोजी पहाटे दीड वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी आकाश रमेश सरकटे (२४) आणि अजय काशीराम धबडघाव (२७, दोघे रा. गांधी नगर, मालेगाव) हे चेहऱ्यावर कापड बांधून लहुजी उस्ताद पुतळ्याजवळ बांधकाम सुरू असलेल्या इमारतीजवळ फिरत होते. पोलिसांना पाहून त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र गस्त पथकाने तत्काळ पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. विचारपूस केली असता समाधानकारक उत्तर न दिल्याने, त्यांच्या विरोधात पोउपनि दिलीप रहाटे यांच्या फिर्यादीवरून कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलिस हवालदार सुनील पवार हे करत असून, पुढील कार्यवाही सुरू आहे.

### रिसोड बसस्थानक परिसरातून संशयित अटक

**वाशिम:** रिसोड बसस्थानक परिसरात १२ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीच्या सुमारास संशयास्पदरीत्या थांबलेल्या व्यक्तीस पोलिसांनी पाठलाग करून पकडले. त्याच्याविरोधात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार,एक व्यक्ती अंधारात संशयास्पदरीत्या बसलेली आहे. पोलिस पाहताच ती व्यक्ती पळ काढू लागली. तत्काळ पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. तपासात त्याचे नाव बबन हरिभाऊ फुफाटे (रा. घोसरी, ता. रिसोड) असे समोर आले. अंधारात थांबण्याचे कारण विचारले असता समाधानकारक उत्तर न दिल्याने व उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा नोंदवला. पुढील तपास पो. उप.नि. सचिन गोखले करीत आहेत.

### अडाण प्रकल्पातून पाणी विसर्ग; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**कारंजा :** अडाण मध्यम प्रकल्प (ता. कारंजा) येथील पाण्याची पातळी १४ ऑगस्ट रोजी ३८०.६४ मीटरवर पोहोचली असून प्रकल्पाची पूर्ण संचय पातळी ३८२.५० मीटर आहे. सध्या उपयुक्त साठा ४९.५४ दशलक्ष घनमीटर असून तो ७३.६७ टक्के आहे. गुरुवारी दिवसभरात ३३ मि.मी. पाऊस नोंदविला गेला असून आतापर्यंतच्या हंगामातील एकूण पर्जन्यमान ४९४ मि.मी. झाले आहे. वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे प्रकल्पातील २ गेट प्रत्येकी १० सें.मी. उघडण्यात आले असून २१.२८ घनमीटर प्रति सेकंद प्रमाणे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पाणी विसर्गामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्क राहावे.

### जिल्ह्याचा सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश

# सर्वसमावेशक व समतोल विकासाला प्राधान्य : पालकमंत्री

**वाशिम/ प्रतिनिधी**

जिल्हा नियोजन समितीअंतर्गत योजना व उपयोजना मिळून ४०६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असून त्यातून पायाभूत सुविधा उभारणीसह सर्व घटकांसाठी सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. 'समतोल व सर्वसमावेशक विकासासाठी आम्ही कटीबद्ध आहोत,' असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत केले.

बैठकीस खासदार संजय देशमुख, आमदार भावना गवळी, किरण सरनाईक, बाबूसिंग महाराज राठोड, वसंत खंडेलवाल, अमित झनक, श्याम खोडे, सई डहाके, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,




मुख्याधिकारी निलेश गायकवाड, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर आदी उपस्थित होते. यावर्षी मंजूर ४०६.०७ कोटींच्या नियतव्ययापैकी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेसाठी ३१५ कोटी, विशेष घटक योजनेसाठी ७७ कोटी, तर आदिवासी उपयोजनेसाठी १४.०७ कोटी रुपये आहेत. सर्व यंत्रणांनी तातडीने मागण्या सादर करून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

#### ९४.५० कोटी प्राप्त

जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर ३१५ कोटींपैकी २०.९८ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली असून, ९४.५० कोटी रुपये (मंजूर निधीच्या ३०टक्के) शासनाकडून ४ ऑगस्ट रोजी प्राप्त झाले आहेत. विशेष घटक योजनेत मंजूर ७७ कोटींपैकी ५१. ४९ लाख रुपये पूर्ण खर्च झाले आहेत. आदिवासी उपयोजनांतर्गत मंजूर १४.०७ कोटींपैकी ५७.१२ लाख वितरित झाले असून त्यापैकी २५.५० लाख खर्च झाले आहेत.

#### प्रत्येक तालुक्यात एमआयडीसीसाठी प्रयत्न

बैठकीत ग्रामीण-शहरी विकास, पाणीटंचाई, शेती, आरोग्य, क्रीडा व तीर्थक्षेत्रांचे श्रेणीवर्धन यासारख्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून विविध विभागांना निधी दिला जातो. या निधीचा उपयोग सर्वसामान्य नागरिकांसाठी होईल याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांवर प्रशासनासोबतच लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करावा. जिल्ह्यात चियाचे उत्पादन दर हेक्टरी चांगले मिळत असून यासाठी शेतकऱ्यांना चिया पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहीत करावे. तसेच प्रत्येक तालुक्यात औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) उभारण्यासाठी प्रयत्न करावेत. अशा सूचना पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.

#### प्रशासकीय दिरंगाई सहन केली जाणार नाही

विकासकामे करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी तातडीने मागण्या सादर करून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळवावी, असे निर्देश पालकमंत्री भरणे यांनी दिले. जिल्ह्याचा विकास समतोल व्हावा यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. मंजूर निधीच्या प्रभावी खर्चासाठी सर्व यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करावे. प्रशासकीय दिरंगाई किंवा कामांच्या गुणवत्तेत चालढकल सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## रानभाजी महोत्सव आणि कृषी उपक्रम उत्साहात



**वाशिम :** 'शेतकरी हा आपल्या कृषी संस्कृतीचा आत्मा असून त्यांच्या श्रमामुळेच राज्याची अर्थव्यवस्था बहरते. नाविन्यपूर्ण शेती पद्धती, सेंद्रिय शेती आणि तंत्रज्ञानाचा संगम घडवून अधिक उत्पादनक्षमता साध्य करणे ही आजची गरज आहे. शासनाच्या सर्व योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहे. शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात मी कायम त्यांच्या पाठीशी उभा राहीन,' असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

शहरातील स्व. बाळासाहेब ठाकरे प्रशिक्षण केंद्र, काटा रोड येथे रानभाजी महोत्सव, वाशिम शेती शिल्प कृषी विपणन विक्री केंद्राचे उद्घाटन आणि वत्सगुल्म स्मार्ट पीक पेरणी स्पर्धा पारितोषिक वितरण सोहळा या विविध कृषी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री भरणे यांच्या हस्ते झाले. वत्सगुल्म स्मार्ट पेरणी स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांनी नाविन्यपूर्ण व शास्त्रशुद्ध पेरणी पद्धतीचा अवलंब करून उत्पादनक्षमतेत वाढ साधली. विजेत्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

#### महोत्सवात विविध कृषी उपक्रम

जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव, सेंद्रिय शेती उत्पादन विक्री, डेअरी उत्पादन विक्री, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नती योजना अंतर्गत उत्पादन विक्री यांसारखे उपक्रम भरविण्यात आले. या माध्यमातून शेतकरी, महिला बचतगट, कृषी उद्योजक आणि स्थानिक उत्पादकांना थेट बाजारपेठ उपलब्ध झाली. रानभाज्यांचे पोषक मूल्य, स्थानिक परंपरा आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व याबाबत जागरूकताही निर्माण झाली.

## पोलिस भरती : अकोल्यात १६० रिक्त पदांसह ३२० पदे भरणार

### पोलिस दलातील मनुष्यबळ वाढणार; तरुणांच्या वाढल्या आशा

**अकोला / प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस दलातील सध्या १६० पोलिस शिपाई पदे रिक्त असून, राज्य सरकारच्या ताज्या निर्णयानुसार अकोला जिल्ह्यात एकूण सुमारे ३२० नव्या पदांची भरती प्रक्रिया लवकरच राबवली जाणार आहे. ही भरती २०२३-२४ आणि २०२४-२५ या दोन वर्षांसाठी एकत्रित करण्यात येणार असल्याने पोलिस सेवेत प्रवेशाची आकांक्षा बाळगणाऱ्या युवकांसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

पोलिस दलात मनुष्यबळ कमी असल्यामुळे विद्यमान कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे. अनेकांना नियोजित ८ तासांऐवजी १२ ते १६ तास ड्युटी करावी लागत असून, त्याचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या १२ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत एकूण १५ हजार पोलिस भरतीस मान्यता देण्यात आली. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील रिक्त पदे भरण्यासाठी लवकरच प्रक्रिया सुरू होणार आहे. गतवर्षी अकोला जिल्ह्यात २०२२-२३ या वर्षासाठी १९५ पोलिस शिपाई पदांची भरती करण्यात आली होती.

#### वाढीव आकृतीबंधानुसार होईल भरती

यंदा मात्र केवळ रिक्त पदेच नव्हे, तर वाढीव आकृतीबंधानुसारही भरती होणार आहे. त्यामुळे एकूण पदांची संख्या सुमारे ३२० वर पोहोचेल, अशी अपेक्षा आहे. यासाठी गृह विभागाकडून अधिकृत जाहिरात प्रसिद्ध होणार असून, अर्ज व पात्रतेची सविस्तर माहिती त्यात नमूद केली जाईल.

### महापालिकेची मोटारसायकल रॅली

**अकोला :** मनपा प्रशासनाद्वारा १२ ऑगस्ट रोजी सकाळी मनपा क्षेत्रामध्ये मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांद्वारे तिरंगा मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीची सुरुवात स्थानिक हुतात्मा स्मारक येथून मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी हिरवी झेंडी दाखवून केली. शहरातील विविध भागांत मार्गक्रमण करून मनपा मुख्य कार्यालय येथे रॅलीचा राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांव्दारे तिरंगा स्वाक्षरी तसेच तिरंगा सेल्फी घेण्यात आल्या तसेच आकोट मोटर स्टॅण्ड येथे उत्तर झोन कार्यालयाच्या वतीने रॅलीवर पुष्पवर्षाव करून स्वागत करण्यात आले.

## जि. प. शाळांसाठी चार कोटींचा निधी पडून

### प्रक्रियेला विलंब; सीसीटीव्हीच्या निविदेचे घोडे अडले कोठे?

**अकोला/ प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी ४ कोटी १० लाख रुपयांचा निधी डीपीसीतून जि.प.च्या प्राथमिक शिक्षण विभागाला गतवर्षी देण्यात आला आहे. दरम्यान नव्या शैक्षणिक सत्राला सुरुवात झाली असताना देखील निविदा प्रक्रियेचे घोडे अडले कोठे? हा प्रश्न निर्माण होत आहे.

दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या एका शाळेत विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचे प्रकरण उघडकीस आले होते. याप्रकरणी दोन शिक्षकांवर गुन्हे दाखल होवून त्यांना अटकही झाली. त्यानंतर दोन घटना आणखी घडल्या. जिल्हा परिषदेच्या अनेक सभांमध्ये या घटनेवर चर्चा झाली. दरम्यान शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे शासनाचे निर्देश होते. परंतु त्यासाठी स्वतंत्र निधी न दिल्याने जिल्ह्यातील ९१२ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा लावण्याचा प्रस्ताव धूळ खात पडला होता.

दरम्यान जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शासनाकडून प्राप्त इतर निधीचा उपयोग शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी करण्याचे नियोजन केल्यानंतर शिक्षण विभागाला जिल्हा वार्षिक योजनेतून ४ कोटी १० लाख रुपयाचा निधी आर्थिक वर्ष २०२४-२५ संपण्यापूर्वी देण्यात आला. प्रशासनाने निविदा प्रक्रिया राबविणे अपेक्षित असतांना नवे शैक्षणिक सत्र सुरू झाले असतांना वेग येण्याऐवजी उलट प्रक्रियेला अत्यधिक विलंब होत आहे.

#### तालुकानिहाय शाळा

| | |
|---|---|
| अकोला | १८९ |
| आकोट | १४६ |
| बाळापूर | १०२ |
| बार्शिटाकळी | १३३ |
| मूर्तिजापूर | १४१ |
| पातूर | ९८ |
| तेल्हारा | १०३ |

### पातूर घाटात ट्रक उलटला; दोन ठार, एक जखमी

**पातूर:** पातूर-वाशिम महामार्गावरील पातूर घाटात म्हसोबा मंदिराजवळ १३ ऑगस्ट रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास लोखंडी अँगल पाईपने भरलेला ट्रक डिव्हायडरला धडकून उलटला. या अपघातात चालकासह दोघांचा जागीच मृत्यू झाला असून, एकजण जखमी झाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, नांदेडवरून भरधाव वेगात लोखंडी अँगल पाईप घेऊन येणारा ट्रक ( टीएस-१५ यूए ११०७) घाटातील उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे डिव्हायडरला धडकून उलटला. यात ट्रकचालक संजय विश्वंभर कदम (४५) व नामदेव दादाराव शिंदे (३६ रा. सोमठाणा, ता. नायगाव, जि. नांदेड) यांचा जागीच मृत्यू झाला. तर सुनील संतोष साहू (रा. अमानी, ता. शहागंज, जि. जहानपूर, उत्तर प्रदेश) हा जखमी झाला असून, त्याला नॅशनल हायवे ॲम्ब्युलन्सने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### विजेचा शॉक लागून मृत्यू

**तेल्हारा :** तालुक्यातील वडगाव रोठे येथील घराचे बांधकाम सुरू असताना १३ ते १४ मजुरांना विजेचा झटका लागल्याची घटना घडली आहे. या घटनेत ओमप्रकाश केशवराव जांभळे (१७) या अल्पवयीन बांधकाम मजूर असलेल्या मुलाचा मृत्यू झाला आहे. तेल्हारा तालुक्यातल्या वडगाव रोठे गाव येथील रहिवासी वसंता बरिंगे यांच्या घरी स्लॅबचे काम सुरू होते. दरम्यान, बुधवारी रात्री उशिरापर्यंत त्यांच्या घराच्या स्लॅबचे काम पूर्ण झाले होते. बांधकाम आटोपल्यानंतर बांधकाम मिक्सर बाजूला नेत असताना अचानक मजुरांना विजेचा जोरदार शॉक लागला. या मिक्सरचा विजेच्या सर्व्हिस वायरला स्पर्श झाल्याने विजेचा झटका लागला होता.







## पांगरी महादेववर मूत्रपिंड विकाराचे सावट

**वाशिम/प्रतिनिधी**

अकोला-वाशिम सीमेवरील मंगरूळपीर तालुक्यातील पांगरी महादेव या गावाला मूत्रपिंड विकाराने ग्रासले असून, गेल्या काही वर्षांत या आजारामुळे तब्बल १२ जणांचा मृत्यू झाला आहे. नुकतेच वाघोराव कासोळे (४८) यांचा मृत्यू झाला असून, ते बळींच्या यादीतील बारावे नाव ठरले. स्थानिकांचा आरोप आहे की गावातील पाणी दूषित असल्याने हा आजार पसरत असून, योग्य उपाययोजना न झाल्याने परिस्थिती अधिकच बिघडते आहे.

पांगरी महादेव येथे सुमारे ८३३ लोकसंख्या असून, बहुतांश नागरिक विमुक्त भटक्या जातीचे आहेत. या गावाला अद्याप ग्रामपंचायत किंवा गट ग्रामपंचायतीचा दर्जा मिळालेला नाही. त्यामुळे शासनाच्या अनेक विकास योजनांपासून हे गाव वंचित आहे.

अकोला जिल्ह्यातून वाशिमचे विभाजन होऊन २४ वर्षे उलटून गेली तरी गावाचा दर्जा बदलला नाही, ही स्थानिकांची नाराजी आहे. ग्रामसभा समितीने ७ ऑगस्ट २०२३ रोजी जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन या गंभीर आजाराची माहिती दिली होती.

#### प्रशासकीय यंत्रणेचे दुर्लक्ष

ग्रामसभा समितीचे समन्वयक सचिन कुळकर्णी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून मृत्यूमुखी पडलेले आणि सध्या आजारी असलेल्या नागरिकांची यादी जाहीर केली आहे. त्यामुळे ही समस्या पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ग्रामसभा समितीचा सातत्याने पाठपुरावा असूनही, जलशुद्धीकरण यंत्र बसविणे किंवा पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या बाबतीत प्रशासनाकडून कोणतीही ठोस पावले उचलली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

> पिण्याचे पाणी अशुद्ध असल्याने पांगरी महादेव येथे मूत्रपिंड विकाराने थैमान घातले आहे. गेल्या काही वर्षांत १२ जणांचा बळी गेला असून, अनेक जणांवर उपचार सुरू आहेत. आवश्यक उपाययोजना व्हाव्यात यासाठी ग्रामसभा समितीने वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केला, तरीही त्याकडे दुर्लक्ष झाले.
>
> **– सचिन कुळकर्णी**
> जल हक्क कार्यकर्ता तथा समन्वयक






## चविष्ट मसाला शेवया

झटपट रेसिपी

न्याहरीचा एक उत्तम पर्याय म्हणजे मसाला शेवया. हा झटपट तयार होणारा आरोग्यदायी पदार्थ आहे. हॉस्टेलमध्ये काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर मसाला शेवया नक्की करून बघा.

**सामग्री :** एक कप भाजलेल्या शेवया, एक बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला टोमॅटो, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा कप उकडलेले मटार, एक बारीक चिरलेली सिमला मिरची, अर्धा चमचा जीरं, अर्धा चमचा लाल तिखट, प्रत्येकी अर्धा चमचा हळद आणि धनेपूड, एक चमचा गरम मसाला, लिंबाचा रस, एक कप पाणी, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ



**कृती :** कढईत दोन ते तीन चमचे तेल गरम करा. त्यात जीरं घाला. मग कांदा परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि मटार घालून परता. सोबत आलं-लसूण पेस्ट घाला. मग लाल तिखट, धनेपूड, हळद घालून परतून घ्या. मसाल्यातून तेल सुटलं की त्यात शेवया घाला. चवीनुसार मीठ घाला. पाणी घालून शिजवून घ्या. पाणी आटल्यावर गरम मसाला घाला. दोन मिनिटं शिजू द्या. गॅस बंद करा. शेवयांवर कोथिंबिर घाला. गरमागरम खा.




## शेर की जुबानी

दिल के लिये हयात का, पैगाम बन गई,
बेचैनियां सिमट के तेरा, नाम बन गई।

दिल पर हम बेवजह इल्जाम लगाते हैं,
धोका तो अक्सर धडकन दिया करती है।

ये दोस्ती भी एक रिश्ता है,
जो निभा दे वो फरिश्ता है।

## प्रवास डिलिव्हरी बॉयचा

अचिव्हर

समस्तीपूर हे बिहार राज्यातील एक प्रसिद्ध शहर आहे. एकेकाळी येथील एक मास्टर साहेब विद्यार्थ्यांना बीजगणिताचे तत्व शिकवत होते. बेरीजचा कम्युटेटिव्ह गुणधर्म समजावून सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, तुम्ही संख्यांचा क्रम बदलला तरी त्या संख्यांची बेरीज किंवा निकाल बदलणार नाही. उदाहरणार्थ, तीन अधिक चार आणि चार अधिक तीन यांचे उत्तर सारखेच आहे. त्याचप्रमाणे अनेक संख्यांच्या गटाचा क्रम बदलल्याने निकाल बदलत नाही. त्या विद्यार्थ्यांमध्ये एक मुलगा होता. तो हे सगळं ऐकून हसत होता. कारण त्याने इतर मुलांसमोर तो विषय आधीच वाचला होता. तो मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून 'सीएबीटी लॉजिस्टिक्स'चे संस्थापक शैलेश कुमार होते.

'सीएबीटी लॉजिस्टिक्स' स्थापनेच्या प्रवासात तो अनेक वेळा पडला. परंतु त्याने परिस्थितीसमोर झुकण्यास नकार दिला. त्याच्या धाडसाचे फळ म्हणजे आज 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुमारे १६० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करणारी कंपनी बनली आहे. गरीब वातावरणात वाढलेल्या शैलेश कुमारचा प्रवास त्याच्या संघर्ष, कुतूहल आणि दृढनिश्चयाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. वारंवार अपयश येऊनही लॉजिस्टिक्स क्षेत्रातील दिग्गजांपैकी एक बनण्याची शैलेश कुमारची कहाणी महत्त्वाकांक्षी उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरते. शैलेश कुमारचा जन्म १९८६ मध्ये एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे वडील गणिताचे शिक्षक होते. त्यांचा पगार फक्त १४०० रुपये होता. शैलेश कुमारला तीन भावंडे होती आणि ते सर्व एका खोलीच्या छोट्या घरात राहत होते. शैलेशला बालपणातच समजले होते की गरिबीच्या या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. शिक्षण हाच त्याच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याचा एकमेव मार्ग मानून तो आयुष्यात पुढे गेला.

सुरुवातीचे शिक्षण घेतल्यानंतर तो कोटा येथे गेला आणि आयआयटीची तयारी केली. परंतु अनेक प्रयत्नांनंतरही त्याला यश मिळाले नाही. निराश होऊन शैलेश घरी परतला आणि वडिलांच्या सल्ल्यानुसार त्याने पंजाब टेक्निकल युनिव्हर्सिटीमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आणि २०११ मध्ये तो अभियंता झाला. आता आव्हान होते चांगली नोकरी मिळवण्याचे. अनेक लहान-मोठ्या नोकऱ्या केल्यानंतर त्याला शेवटी डेलमध्ये ३२,००० रुपयांची नोकरी मिळाली. सर्वप्रथम त्याच्या कॅब ड्रायव्हरला ६०,००० रुपये कमावताना पाहून त्याने येथे स्वतःचा कॅब व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. पहिले दोन व्यवसाय अयशस्वी झाले त्याने कर्ज घेऊन टोयोटा इनोव्हा कार खरेदी केली आणि यात्रा डॉट कॉममध्ये सामील झाला. व्यवसाय वाढवण्यासाठी त्याने कर्ज घेऊन अधिक वाहने खरेदी केली. सर्व काही व्यवस्थित चालले होते. नंतर डिझेल वाहनांवर बंदी आल्यामुळे त्याला हा व्यवसाय बंद करावा लागला. शैलेश थांबला नाही. त्याला एचसीएलमध्ये नोकरी मिळाली आणि तो तिथे मॅनेजर झाला. तथापि त्याला नोकरी आवडली नाही आणि त्याने ई-कॉमर्स स्टार्टअप सुरू केला. काही काळानंतर वस्तू विकल्या जात नसल्यामुळे त्याला तोटा होऊ लागला. म्हणून त्याला तोदेखील बंद करावा लागला.



पहिल्या दोन व्यवसायांच्या अपयशानंतर त्याने जवळजवळ सर्व बचत गमावली होती. आता त्याच्याकडे रोजगार नव्हता आणि उत्पन्नाचा दुसरा कोणताही स्रोत नव्हता. पैसे कमवण्यासाठी तो फ्लिपकार्टमध्ये डिलिव्हरी बॉय बनला. यासाठी त्याला १७,००० रुपये मानधन मिळत असे. या काळात त्याला लक्षात आले, की लॉजिस्टिक्सची संपूर्ण व्यवस्था गोंधळलेली आहे. यानंतर, त्याने भारताच्या अव्यवस्थित डिलिव्हरी इकोसिस्टमच्या समस्येवर मात करण्यासाठी 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुरू करण्याचा विचार केला.

२०१८ मध्ये त्याने शहरांतर्गत लॉजिस्टिक्स फर्म सीएबीटी लॉजिस्टिक्सची स्थापना करून स्वतःचा ब्रँड तयार केला.

## वेगळं काही

### बाळाला झोपवण्यासाठी 'एआय'



'ओपन एआय'चे 'सीईओ' आणि चॅटजीपीटी जगासमोर आणणारे सॅम ऑल्टमन आणि त्यांचे पार्टनर ऑलिव्हर मुल्हेरिन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला पहिल्या बाळाचे स्वागत केले. बाळांच्या काळजीची शिफारस करताना ऑल्टमनने स्वतः सोशल मीडिया पोस्टमध्ये ही माहिती दिली. एक्स वर (पूर्वीचे ट्विटर) त्यांनी लिहिले, आम्हाला गरज नसलेल्या अनेक वस्तू आम्ही बाळासाठी खरेदी केल्या. परंतु मी निश्चितपणे 'क्रेडलवाइज स्लिंग' आणि भरपूर बर्प रॅग्सची शिफारस करेन.'' ऑल्टमनच्या या छोट्या पोस्टमुळे जगभरात 'क्रेडलवाइज' नावाच्या स्मार्ट स्लिंगची चर्चा पसरली. बेंगळुरूमधील स्टार्टअप ' क्रेडलवाइज' कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे बाळ जागे होण्याची सुरुवातीची चिन्हे ओळखते आणि हळूहळू त्याला पुन्हा झोपायला लावते. टेक्नो सॅव्ही पालकांमध्ये आधीच लोकप्रिय होत असलेल्या या तंत्रज्ञानाला आता 'एआय' उद्योगातील सर्वात विश्वासार्ह नावाकडून मान्यता मिळाली आहे आणि त्याचा मोठा परिणाम झाला आहे.

## जपानमध्ये सर्वात फास्ट इंटरनेट

टेक टॉक

तुम्ही ॲप उघडण्यासाठी लागणाऱ्या वेळेत संपूर्ण नेटफ्लिक्स लायब्ररी डाउनलोड करू शकाल का? हा विनोद नाही, तर जपानमध्ये अलीकडेच उदयास आलेल्या इंटरनेट तंत्रज्ञानाचे खरे स्वरूप आहे. जून २०२५ मध्ये जपानच्या राष्ट्रीय माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान संस्थेने (एनआयसीटी) जगातील सर्वात वेगवान इंटरनेट गतीचा विक्रम मोडला. त्यांनी प्रति सेकंद १.०२ पेटाबाइट्स म्हणजेच प्रति सेकंद १ दशलक्ष गीगाबाइट्सपेक्षा जास्त वेगाने डेटा प्रसारित केला.



स्टीमवरील सर्व गेमची एकूण साईझ सुमारे १.२ पेटाबाइट्स आहे. या नवीन गतीसह तुम्ही तुमच्या सिस्टममध्ये बाल्डूरच्या गेट ३ पासून काउंटर-स्ट्राइक २ पर्यंतचे सर्व गेम्स काही सेकंदात डाउनलोड करू शकता. तुम्ही एकाच वेळी १ कोटी ८ के व्हिडिओ स्ट्रीम करू शकता. म्हणजेच न्यूयॉर्क आणि टोकियोच्या संपूर्ण लोकसंख्येने एकाच वेळी वेगवेगळे चित्रपट पाहिले तरी वेग कमी पडणार नाही. स्पॉटिफायच्या मते एका मिनिटाचे गाणे सुमारे १ एमबी असते. त्यानुसार तुम्ही एका सेकंदात ६७ दशलक्ष गाणी म्हणजेच सुमारे १,२७,५०० वर्षांचे संगीत डाउनलोड करू शकता. इंग्रजी विकिपीडिया सुमारे शंभर जीबी आहे.

## फॉलो द एटिकेट्स

फिटनेस फंडा

दोस्तांनो, तुम्ही जीमला जाता. जीममध्ये काही एटिकेट्स फॉलो करावे लागतात. हे नियम कुठेही लिहून ठेवलेले नसतात. पण आपण या काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. जीममध्ये कोणत्या गोष्टी टाळता येतील? जाणून घेऊ.

✲ आपण जीममधली उपकरणं वापरतो. डंबेल्ससारखी उपकरणं विशिष्ट ठिकाणी ठेवलेली असतात. त्यामुळे वापरानंतर ती जागच्या जागी ठेवायला हवीत. काहीजण डंबेल्स व्यायामाच्या ठिकाणीच ठेऊन जातात. मग जीममधल्या कर्मचाऱ्यांना ती नीट ठेवावी लागतात. त्याऐवजी आपणच ती जागेवर ठेवणं योग्य ठरतं.

✲ व्यायाम करून कितीही दमलात तरी हातातले डंबेल्स जोरात खाली टाकू नका. यामुळे डंबेल्स तुटू शकतात. इतरांचं लक्ष विचलित होतं. त्यामुळे प्रत्येक उपकरण हळूवारपणे खाली ठेवा.



✲ जीममध्ये गेल्यावर स्मार्टफोन शक्यतो बाजूलाच ठेवावा. फोन जवळ असला तरी त्यावर मोठ्याने बोलू नये. जीममध्ये म्युझिक सुरु असतं. लोकांचा आवाजही येत असतो. त्यामुळे ऐकू आलं नाही तरी तुम्ही हळूच बोला.

✲ व्यायाम करताना इतरांशी गप्पा मारू नका. सगळं लक्ष व्यायामावर केंद्रित करा. मोठ्याने गप्पा मारल्याने इतरांना त्रास होऊ शकतो.

## डेटा सेफ्टी

### पासवर्ड सुरक्षित ठेवायचाय?

कोणीही आपला पासवर्ड हॅक करू नये आणि माहिती पूर्णपणे सुरक्षित राहावी, असे तुम्हाला वाटत असेल तर या गोष्टी नक्की फॉलो करा. पासवर्ड लांब आणि गुंतागुंतीचा ठेवा. कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाही असा किमान १२ अक्षरांचा पासवर्ड ठेवा. मोठ्या आणि लहान अक्षरे, संख्या आणि विशेष चिन्हांचे मिश्रण आवश्यक आहे. नावे, जन्मतारीख किंवा सोपे शब्द टाळा. हॅकर्स प्रथम १२३४५६, पासवर्ड, इंडिया २०२५ सारखे पासवर्ड वापरून पाहतात. प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड ठेवा. सर्व एकच पासवर्ड असेल आणि तो विसरला तर सर्वकाही धोक्यात येईल. वेगवेगळ्या खात्यांसाठी वेगवेगळे पासवर्ड तयार करणे आणि लक्षात ठेवणे कठीण वाटत असेल तर पासवर्ड मॅनेजरची मदत घ्या. हे टूल तुमच्यासाठी मजबूत पासवर्ड तयार करते आणि ते सुरक्षितपणे सेव्ह करते. तुम्हाला फक्त एक मास्टर पासवर्ड लक्षात ठेवावा लागेल.




## ट्रेंडी ऑफिसवेअर

फॅशन पॅशन

दोस्तांनो, कामाच्या ठिकाणी स्टायलिश दिसण्यासोबतच आरामदायीही वाटायला हवं. त्यातच फॉर्मल्समध्ये आपलं व्यक्तिमत्त्व उठून दिसायला हवं. यासाठी तुम्ही ट्राउझर्सचे काही लेटेस्ट ट्रेंड ट्राय करू शकता.



✲ अँटी फ्लेक्स ट्राउझर्समध्ये तुम्हाला आरामदायी वाटू शकतं. या ट्राउझर्सच्या कंबरेला स्ट्रेच होणारा बँड दिलेला असतो. यामुळे या पँट्स व्यवस्थित बसतात. यासोबतच पँटच्या खिशांना सेफ्टी झिपर्सही असतात.

✲ शार्प आणि स्लिक दिसण्यासाठी ड्रेस पँट्स ट्राय करा. या पँट्स तयार करण्यासाठी खास कापड वापरलं जातं. यामुळे त्यावर सुरकुत्या पडत नाहीत.

✲ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.



## पावसाळी भ्रमंती

भटकंती

पावसाळा अतिशय आल्हाददायक असतो. या ऋतूत प्रत्येकाला छान थंड हवा, दऱ्या, डोंगरात जायला आवडते. तुम्हाला पावसाळ्याचा पुरेपूर आनंद घ्यायचा असेल तर भारतातील काही ठिकाणे तुमच्यासाठी परफेक्ट ठरू शकतात.

**कोडईकॅनॉल**

तामिळनाडूत वसलेले कोडईकॅनॉल पावसाळ्यात अक्षरशः स्वर्गासारखे रम्य दिसते. हे हिल स्टेशन समुद्रसपाटीपासून २१३३ मीटर उंचीवर आहे. याला 'हेल ऑफ क्वीन्स' असेही म्हणतात. पावसाळ्यात फिरण्यासाठी हे ठिकाण परफेक्ट आहे. येथे आपल्या जोडीदारासोबत रोमान्सचा एक क्षण घालवू शकता.

**अलेप्पी**

अलेप्पीला केरळचे व्हेनिस म्हणतात. पावसाळ्यात येथे फिरण्याचा बेत आखला, तर तुमचा प्रवास संस्मरणीय ठरेल. इथे तुम्हाला शांतता वाटेल.

**झिरो व्हॅली**

अरुणाचल प्रदेशातील झिरो व्हॅली समुद्रसपाटीपासून सुमारे ५,६०० फूट उंचीवर आहे. इथले सुंदर तलाव आणि धबधबे पाहून तुम्हाला इथे स्थायिक होण्याची इच्छा होईल. याशिवाय तवांगलाही जाऊ शकता.

**लोणावळ्याचा खास प्लॅन**

पावसाळ्यात फिरण्याची चर्चा होते तेव्हा महाराष्ट्रातील एक नाव नक्कीच घेतले जाते. हे पावसाळ्याची खरी मजा एन्जॉय करायची असेल तर महाराष्ट्रातील लोणावळ्याला नक्की जा.

**कुर्ग**

पावसाळ्यात कुर्गचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. कर्नाटकातील कुर्ग पावसाळ्यात अधिकच आकर्षक बनते. इथली हिरवळ आणि हिरवेगार डोंगर प्रत्येकाच्या मनाला भुरळ घालतात.

## दिसणं महत्त्वाचं आहे?

मॅच मेकिंग

मी २७ वर्षांची मुलगी आहे. गेल्या काही दिवसांपासून माझ्यासाठी सुयोग्य जोडीदाराचा शोध सुरू आहे. मध्यंतरी माझ्यासाठी एक स्थळ आलं होतं. मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर असून त्याचं कुटुंब खुल्या विचारांचं आहे. पण तो दिसायला सर्वसाधारण आहे. खरं सांगायचं तर थोडा स्थूल आहे. मला तो पसंत पडलेला नाही. मी गोंधळून गेले आहे. माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. त्याची जीवनशैली माझ्यापेक्षा खूप वेगळी आहे. मला आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा मुलगा हवा आहे. आमची लाईफस्टाईल जुळत नसल्याने मी त्याला नकार द्यावा का बाकी सगळं चांगलं नसल्यामुळे याकडे दुर्लक्ष करावं? याबाबत मला मार्गदर्शन करा.



**उत्तर :** स्थूलपणा सोडल्यास त्याच्यात कोणतीही कमतरता नसेल तर तू याबाबत त्याच्याशी बोलू शकतेस. त्याला भेटून तुझं मत मांडायला काहीच हरकत नाही. आरोग्यदायी जीवनशैली, फिटनेस यांचं महत्त्व तू त्याला पटवून देऊ शकतेस. आजकाल एका स्थूलपणामुळे सामान्य माणसाला किती व्याधी जडू शकतात, याची माहिती घे. गरज वाटल्यास समुपदेशकांची मदत घेता येईल. त्यामुळे नकार देण्याचा निर्णय घाईघाईने घेऊ नकोस.

## जाणून घ्या

### पावसाळ्यात अशी घ्या काळजी

मुसळधार पाऊस पडत असेल तेव्हा लगेच फ्रीज आणि एसीचा प्लग काढून ठेवा. पावसाळ्यात वारंवार वीज खंडित होते. शिवाय पावसाळ्यात व्होल्टेजमध्ये चढ-उतार होणेदेखील सामान्य आहे. अशा परिस्थितीत पावसाळ्यात सॉकेटमधून फ्रीज आणि एसीचा प्लग काढून टाकणे सुरक्षित असते. यामुळे तुमच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू सुरक्षित राहण्यास मदत होईल. भिंतीवर ओलसरपणा असल्यास ही भीती असते. बरेचदा सततच्या पावसामुळे घरात ओल येते. तुमच्या घराच्या भिंतीवर एसी किंवा फ्रिज सॉकेट असेल तर त्या भिंतीवरील प्लग काढून टाका. ओल आल्यामुळे फ्रीज किंवा एसीच्या प्लगमध्ये पाणी गेले तर शॉर्ट सर्किट होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत भिंतीवरील ओलसरपणा सुकेपर्यंत सॉकेटमधून प्लग बाहेर ठेवणे चांगले. फ्रीजजवळ दुसरा कोणताही सॉकेट नसेल तर भिंतीवरील ओल जाईपर्यंत तुम्ही एक्सटेंशन बोर्ड वापरू शकता. एसीचे आउटडोअर युनिट पावसाचे पाणी थेट पोहोचते अशा ठिकाणी बसवले असेल तर विशेष काळजी घ्या. पावसाळ्यात एसी वापरात नसताना आउटडोअर युनिट झाकणे चांगले. बाजारात एसीच्या आउटडोअर युनिटसाठी प्लास्टिक कव्हर्स उपलब्ध आहेत. यामुळे तुमच्या एसीच्या आउटडोअर युनिटचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होईल. असे करणे शक्य नसेल तर पावसाळ्यात आणि पावसानंतर आउटडोअर युनिट पूर्णपणे सुकेपर्यंत एसी चालू करू नका. पावसाळ्याच्या दिवसात बाहेर बसवलेले ट्रान्सफॉर्मर वगैरे वस्तू ओल्या होतात आणि त्यामुळे विजेचा चढउतार वाढतो. अशा परिस्थितीत रेफ्रिजरेटर आणि एसीसोबत स्टॅबिलायझर वापरणे शहाणपणाचे आहे.



## क्षेत्र फोटो जर्नलिझमचं...

करियरवाट

दोस्तांनो, एक फोटो खूप काही सांगून जातो. फोटोतून आपण आपल्या भावना व्यक्त करू शकतो. एखादा फोटो लोकांच्या मनाला भिडतो. त्या फोटोतून एखाद्या ठिकाणच्या परिस्थितीचा अंदाज घेता येतो. तुम्हालाही फोटोतून व्यक्त व्हायचं असेल तर फोटो जर्नलिझमचा पर्याय उपलब्ध आहे. फोटो जर्नलिझम हे रंजक आणि धाडसी करिअर आहे. यात तुम्ही अंगभूत कौशल्यांचा वापर करू शकता. या क्षेत्रातल्या करिअरबाबतचं हे मार्गदर्शन...

✲ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.



फोटोग्राफी शिकल्यानंतर तुम्ही एखादा वर्तमानपत्रात काम करू शकता. इथे तुम्हाला प्रशिक्षणही दिलं जातं. सुरुवातीला वरिष्ठ फोटोग्राफरच्या मार्गदर्शनाखाली काम करता येईल.

✲ या क्षेत्रात करिअर करण्याआधी स्वतःची वेबसाईट तयार करा. या साईटवर तुम्ही फोटो पोस्ट करू शकता. तुमचे फोटो सोशल मीडियावरही अपलोड करता येतील.

✲ वेबसाईट तयार केल्यानंतर सातत्याने फोटो अपलोड करत रहा. फोटो स्टोरी तयार करा. शब्दांशी खेळा. लेखनकौशल्यं वाढवा.

✲ या क्षेत्रात प्रचंड मेहनत करावी लागते. बाहेर फिरावं लागतं. त्यामुळे याची तयारी ठेवा.

## आयआयटी मुंबईचे दोन नवे अभ्यासक्रम

वेगळ्या वाटा

'इं 'आयआयटी बॉम्बे'ने 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट' आणि 'सायबर सिक्युरिटी' हे दोन प्रोफेशनल सर्टिफिकेट प्रोग्राम सुरू केले आहेत.

हे प्रोग्राम ट्रस्ट लॅब, 'आयआयटी बॉम्बे' द्वारे ऑफर केले जात आहेत आणि विशेषतः कार्यरत व्यावसायिक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले आहेत. या प्रोग्राम्सचा फोकस उद्योगाच्या गरजा आणि व्यावहारिक कौशल्यांवर आहे. या दोन्ही प्रोग्राम्ससाठी नोंदणी २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत केली जाईल.

**सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्सः**

हा प्रोग्राम केवळ थियरीवरच नाही तर वास्तविक जगातील कौशल्यांवरदेखील भर देतो. यासाठी दर आठवड्याला लॅब-आधारित प्रयोग केले जातील. या प्रोग्राममध्ये सहभागी होणाऱ्या लोकांना प्रथम UNIX, HTML, CSS आणि JavaScript सारख्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातील. त्यानंतर ते PHP, MERN (MongoDB, Express.js, React, Node.js) आणि React with Django वापरून फुल-स्टॅक डेव्हलपमेंट शिकतील. या कोर्समध्ये क्लाउड डिप्लॉयमेंटसाठी चाचणी पद्धती आणि CI/CD पाइपलाइन देखील समाविष्ट आहेत. भविष्यात, क्लाउड कॉम्प्युटिंग, सिस्टम प्रोग्रामिंग आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगसारखे विषयदेखील त्यात जोडले जातील. या प्रोग्राममध्ये व्यावसायिक प्रमाणपत्र मिळविण्यासाठी, दोन वर्षांत किमान तीन अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. प्रत्येक कोर्सचे स्वतःचे पात्रता आणि मूल्यांकन नियम आहेत. यामध्ये निवड शैक्षणिक ट्रान्सक्रिप्ट, उद्देशाचे विधान (SOP) आणि शिफारसीवर आधारित असेल.

**सायबर सुरक्षा**

'रिअल वर्ल्ड क्रिप्टोग्राफी'चा अभ्यासक्रम १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. त्यात एन्क्रिप्शन, डिजिटल सिग्नेचर, सुरक्षित की एक्सचेंज आणि बरेच काही शिकवले जाईल. नेटवर्क सुरक्षेचा अभ्यासक्रम २ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. त्याचे लक्ष प्रमुख इंटरनेट प्रोटोकॉल लेयर अटॅक आणि आधुनिक नेटवर्क संरक्षण धोरणांवर असेल. प्रत्येक अभ्यासक्रम १२-१४ आठवड्यांसाठी ऑनलाइन असेल. त्यात पूर्व-रेकॉर्ड केलेली व्याख्याने, टीए (शिक्षण सहाय्यक) द्वारे सहाय्यित प्रयोगशाळा आणि आठवड्याच्या शेवटी लाइव्ह ट्यूटोरियल समाविष्ट असतील. विद्यार्थी वर्गातदेखील उपस्थित राहू शकतात आणि इच्छित असल्यास कॅम्पस ॲक्टिव्हिटीजमध्ये सहभागी होऊ शकतात.




**पात्रता**

अभियांत्रिकी किंवा संगणक शास्त्रात ३ किंवा ४ वर्षांची पदवी असलेले उद्योग व्यावसायिक पदवीधर तृतीय किंवा चौथी वर्ष आणि पदव्युत्तर विद्यार्थी अर्ज करू शकतात. संबंधित विषयांचे प्राध्यापकदेखील अर्ज करू शकतात.

**फी किती आहे?**

कोअर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्सची फी १९,००० ते ३६,००० रुपयांपर्यंत आहे, तर सायबर सिक्युरिटी मॉड्यूलची फी ३६,००० ते ७२,००० रुपयांपर्यंत आहे. प्रत्येक कोर्ससाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पैसे द्यावे लागतील आणि प्रत्येक कोर्स पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षांच्या आत आवश्यक असलेले तिन्ही कोर्स पूर्ण केल्यावर व्यावसायिक प्रमाणपत्र दिले जाईल.

दैनिक महाभूमि
dainikmahabhoomi@gmail.com
शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५
# बुलढाणा भूमि

## दखल...

### हे कृष्णा ..!

अर्जुनाचा सारथी बनुनी
तु दिलेस अध्यात्माचे धडे
तुझ्या राजनीतीचे आजही
त्रिभूवनी वाजती चौघडे ... !

भ्रष्टाचाराने बरबटलेले
प्रजेचे काय करतील भले
देश गहाण टाकण्यासही
हे न पाहती मागे पुढे . . . !

दिशाहीन राज्यकर्ते
रथ हाकती विनाशाकडे
हे कृष्णा, डोळस दृष्टी देण्या
तू ये सत्वर गडे ... !

राजनितीज्ञांचा पितामह तू
वंदन करती जग सारे
पण नेते आमचे स्वार्थापायी
आज राजधर्म विसरले रे... !

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

## पराक्रमाची जिथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती..

# भादोला, धामणगावला लाभला देशसेवेचा वसा!



**बुलढाणा / प्रतिनिधी**

मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्याला सेवा, समर्पण व पराक्रमाचा वारसा लाभला आहे. जिल्ह्यातल्या काही गावातील युवक, युवतींनी देशसेवेने ओतप्रोत होत, भारतीय सैन्यदलात दखल होऊन देशसेवेचा वसा व वारसा चालविल्याची उदाहरणे आहेत. त्यातीलच भादोला व धामणगाव धाड या गावांचा स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने अभिमानाने उल्लेख करावा लागेल.

बुलढाणा शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या भादोला या छोट्याशा गावात सर्व जाती धर्माची लोक गुण्यागोविंदाने राहतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना आपल्या गितांच्या माध्यमातून गावागावात पोहचविणारे महाकवी वामनदादा कर्डकांचा मुक्काम कैक दिवस येथे राहत असल्याने या गावाचा उल्लेख महाराष्ट्राच्या लोककलेच्या इतिहासात आहे. गवई – मिसाळ कलापथकाचे गाव म्हणूनही या गावाची राज्यभर ख्याती आहे. या सोबतच या गावातल्या प्रत्येक घरातील एक व्यक्ती सिमेवर देशसेवा करीत असल्याचा गौरवपूर्ण वारसा या गावाला लाभला आहे.

बुलढाणा तालुक्यातील धाडपासून सहा किलोमिटर अंतरावर असलेल्या धामणगाव धाड या गावातील तब्बल ८० जण देशसेवेसाठी सीमेवर तैनात असून, त्यामध्ये एका महिलेचा देखील समावेश आहे. अवघ्या चार हजार लोकवस्तीच्या छोट्या गावातून २००७पासून आजवर तब्बल ८० तरुण सैन्यात दाखल झाले आहेत. खडतर परिश्रम, जिद्दीच्या जोरावर अनेक तरुण सैन्यात दाखल झाले आहेत. देशसेवेत दाखल होण्याचा पहिला मान पांडुरंग पुंजाजी भालके यांना मिळाला. त्यांचा आदर्श घेऊन इतरही तरूण आज देशसेवेसाठी कर्तव्यावर आहेत. देशसेवेसाठी आपल्या व्यक्तीगत सुखाचा त्याग करणाऱ्या सैनिकांना आज स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त मानाचा मुजरा !!

### ३० तरूण पोलीस दलात

■ धामणगाव धाड येथील ३० तरुण पोलिस दलात दाखल झाले आहेत. तसेच ज्योती सतिष सिनकर या महिला सीआरपीएफमध्ये देशसेवा करीत आहे. गावातील इतर तरुणही सैनिक भरतीची तयारी करीत आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात वाढ होणार आहे.

## किशोरवयीन मुलींसाठी वैयक्तिक आरोग्य व स्वच्छता कार्यशाळा

**बुलढाणा / प्रतिनिधी**

शारदा ज्ञानपीठ शाळेमध्ये इयत्ता सातवी ते दहावीच्या विदयार्थिनींसाठी वैयक्तिक आरोग्य व स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण करण्याच्या उददेशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून सोनाली काळकर व आराधना निकाळजे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेमध्ये मासिक पाळीशी संबंधित शारिरिक व मानसिक बदल, मासिक पाळी दरम्यान होणारे आजार, सॅनिटरी पॅडचा योग्य वापर आणि त्याची सुयोग्य विल्हेवाट लावण्याचे महत्व यावर सविस्तर माहिती देण्यात आली. सॅनिटरी पॅड योग्य पदधतीने न टाकल्यास पसरणारे साथीचे रोग याची विदयार्थिनींना जाणीव करुन देण्यात आली. तसेच कार्यशाळेमध्ये संतुलित आहाराचे महत्व नियमित व्यायाम व चांगल्या आरोग्यदायी सवयींची माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींने या कार्यक्रमाबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला बहुसंख्यने विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

## नक्षलग्रस्त भागात बजावली विशेष सेवा..

# चार पोलीस अधिकारी व अंमलदारांना विशेष सेवा पदक

**बुलढाणा / प्रतिनिधी**






गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांच्या विरोधात बजावलेल्या विशेष कामगिरीबद्दल जिल्हा पोलीस दलातील चार पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस महासंचालक यांच्या आदेशानुसार विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.

यामध्ये बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत पीएसआय प्रताप विजय बाजड, बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला कार्यरत पोलीस कॉन्स्टेबल रामेश्वर किसन आंधळे, जळगाव जामोद पोलीस स्टेशनला कार्यरत कॉन्स्टेबल सुपाजी निनाजी तायडे व सीसीटीएनएस खामगाव येथे कार्यरत महिला पोलीस कॉन्स्टेबल पंचगंगा भगवान भोजने यांचा समावेश आहे.

पीएसआय प्रताप बाजड यांनी मार्च २०२१ ते जुलै २०२४ या कार्यकाळात गडचिरोली परिक्षेत्रात गडचिरोली संलग्न गोंदिया आऊटपोस्टमधील गोठणगाव पोस्टे किशोरी या भागात नक्षलविरोधी अभियान राबवून शांतता प्रस्थापित केली. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व लोकसभा निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी प्रयत्न केले. नक्षलग्रस्त भागातील युवक, युवतींसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच पोलीस भरती पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम पार पाडले. यातून ७९ युवक व युवती शासकीय सेवेत रूजू झाले आहेत.

पोकॉ.रामेश्वर आंधळे २६ जुलै २०१२ ते १० जुलै २०२४ या कालावधीत पोलीस मदत केंद्र हेंड्री येथे कार्यरत होते. पोकॉ. सुपाजी निनाजी तायडे हे २९ सप्टे २०११ ते २०२४ पर्यंत कंटेझरी, कारवाफा व गर्दीवाडा येथे कार्यरत होते. तर महिला पोकॉ.पंचगंगा भोजने या २८ जाने २०१० ते २ नोव्हे.२०२२ दरम्यान पोस्टे अहेरी येथे वाहन चालक, डीएसबी, निवडणूक शाखा येथे कार्यरत असताना कम्युनिटी पोलीसींग कार्यक्रमातून शासनाच्या सर्व योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळवून दिला. त्यामुळे पोलीसांची प्रतीमा उजळून निघाली. सदर कार्यक्रमामध्ये गोपनिय माहिती काढून वरिष्ठांना सादर केल्याने नक्षल्यांच्या विध्वंस कार्यवाहीस प्रतिबंध घालण्यात यश मिळाले. या सर्व कामगिरीसाठी चार अधिकारी व अंमलदारांना विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.

## पालकमंत्र्यांच्या हस्ते आज शासकीय ध्वजारोहण

**बुलढाणा :** देशाचा ७९ वा स्वातंत्र्य दिन समारंभ शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी जिल्हाभरात उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ जिल्हाधिकारी कार्यालय येथे होणार असून, या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते सकाळी ९.०५ वाजता ध्वजारोहण करण्यात येणार आहे. स्वातंत्र्य दिनी ध्वजसंहितेनुसार ध्वजाची अवहेलना होणार नाही याची विशेष काळजी घेण्यात येत असून नागरिकांनीही राष्ट्रीय ध्वजाचा सन्मान राखावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सिंधू अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचा आज शुभारंभ

## उपस्थित राहण्याचे ॲड.सुनिल देशमुख यांचे आवाहन

**बुलढाणा / प्रतिनिधी**



राज्याच्या सहकार क्षेत्रात बुलढाणा जिल्ह्याचे भरीव योगदान राहिले आहे. हिच परंपरा वृध्दीगंत करण्याच्या हेतूने विश्वासाची नाती, सिंधू अर्बनची ख्याती हे बीद्र घेऊन शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी क्रीडा व व्यापारी संकुल शॉप नं ३७ बुलढाणा येथे सकाळी ११ वाजता सिंधू अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीचा शुभारंभ होणार आहे.

विनायका उद्योग समूहाच्या सिंधू अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी मर्या, बुलडाणा नवीन प्रतिष्ठानचा शुभारंभ केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, पालकमंत्री मकरंद आबा पाटील, कामगारमंत्री आकाश फुंडकर यांच्याहस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिखली मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले पाटील राहणार आहे. माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार चैनसुख संचेती, आ. संजय गायकवाड, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे, आ. संजय कुटे, आ. मनोज कायंदे, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव विद्याधर महाले, पदवीधर आमदार धीरज लिंगाडे, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर, भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे, आ. सिध्दार्थ खरात यांची उपस्थिती लाभणार आहे. सिंधू अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या या शुभारंभ सोहळ्याला जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बँकेचे अध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक ॲड.सुनिल हासनराव देशमुख यांनी केले आहे.

# आदिवासी समाजातील सख्ख्या बहिणींची 'एमबीबीएस' साठी निवड

**मेहकर / प्रतिनिधी**

तालुक्यातील भोसा येथील आदिवासी समाजातील दोन सख्ख्या बहिणींची एमबीबीएस शिक्षणासाठी निवड झाली असून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या निवासस्थानी त्यांचा गुरूवारी विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आमदार डॉ.संजय रायमूलकर यांची उपस्थिती होती.

राधा अशोक बेले ही आदिवासी विद्यार्थिनी मेहकर येथील सेंट्रल पब्लिक स्कूल मधून बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाली तर तिची बहीण आरती अशोक बेले ही चिखली येथील सैनिक स्कूल मधून उत्तीर्ण झाली.

वैद्यकीय शिक्षणासाठी आवश्यक असलेली पात्रता परीक्षाही त्यांनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण केली. त्यामुळे दोन्ही बहिणींना परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. चांगला अभ्यास करून वैद्यकीय शिक्षण पूर्ण करा असे सांगून शिक्षणात कुठली अडचण आली तर आम्ही मदतीला आहोत अशी ग्वाही प्रतापराव जाधव यांनी दोघी बहिणींना दिली. यावेळी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, उपतालुकाप्रमुख समाधान साबळे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.













बुलढाणा जिल्ह्यातील निर्मळ, निकोप, निपक्ष असे एकमेव लोकप्रीय दैनिक...

दैनिक **महाभूमि** निर्मळ, निकोप, निपक्ष

## द्वितीय वर्धापन दिनाच्या व स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

बळीराजा युवा प्रतिष्ठान
आम्ही शेतकरी,बेरोजगार युवक,तसेच समाजातील सर्व घटकांच्या सेवेसाठी तत्पर



**सौ.भारती अमोल इंगळे**
अध्यक्षा बळीराजा युवा प्रतिष्ठान
संचालिका-शिवनेरी महिला ग्रामीण को-ऑ क्रेडिट सोसायटी
संचालिका-देऊळगाव महिला बिगर शेती को-ऑ क्रेडिट सोसायटी
डायरेक्टर- सॉफ्ट मॅटिक सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड



**श्री.राकेश विजय इंगळे**
कार्यकारी अध्यक्ष बळीराजा युवा प्रतिष्ठान
संचालक : वेदांत आयटीआय ऑनलाईन परीक्षा केंद्र गोंदिया
संचालक : आबासाहेब पारवेकर महा.ऑनलाइन परीक्षा केंद्र यवतमाळ
संचालक : राजमुद्रा अभ्यासिका छत्रपती संभाजीनगर



**श्री.राहुल सुधाकर इंगळे**
बळीराजा युवा प्रतिष्ठान उपाध्यक्ष
युवा शेतकरी संचालक
पेस्ट दूध डेअरी देऊळगाव मही

- आम्ही कटिबध्द आहोत शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी.
- आम्ही कटिबध्द आहोत युवा वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी.
- आम्ही कटिबध्द आहोत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी.
- आम्ही कटिबध्द आहोत समाजातील प्रत्येक घटकांसाठी.



बुलढाणा जिल्ह्यातील निर्मळ, निकोप, निपक्ष असे एकमेव लोकप्रीय दैनिक...

दैनिक **महाभूमि** निर्मळ, निकोप, निपक्ष

## स्वातंत्र्य दिनाच्या व वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!



**श्री गणेश विठोबा देशमुख**
यांच्या टाकरखेड भागीले उपसरपंचपदी नियुक्ती झाल्याबद्दल
**हार्दिक अभिनंदन**
अभिनंदनकर्ते व शुभेच्छूक

सरपंच उपसरपंच तथा समस्त ग्रामस्थ मंडळी,
टाकरखेड भागीले ता.देऊळगांव राजा जि.बुलढाणा



दैनिक **महाभूमि**

## स्वातंत्र्य दिनाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा



**सौ. दीपाली रामचंद्र निकाळजे**
सरपंच
पिंपळगाव बु



**नितीन सौदर**
ग्रामविकास अधिकारी,
पिंपळगाव बु



आदर्श गाव संकल्प व प्रकल्प योजना





शुभेच्छूक



**गजानन मुंढे**
अध्यक्ष

## स्वातंत्र्य दिनाच्या सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा तसेच दै.महाभूमिच्या खुप-खुप शुभेच्छा

समर्थ बहुउद्देशिय शैक्षणिक संस्था
देऊळगांव राजा जि.बुलढाणा

तथा आदर्श गाव सरपंच उपसरपंच तथा ग्रामस्थ मंडळी तालुका देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा







शुभेच्छूक



**प्रा.दिलीपकुमार झोटे**
प्रदेश उपाध्यक्ष
सामाजिक न्याय विभाग
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

## तमाम जनतेस स्वातंत्र्य दिनाच्या तसेच दै.महाभूमिच्या वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा





दैनिक **महाभूमि**
निर्मळ, निकोप व नि:पक्ष



## द्वितीय वर्धापन दिनामिमित्त तसेच स्वातंत्र्य दिनाच्या सर्व वाचकांना मन:पूर्वक शुभेच्छा



**दिनकर वाघ**
सरपंच पांगरी वाडी
ता.दे.राजा जि.बुलढाणा


जाहिरात संकलन - गजानन घुगे, तालूका प्रतिनीधी, मो. - 8007374555